**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७६

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), अपिलार्थी
व्दारा, बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड

त्रयस्थ पक्ष सचिव, कै. लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळ, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. तथापि विहित मुदत संपूनही जन

अपिलीय अधिकारी यांनी त्यांना काहीही कळविले नाही व कोणतीही माहिती दिली नाही आणि अपिलार्थीस जाणुनबुजून संगनमताने माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले व RTI Act चा भंग केला. त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांना दंड करण्यात यावा व अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कै. लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळ, परळी वैजनाथ, जिल्हा बीड या संस्थेच्या संदर्भात एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **अपिलार्थीने दिनांक ०५-०६-२००६, दिनांक ०३-०७-२००६ व दिनांक १४-०९-२००६ रोजी दिलेल्या तक्रारी अर्ज / निवेदनावर केलेल्या कार्यवाही अहवालाच्या सत्यप्रती, सदर तक्रारीवर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार किती दिवसात कारवाई करणे बंधनकारक आहे. सदर तक्रारी / निवेदनावर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कारवाई न करणा-या दोषी अधिका-याचे नांव व पदनाम, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संस्थेच्या तक्रारीसंबंधी चौकशी करणा-या अधिका-याचे संपूर्ण नांव व पदनाम, संस्थेच्या तक्रारीसंबंधी चौकशी करणा-या अधिका-याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही तक्रारी आहेत काय, असल्यास त्यांच्या सत्यप्रती व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार संस्थेने कार्यकारिणीमध्ये केलेले बदल, बदल केलेल्या दिनांकापासून किती दिवसात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे, विहित मुदतीत सादर न केलेले फेरफार अर्ज नियमानुसार आहेत काय व सदर संस्थेच्याबाबतीत लातूर कार्यालयाकडून चौकशी करण्यासंबंधी आलेल्या पत्राची व केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सत्यप्रत** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील श्री. च. रा. डोंगरे, निरीक्षक यांच्याकडून प्राप्त होताच ती अपिलार्थीस तात्काळ देण्यात येईल असे त्यांना आश्वासीत केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील

अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी ह्या त्यांच्याकडे माहिती अधिकाराचा वापर करुन वेळोवेळी अशा प्रकारची माहिती मागवित असतात, तर त्यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी मागितलेली माहिती वेगळ्या संदर्भाव्दारे पुरविण्यात आली आहे. आता अपिलार्थीस ती माहिती ते नव्याने देण्यास तयार आहेत.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी त्यांच्या संस्थेकडील सदस्यत्व प्राप्त करुन घेण्याकरिता व केवळ संस्थेला त्रास देण्यासाठी अशा प्रकारची माहिती वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागवित असतात. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही सार्वजनिक हित दडले नसून केवळ वैयक्तीक स्वार्थापोटी त्या त्रयस्थ पक्षाच्या संस्थेच्या सर्वत्र तक्रारी करत असतात. माहिती अधिकारामध्ये माहिती मागवून नंतर आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी कळविल्यानंतर त्या शुल्काचा भरणा न करणे, माहिती विनामूल्य प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करणे, या व संस्थेच्या कार्यात खोडा घालणे या त्यांच्या नेहमीच्याच सवयी आहेत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद, व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद चुकीचा व अवैध आहे. सार्वजनिक न्यास नोंदणीच्या प्रत्येक जिल्ह्याच्या कार्यालयामध्ये कार्यालयाचे अधीक्षक जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कार्यालयाच्या संबंधित निरीक्षकाकडे उपलब्ध असते. त्यामुळे संबंधित निरीक्षकाकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्याचे काम अधीक्षकांना करावे लागते, ही बाब जरी खरी असली तरी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने नियुक्त जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कारवाई केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दुस-या वेगळ्या संदर्भाव्दारे पुरविली गेली आहे. मात्र यासंदर्भातील त्यांच्याकडील पुरावा ते आयोगाकडे सादर करु शकत नाहीत. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधीत

असलेल्या प्रथम अर्जामधील माहिती देण्यासाठी आता जन माहिती अधिकारी यांना कारवाई करावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना देय होत नाही, मुद्दा क्रमांक ६ व ७ शी संबंधित अंशतः माहिती देय होते. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी ही मागणी विसंगत असल्याने अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, दप्तर दिरंगाई कायदा हा अर्धन्यायिक प्राधिकरणाला लागू होत नसल्याने कोणत्याही तक्रार अर्जावर विहित कालावधीत कारवाई करणे त्यांना बंधनकारक राहत नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या तक्रारी / निवेदनावर कारवाई न करण्यासाठी, विहित मुदतीत कारवाई न करण्यासाठी कोणत्याही अधिका-यास आजपावेतो दोषी न ठरविल्यामुळे अपिलार्थीस ती माहिती देता येणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, संस्थेच्या प्रकरणाबाबत चौकशी करणा-या अधिका-याबाबत त्यांच्याकडे आजपर्यंत कोणत्याही तक्रारी नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे अपेक्षित असणारी अशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे, जी वरील परिच्छेदामध्ये म्हटल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाहीत. तक्रारीची चौकशी करणा-या अधिका-याच्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या सत्यप्रती बाबत असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असून ती माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (J) चा भंग होणार असल्याने ही माहिती (तक्रारीच्या सत्यप्रती) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या, कार्यालयाच्या कार्यपध्दती संदर्भात जर काही नियम असतील तर या नियमाच्या सत्यप्रती या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाने विहित मुदतीत सादर न केलेले फेरफार अर्ज नियमानुसार आहेत काय व सदर संस्थेच्या बाबतीत लातूर कार्यालयाकडे चौकशी करण्यासंबंधी आलेल्या पत्राची व केलेली कार्यवाही याबाबतच्या सत्यप्रतीची माहिती मागितली आहे, अशी माहिती मागितली आहे.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्याकडे जर अशा प्रकारचे अर्ज प्राप्त झाले तर या तक्रार अर्जांची तपासणी करण्यासंदर्भात त्यांनी काही टिपणीच्या आधारे निष्कर्ष काढले असतील तर त्यांनी त्या टिपणीच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात अपिलार्थीस अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय ठरत आहे.

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दयांचे वरीलप्रमाणे केलेले पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली जी माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय आहे ती माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०३-०५-२००८ रोजी निर्णय दिलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. तथापि दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्याची कारणे आयोगास मान्य नाहीत, कारण जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने न्यायालयाच्या नियमानुसार केलेली विहित पध्दत पाळली नसल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी आधार घेतलेले गृहीतक हे या प्रकरणी लागू होत नाही. प्रत्येक शासकीय कार्यालयाने माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज यावर कशा प्रकारे कारवाई करावयाची याचे सविस्तर विवेचन शासन सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र. आर. टी. आय. २००५/सी. आर. ३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ मध्ये केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास अधिनियमातील कलम २ (ड) ३ या प्रकरणी लागू होत नसल्याने त्यांना राज्य शासनाच्या वरील अधिसूचनेप्रमाणे या प्रकरणी इतःपर कारवाई करणे भाग आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) प्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ३० दिवसात किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसात निर्णय देणे अपेक्षित असतांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०३-०५-२००८ रोजी म्हणजेच तब्बल एक वर्ष तीन महिने इतक्या विलंबाने निर्णय दिला आहे, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे विलंब यापुढे टाळावेत असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक ज्यांना, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी असे समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना करण्यात येत आहे.

त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीच्या वर्तनाबाबत वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला आहे. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने, अपिलार्थीचे वर्तन त्रयस्थ पक्षाच्या मते जरी कितीही आक्षेपार्ह असले तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करण्यासाठी कोणताही प्रत्यवाय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| औरंगाबाद | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक ०१-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), व्दारा, बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, डॉ. अनी बेझंट रोड, ३ रा मजला, वरळी, मुंबई - १८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२५९९

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. शेख अफसर शेख बाबु, अपिलार्थी

व्दारा, हमालपुरा मस्जिदजवळ,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप आयुक्त (महसूल),

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी त्यांच्या प्रथम अपिलासंबंधी त्यांची दिशाभूल केली व त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेतल्याच्या त्यांच्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर आपला

माहितीसाठीचा मूळ अर्ज या अपिलासोबत जोडला आहे यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हवी असल्याचे अनुमान काढून ही सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील महात्मा फुले हमी योजना केंद्र नांदेड यासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **मनपा हद्दीत एकूण वर्गसंख्या व विद्यार्थ्यांच्या मासिक अहवालाची झेरॉक्स प्रत, विद्यार्थ्यांच्या हजेरीपटाची झेरॉक्स प्रत, सन २००५-०६ ची कुटूंब सर्वेची शाळाबाह्य मुलांची यादी व मिनाक्षी सेवाभावी संस्था नांदेड यांची महात्मा फुले हमी योजना केंद्रात शाळाबाह्य मुलांचा वर्ग आहे किंवा अनाथ मुलांचा वर्ग** आहे याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांना प्रथम दिनांक २८-०८-२००७ रोजी आणि तदनंतर दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २९-०८-२००७ रोजी उपस्थित राहून हस्तगत करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २९-०८-२००७ रोजी हजर राहून त्यांना हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून उप आयुक्त (महसूल) यांची नेमणूक झाली आहे. मात्र अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज करतांना उप आयुक्त महानगरपालिका यांना उद्देशून केला होता. महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून अपिलार्थीचा मूळ अपील अर्ज शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविला गेला. तथापि संबंधित शिक्षणाधिका-याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे विनाकारवाई तसाच ठेऊन घेतला. तत्कालीन शिक्षणाधिकारी आता नियत वयोमानानुसार फेब्रुवारी २००८ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. मूळात या प्रकरणी अपिलार्थीचा अपील अर्ज ज्या अपिलीय प्राधिकरणाकडे जाणे अपेक्षित होते त्या प्राधिकरणाकडे न पोहोचल्याने या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही,

त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांनी दिनांक २९-०८-२००७ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज मूळात त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जाची ते सुनावणी घेऊन शकले नाहीत. यासंदर्भात त्यांनी संबंधित शिक्षणाधिकारी यांचे स्पष्टीकरण मागविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अर्जात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हस्तांतरीत केलेल्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एक व्दारे एकूण वर्गसंख्या व विद्यार्थ्यांचे मासिक अहवालाची झेरॉक्स प्रत ही माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण वर्गसंख्या व एका महिन्याच्या मासिक अहवालाची प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कोणत्याही कालावधीचा उल्लेख केला नसल्यामुळे अपिलार्थीस निश्चित कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे याचा बोध कोणासही होऊ शकणार नाही, त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक एक मधील विद्यार्थ्यांच्या मासिक अहवालाची झेरॉक्स प्रत व मुद्दा क्रमांक दोन मधील विद्यार्थ्यांचे हजेरीपटाचे झेरॉक्स प्रत ही माहिती मूळात देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन व्दारे सन २००५-२००६ ची कुटूंब सर्वेची शाळाबाह्य मुलांची यादी ही माहिती अपिलार्थीने मागितली होती. तथापि या कालावधीमध्ये कुटंब सर्वे झाला नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयाशी संबंधीत वस्तुस्थिती अवगत केली आहे, ती वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीने मुद्दा क्रमांक तीन व्दारे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात असणे शक्य नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक चार व्दारे मिनाक्षी सेवाभावी संस्था नांदेड यांची महात्मा फुले हमी योजना केंद्रात शाळाबाह्य मुलांचा वर्ग आहे किंवा अनाथ मुलांचा वर्ग आहे याबद्दल माहिती विचारली आहे. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागणारी असल्याने ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत ठरत आहे, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांचे खुलासे, स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणे हे " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरचे आहे, याची येथे विशेष करुन नोंद करण्यात येत आहे.

वरील प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन दिलेली माहिती यांची तुलना करता अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने व या अर्जातील उर्वरित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने मूळात त्यांचा माहितीसाठीचा अर्ज चुकीच्या पध्दतीने भरला असल्याने त्यांना ती देय होत नसल्याने आता ही माहिती अपिलार्थीस देण्याचे आदेश आयोग, विशेषतः अपिलार्थीच्या मूळ अर्जातील विशिष्ट कालावधीच्या उल्लेखाअभावी, पारित करु शकत नाही. या सर्व बाबी पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती विहित मुदतीत मिळाली असल्याचे दिसून येते. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांनी नोंदविलेले "माहिती खोटी व दिशाभूल करणारी" या अभिप्रायाचे समर्थन करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात् उप आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज वेळेत सादर न होण्यासाठी महानगरपालिकेतील जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करुन आपला अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. उप आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज वेळेत सादर न होण्यासाठी महानगरपालिकेतील जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करुन यासंदर्भात आपला अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अफसर शेख बाबु, व्दारा, हमालपुरा मस्जिदजवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६००

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा,<br>संपादक, नांदेड पोलखोल, सुनिता प्रिंटर्स, महावीर चौक, नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०९-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित केले होते. तथापि सदर आदेश निर्गमित झाल्यानंतर देखील व संबधित जन माहिती अधिकारी यांना दोन ते तीन वेळा दूरध्वनीवर विनंती करुन देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याने व उलट जाणुनबुजून टाळाटाळ करत असल्याचे अपिलार्थीस समजले आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेश पारित करावेत, अशी त्यांनी या अर्जामध्ये अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०५-२००६ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत चालू असलेल्या ३०५४ योजनेत्तर रस्ते, २०५९ अनिवासी इमारती व २२१६ निवासी इमारती या शीर्षाखाली प्राप्त झालेले अनुदान, खर्च व कामे यांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना काही कालावधी लागणार असल्याची कल्पना दिली व त्याचबरोबर अपिलार्थीस जर एखाद्या विशिष्ट लेखाशीर्ष अथवा कामाशी निगडीत माहिती हवी असेल तर ती वेळेत पुरविण्यात येण्याच्या दृष्टीने अभिप्रेत असणा-या कामाचे नांव कळविण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००६ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना तात्काळ विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त झ ाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी बदलून गेले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब का झाला याची कारणे ते आयोगास सांगू शकत नाहीत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१०-२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पुरविली असून ती अपिलार्थीस दिनांक २८-१०-२००६ रोजी विनामूल्य प्राप्त झाली आहे. त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची रजिस्टर्ड पोस्टाची प्रत आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १९-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिनांक २८-१०-२००६ रोजी त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे मूळात प्रथम प्रतिसाद दिला नाही. अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे कोणत्याही अर्जदाराचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे अर्जदारास ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्यास, आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क तपशीलासह अर्जदारास कळविणे या तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासाठी वेळ लागेल अशी कल्पना दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व पतमर्यादेच्या आदेशाच्या प्रती व झ ालेल्या कामाची नांवे, त्यांच्याकडील ज्या रजिस्टरमध्ये नोंदविलेली आहेत त्या रजिस्टरच्या प्रती अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्वतः तयार केली व तदनंतर ती अपिलार्थीस दिनांक १९-१०-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे पाठविली. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर विनामूल्य प्राप्त झाल्याचे दिसून येते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा अथवा दृष्ट हेतुने माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा, जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसले तरी त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली, हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने त्यांना या प्रकरणी आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा, संपादक, नांदेड पोलखोल, सुनिता प्रिंटर्स, महावीर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०१

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. बंडाप्पा सिद्रामअप्पा डिगे, अपिलार्थी

वैद्यनाथ स्मृती, हॉटेल अश्वमेघच्या पाठीमागे,

बार्शी रोड, लातूर - ४१३ ५३१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-११-२००८ रोजी फेरनोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे वय ७० वर्षे इतके असून ते हार्टपेशंट आहेत व त्यांना मिळणारे सेवानिवृत्ती वेतन रुपये ५४९ इतके असल्याने ते दारिद्ररेषेखालील जीवन जगत आहेत. त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसून यापेक्षा अधिक काही सांगावयाचे नाही. त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, माहिती अधिकाराने त्यांना प्राप्त झालेल्या हक्काचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पालन झालेले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक A/१९३८२/२१८३८२० च्या संदर्भात सन १९७१ ते १९८२ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने सन १९७१ ते १९८२ मध्ये प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च रोजी खात्याच्या व कर्मचा-याच्या रकमेचा तपशील, वर्षनिहाय दरवर्षाची आकडेवारी ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलासा पाठविला. तथापि या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेला खुलासा परत अपिलार्थीस पाठविला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी हे उपस्थित नाहीत.

उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थी हे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेमध्ये वाहक (conductor) या पदावर कार्यरत होते. ते या सेवेतून सन १९९७ साली सेवानिवृत्त झाले आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कार्यप्रणालीची त्यांनी आयोगास कल्पना दिली. या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या विभागातील प्रत्येक कर्मचा-यास दरवर्षाच्या दिनांक ३० मार्च पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधी पत्रिका नियमितपणे दिल्या जातात. या पत्रिकेमध्ये एकूण जमा अधिक उचल रकमेचा पूर्ण तपशील असतो तसेच या पत्रिकेतील टिपणीमध्ये त्यांच्या या संबंधित पत्रिकेमध्ये काही चूक आढळल्यास सदर पत्रिका प्राप्त झाल्यापासून दोन महिन्याच्या आत संबंधित कर्मचा-याने

ही चूक वित्तीय सल्लागार व लेखाधिकारी यांच्या निदर्शनास आणावी असा उल्लेख आहे. अपिलार्थीच्या प्रकरणात सन १९७१ ते १९८२ च्या दरम्यान अपिलार्थीने मुख्य लेखा अधिका-यास अशा प्रकारची कोणतीही हरकत कळविली नाही व तसेच अपिलार्थीने सेवानिवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीची सर्व अंतीम देयके घेतलेली आहेत. या अंतीम देयकामध्ये अपिलार्थीच्या १९७१ ते १९८२ च्या दरम्यान त्यांना देय असलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा समावेश आहे.

आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २७ वर्षे जुनी असल्याने अपिलार्थीस ती माहिती देणे खूप जिकिरीचे आहे असे त्यांनी आयोगास अवगत केले. मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी (कायमस्वरुपी) विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार द्यावी लागेल. सबब त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील एखाद्या जबाबदार कर्मचा-याची नेमणूक करुन ही माहिती अपिलार्थीच्या उपस्थितीत त्यांच्या कार्यालयात शोधण्यात यावी व तदनंतर अपिलार्थीस ती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर सदरची माहिती नष्ट झाली असेल किंवा उपलब्ध होत नसेल तर त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळवावे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या उपस्थितीची आवश्यकता वाटली तर राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नांदेड कार्यालयाने अपिलार्थीसाठी लातूर - नांदेड व परत नांदेड - लातूर अशा प्रवासाची विनामूल्य व्यवस्था करावी. जन माहिती अधिकारी यांनी ही कारवाई हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद                                                                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक        ०१-०४-२००९                                                   राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडाप्पा सिद्रामअप्पा डिगे, वैद्यनाथ स्मृती, हॉटेल अश्वमेघच्या पाठीमागे, बार्शी रोड, लातूर - ४१३ ५३१.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०२

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. संदीपान अप्पाराव थोरात, अपिलार्थी

व्दारा, मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप नियंत्रक, वैधमापन शास्त्र, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील गांभीर्याने न पाहता फेटाळून लावले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" या कायद्याच्या कलम ४ (१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. केमाअ २००५/प्र.क्र.१९०/०५/५ मंत्रालय, मुंबई - ३२ दि. १६-०६-२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधिकरणांनी / आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. यासह केंद्र शासनाचा दि. २६ मे २००५ चा आदेशही आपणाकडे शासनाने दिलेले आहे. या १७ कामांची (आपण मुदतीत केलेल्या) परिपूर्ण माहिती मला मुद्दानिहाय फीससह कळवावी मला ही सर्व माहिती परिपूर्णरित्या पाहिजे आहे. कृपया अर्धवट माहिती देवू नये."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या विभागाच्या संकेतस्थळास भेट देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले असता सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ११-०५-२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटत असल्याने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.	जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद
दिनांक	०१-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. संदीपान अप्पाराव थोरात, व्दारा, मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२	जन माहिती अधिकारी तथा सहायक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक, वैधमापन शास्त्र, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०३

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. जगनराव बाबूराव चोरगे, अपिलार्थी
प्लॉट नं. सी-९९, एमआयडीसी, वाळूज,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व),
मुंबई ङ ४०० ०९३

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक A व D शी संबंधित माहिती त्यांना अनुक्रमे ११८ व ८८ दिवस इतक्या विलंबाने प्राप्त झाली असून मुद्दा क्रमांक B व C बी शी

संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची व त्यांच्यावर विभागीय चौकशीची शिफारस करण्याची कारवाई करावी आणि अपिलार्थीच्या या प्रकरणाशी नुकसानभरपाई आयोगाने मंजूर करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत त्रयस्थ पक्ष जयंती केमिकल्स, प्लॉट नं. सी-९९, वाळूज संदर्भात दिनांक ०१-०७-२००१ अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. तथापि तत्पूर्वीच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचा निष्कर्ष काढून दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक A, B व C संदर्भात अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. मात्र ही माहिती अपिलार्थीस विलंबाने प्राप्त झाली, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक B व C चा विचार केला असता असे दिसून येते की, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक B च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे "सदर प्रती आपणास दिनांक २१-०२-२००७ रोजी रुपये १३५२ भरणा करुन या कार्यालयाने उपलब्ध

करुन दिलेल्या आहेत" अशी माहिती दिली आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक B व्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने भूखंड हस्तांतरीत होत असतांना भूखंडधारक व भूखंड घेणारा यांच्यामध्ये हस्तांतरणाचा व्यवहार होत असतांना जर MIDC ने अशा प्रकारचे काही प्रमाणित नमुने तयार करुन ठेवले असल्यास अशा प्रमाणित नमुन्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती असे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अशा प्रकारचे प्रमाणित नमुने MIDC कडून ठेवले जात नाहीत, कारण प्रत्येक प्रकरणी हस्तांतरणाचे स्वरुप नेहमी बदलत असते. त्यामुळे हस्तांतरण प्रक्रियेमध्ये त्यांनी कोठल्याही पध्दतीचे प्रमाणिकरण करुन ठेवलेले नाही. वास्तविक पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असती तर अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती वेळेत प्राप्त झाली असती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक C व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही भविष्यकाळाशी संबंधीत असल्याने या मुद्दयावरील माहिती मूळात अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करणे, एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने विचाराधीन मुद्दयाव्दारे ज्या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे ती माहिती मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे अपील करतांना उपस्थित केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक B आणि C च्या संदर्भात अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त मुद्दा क्रमांक B शी संबंधीत माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक B शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अपेक्षित होते. तथापि हा प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने (दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे) दिला

असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे व या विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगताना असे प्रतिपादन केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पूर्वी वेगवेगळ्या संदर्भाव्दारे दिली आहे, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित रहात नाहीत. त्याचबरोबर अपिलार्थी हे त्यांचे राहण्याचे पत्ते वारंवार बदलत असतात व अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता सदर क्रमांक अस्तित्वात नसल्याचे त्यांना आढळून आले. त्यामुळे विचाराधीन अर्जासंदर्भात अपिलार्थीस ते वेळेत माहिती पुरवू शकले नाहीत. केवळ दुस-या संदर्भाव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली आहे म्हणून या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देणे गरजेचे नाही ही जन माहिती अधिकारी यांची धारणा अयोग्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करुन जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे व येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे देण्याबाबत त्यांनी सतर्क रहावे, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक B शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक ०१-०४-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जगनराव बाबूराव चोरगे, प्लॉट नं. सी-९९, एमआयडीसी वाळूज, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रेल्वे स्टेशन एमआयडीसी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०४

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, अपिलार्थी

श्री. बालाजी ट्रेडर्स आडत दुकान,

गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, अंबाजोगाई,

तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस राज्य माहिती आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाने दिनांक ०६-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीच्या विनंतीवरुन सदर अपील खारीज करण्याचे आदेश दिले होते. अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज केलेल्या अपिलासारखेच असून अपिलार्थीने एकाच विषयावर दोन वेळेस राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. त्यापैकी एक अपील, अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याचे

कबूल केल्यावरुन व त्यांच्या विनंतीवरुन आयोगाने खारीज केले आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, श्री. बालाजी ट्रेडर्स आडत दुकान, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०५

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, अपिलार्थी
व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवन जवळ, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी,
कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण),
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह संचालक (उच्च शिक्षण),
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना प्रतिमहा रुपये २८०० इतका पगार देय असतांना देखील प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर त्यांना रुपये २१०० इतक्या रकमेचे सह संचालक कार्यालयाच्या संगनमताने वेतन पारित करीत आहेत व त्यांना देय वेतन आणि प्रत्यक्षात प्राप्त होणारे

वेतन यातील फरक अदा करण्यासाठी प्राचार्य व सह संचालक कार्यालय एकमेकावर जबाबदारी ढकलत आहेत. त्यांनी या अपील अर्जामध्ये आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय या मुद्दयासमोर असे नमूद केले आहे की, तासिका मानधन (कमी केलेले) माझ्या खाती प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय जमा करण्याचे आदेश का देत नाहीत अथवा इतर महाविद्यालयात १०० रुपये प्रतितास किंवा २८०० रुपये महिना कोणत्या आधारे मान्य करता ?

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील प्रकारच्या माहितीची मागणी केली होती आणि इतर महाविद्यालय रुपये २८०० इतके मानधन कोणत्या आधारे मान्य करतात त्याचा खुलासा मागितला होता व त्यांचा कमी केलेला पगार प्राचार्यास अपिलार्थीच्या खात्यात जमा करण्याचे आदेश करण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा केला. तथापि या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे महाविद्यालयाचे अपिलीय अधिकारी हे प्राचार्य असल्याने त्यांच्याकडे अर्ज करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक तो खुलासा केल्याचे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल खुलासे मागणे अपेक्षित नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीस कमी मानधन प्राप्त होण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला आहे व या

अर्जाव्दारे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा कमी केलेला पगार त्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेशित करण्याची विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती देण्यासंदर्भात कारवाई करणे एवढीच सीमित कारवाई या अधिनियमात अभिप्रेत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेला खुलासा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मागता येणार नाही. तसेच त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेकडून प्राप्त होणा-या पगाराबाबत जर त्यांचे काही आक्षेप असतील तर ते त्यांनी संबंधित विभागाच्या प्रशासनाकडून सोडवून घ्यावेत असे अपिलार्थीस येथे सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीने विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत असल्याने आणि अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तीक गा-हाण्याचा निपटारा करुन देण्यासाठी वेगळे प्राधिकरण अस्तित्वात असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी अपिलार्थीस संबंधित महाविद्यालयाच्या प्रार्चायांशी संपर्क साधण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा अवैध आहे. त्यांच्याच कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारली असताना व या माहितीबाबत अर्जदाराने काही आक्षेप घेतला तर त्यासंदर्भात अपिलार्थीच्या अपिलावर सुनावणी घेऊन शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी अथवा सक्षम अपिलीय प्राधिकरणाने निर्णय देणे त्यांना या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या प्राचार्याकडे जाण्याचे सूचित केले. ही त्यांची कृती सर्वथा गैर व चूकीची आहे याची त्यांनी नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोनही अधिकारी एकाच प्राधिकरणाशी संबंधीत असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अपील अर्ज हा बरोबर होता. मात्र या अर्जावर निर्णय देतांना शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी चूक केली असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवन जवळ, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कार्यालय सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०६

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. ननवरे पी. एस. अपिलार्थी

"योगेश निवास" बी फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अध्यक्ष, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था उपळे (मा.),

तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,

उस्मानाबाद विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक १२-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना फक्त दोन पृष्ठांची माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रुपये ४० इतके शुल्क आकारले आहे. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी नियमबाह्य शुल्क आकारणी करुन त्यांना खोटी माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्यास वेळ लागणार असल्याची अपिलार्थीस कल्पना दिली व तदनंतर दिनांक ३१-०८-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५५ इतके त्यांच्या संस्थेच्या बँकेतील खात्यामध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक ०३-१०-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. यावर अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे ४० रुपये इतक्या शुल्काचा भरणा करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आकारलेले शुल्क अवाजवी असल्याचे वाटल्यावरुन व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-१०-२००७ रोजी त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी ४० रुपये माहितीपोटीचे शुल्क आकारुन अपिलार्थीस दोन पृष्ठांची माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती न देता त्यांना चुकीची माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांच्या संस्थेकडील बदली धोरणाच्या सत्यप्रती मागितल्या असता त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र खाजगी शालेय कर्मचारी (शिक्षक-शिक्षकेतर) अधिनियम १९७७ व नियम १९८१ मधील कलम ४२ नुसार संस्थेचे धोरण आहे असे उत्तर दिले आहे. वास्तविक पाहता, या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित कलमाची प्रत देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि अशा प्रकारची कारवाई जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या शाळेतील अनुशेष पदांच्या सत्यप्रती मिळाव्या अशी माहिती मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती कोर्टाचा अवमान होत असल्याची शक्यता वर्तवून अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती नाकारली आहे. या मुद्दयावरील माहिती उघड करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही न्यायालयाने प्रतिबंधित केलेले नाही, असे संबंधिताबरोबर झालेल्या चर्चेमधून आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात मुख्याध्यापकाची अनुशेषांतर्गत भरलेल्या पदांची संख्या ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. मात्र या मुद्दयावरील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली उर्वरित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास संपर्क साधण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून या मुद्दयावर माहिती देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांना अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत सर्व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील वरील अपेक्षित कारवाई केली नाही. त्यामुळे आता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे शिक्षण संस्थेच्या वार्षिक लेखा परीक्षणाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात संस्थेचे सन २००६-०७ या कालावधीतील लेखा परीक्षण झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. त्यांना या मुद्दयावर असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या मुद्दयाची वस्तुस्थिती अपिलार्थीस कळवावी. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भातील, रजा शिल्लक असतांना रजेच्या काळातील वेतन कपात केले जाते काय, असल्यास कोणत्या नियमानुसार कपात केले जाते, या मुद्दयावरील अंशतः माहिती अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. याही मुद्दयाबाबत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सूचित करण्यात येत आहे.

आयोगास पुढे असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिला गेलेला प्रथम प्रतिसाद अवैध आहे, कारण अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ३० दिवसाच्या आत त्यांना देण्यात येणा-या माहितीचे शुल्क त्याच्या तपशीलासह कळवावयाचे असते. मात्र या प्रकरणी अशा प्रकारच्या कोणत्याही शुल्काचा अथवा तपशिलाचा उल्लेख न करता फक्त अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती संकलीत करण्यास वेळ लागेल, एवढेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथमतः दिली, मात्र हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिले असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देतांना अपिलार्थीस ४० रुपये इतके शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची असल्याने, त्यांना आता अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून घेतलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना परत करावे लागेल. या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने संबंधित संस्थेच्या कार्यालयाशी संबंधित शाळाकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील काही माहिती संस्थेसंबंधी व काही शाळेशी संबंधित अशी होती त्यामुळे या प्रकरणी संस्थेच्या जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे संबंधित शाळेकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केला आहे. अपिलार्थीने संस्थेविषयी माहिती मागितली असल्याने या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे संस्थेचे सचिव व अध्यक्ष हे या प्रकरणातील जन अपिलीय अधिकारी आहेत. जन माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी हे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे एकाच प्राधिकरणाचे भाग असणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केले. सहायक धर्मादाय आयुक्त हे जन अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या माहितीपुरतीच कामे पाहू शकतात.

सहायक धर्मादाय आयुक्त यांना त्यांचे कार्यालय वगळता इतर प्राधिकरणाशी संबंधित अपिलावर, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) व्दारे प्राप्त होणा-या अपिलावर निर्णय देण्याची अधिकारिता नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन प्रकरणी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०३-१०-२००७ रोजी दिलेला निर्णय अवैध ठरविण्यात येत आहे.

वर विवेचन केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची शुल्क आकारणी केली व अपूर्ण माहिती दिली असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १, २, ४, ५ व ८ अंशतः या मुद्दयावरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटीचे, त्यांना आकारलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

औरंगाबाद

दिनांक ०१-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ननवरे पी. एस. "योगेश निवास" बी फॉर्मसी कॉलेज जवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०७

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

१ श्री. सुभाष मुरलीधर कदम, अपिलार्थी
मु. पो. रत्नापूर, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
अतःदीप शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती पवित्राताई दैठणकर
हायस्कूल, रत्नापूर, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०४-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असतांना त्यांना ती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही तसेच त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या

अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती दिल्यास जन माहिती अधिकारी अडचणीत येण्याच्या भीतीमुळे त्यांना माहिती देत नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सात मुद्दयाव्दारे स्वतः संबंधी आणि शिक्षण संस्थेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषदच्या लिपिकाने दिनांक ३०-१०-२००६ रोजी पोचसही दिली आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दिनांक २४-०३-२००९ रोजी ०५-४० वाजता दूरध्वनीव्दारे श्री. कांबळे कक्ष अधिकरी यांच्यामार्फत निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देणे इष्ट राहील, असे आयोगाचे मत झाले आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. सदर सुनावणीची सूचना

अपिलार्थीस सुनावणीच्या प्रस्तावित दिनांकापूर्वी किमान सात दिवस अगोदर प्राप्त होईल याची खबरदारी जन अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी. या अपिलावरील निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत ते अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद

दिनांक ०१-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष मुरलीधर कदम, मु. पो. रत्नापूर, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी अत:दीप शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती पवित्राताई दैठणकर हायस्कूल, रत्नापूर, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत अपिलार्थीच्या दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०८

निर्णय दिनांक ०१-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुभाष गणपतराव निंबाळकर,<br>स्वातंत्र्य सैनिक नगर, कृपासदन रोड,<br>यशवंत विद्यालयाजवळ, लातूर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, निलंगा,<br>तालुका निलंगा, जिल्हा लातूर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, लातूर | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०४-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या येथील कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपल्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या खात्यामार्फत निलंगा तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मार्च २००६ ते ऑगस्ट २००६ या कालावधीत झ ाालेल्या कामांच्या मस्टरची, मोजमाप पुस्तिके व पासिंग रजिस्टरच्या प्रतीची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात संकलीत करण्याचे काम चालू आहे व ते पूर्ण होताच अपिलार्थीस कळविण्यात येईल अशा आशयाचे उत्तर दिले व तदनंतर दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी एकूण १८००० रुपये इतक्या शुल्काची मागणी अपिलार्थी यांच्याकडे केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्याची मुदत संपल्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत कोणतीही सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद कला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्रथम प्रतिसाद, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील सादर केल्यानंतर मिळाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या शुल्काच्या रकमेचा तपशील दिला नाही, त्यामुळे त्यांनी त्या तपशीलाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. तथापि सदरचा तपशील त्यांना आजतागायतही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पत्रामध्ये जरी दिनांक १३-१०-२००६ या तारखेचा उल्लेख केला असला तरी प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र पोस्टामध्ये दिनांक २०-१०-२००६ रोजी रजिस्टर्ड केले आहे. त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी सब पोस्टमास्तर, निलंगा यांची सही असलेले पत्र आयोगास सादर केले असून यावरुन अपिलार्थी यांच्या युक्तिवादाची सत्यता लक्षात येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षत: नसल्याने ती माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित मंडळ कृषि अधिका-यांकडून प्राप्त करुन घेणे गरजेचे असल्याने त्यांनी या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्व संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन ती अपिलार्थीस देण्यासाठी दिनांक १३-१०-२००६ रोजी तयार ठेवली होती. मात्र जावक लिपिकाच्या हलगर्जीपणामुळे हे पत्र दिनांक २०-१०-२००६ रोजी पोस्टात टाकले गेले व अपिलार्थीस ते उशिरा प्राप्त झाले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (३) प्रमाणे अपेक्षित प्रतिसाद विहित मुदतीत दिलेला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी पोस्टाने पत्र पाठवले. यासंदर्भात सब पोस्टमास्तर, निलंगा यांचा जन माहिती अधिकारी यांनी पोष्टात दिनांक २०-१०-२००६ रोजी पत्र पाठविले असल्यासंदर्भात दिलेला पुरावा ग्राह्य धरण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अधिनियातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस कळविणे अनिवार्य आहे, तो दिलेला नाही असेही दिसून येत आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-१०-२००६ रोजीचा अपिलार्थीच्या मूळ अर्जास उद्देशून दिलेला प्रतिसाद पूर्णत: अवैध ठरत असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणतीही दखल न घेऊन व त्याव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब आयुक्त (कृषि) यांना, संबंधित

जन अपिलीय अधिकारी यांच्या या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर टाळले असल्याचे अथवा कोणत्याही दृष्ट हेतुने माहिती दडवून ठेवले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक १३-१०-२००६ रोजीचे पत्र दिनांक २०-१०-२००६ रोजी रजिस्टर्ड करण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत त्यांच्या कार्यालयातील जे कोणी कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचा-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष गणपतराव निंबाळकर, स्वातंत्र्य सैनिक नगर, कृपासदन रोड, यशवंत विद्यालयाजवळ, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.एस.आय.आरेफोद्दीन, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अनावश्यक माहिती दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अंडी उबवणूक केंद्र, पडेगाव,औरंगाबाद येथील सहायक आयुक्त या

पदाकरिता भाडेरहीत (अभिहस्तांकित) निवासस्थानाच्या उपलब्धततेबाबत एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली, तथापि ही माहिती चुकीची वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दि. ३० मार्च, ते १५ एप्रिल, २००८ च्या आसपास झालेल्या लेखापरीक्षणाचे वेळी, लेखापरीक्षणामध्ये अपिलार्थीस अभिहस्तांकित निवासस्थान दिले असल्याबाबत चुकीची माहिती संबंधित लेखापरीक्षण पथकाला दिल्याने, त्यांच्यावर एकूण ९५,०००/- इतकी वसूली त्यांच्या खात्यातर्फे दाखविण्यात आली होती. निवासस्थानाचा दर्जा पाहता, हे निवासस्थान अभिहस्तांकित (भाडेमाफीचे) असून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने या तपासणी पथकाला चुकीची माहिती दिली. सदर वसूली त्यांना मान्य नाही तसेच सदर वसूलीच्या आदेशावर अद्यापपावेतो अंतीम कारवाई न झाल्याने त्यांना अद्यापपावेतो सेवानिवृत्ती व तत्सम अनुषंगिक आर्थिक फायदे त्यांना मंजूर झाले नाहीत. या प्रकरणी त्यांना आता पूर्ण माहिती मिळाली असून त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती देऊनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली गेली नाही, त्यामुळे आता त्यांना ज्या जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः चुकीची माहिती दिली त्या जन माहिती अधिकाऱ्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात यावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गोहत्रे एम.यु. (सध्या सहा.आयुक्त,जिल्हा पशु चिकीत्सालय,औरंगाबाद येथे कार्यरत) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी त्यांच्याकडे संपूर्ण जिल्हयाचा पदभार होता व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, संबंधित उपकेंद्राच्या कार्यालयाकडे असल्याने त्यांना उपकेंद्राच्या कार्यालयाकडून जशी माहिती प्राप्त झाली, तशीच त्यांनी ती पुरविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर वेळीच सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.७.२००८ रोजी पुरविलेली माहिती ही पूर्णतः चुकीची आहे. अपिलार्थीने दि. १९.७.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर सर्वसाधारण परिस्थितीत त्यांना, त्यांनी मागितलेली माहिती दि. १८.८.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देय होते. तथापि या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २९.११.२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर दि. १०.१२.२००८ रोजी त्यांना पुरविली आहे. ही माहिती बरोबर असल्याचे अपिलार्थीने मान्य केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने दिली गेली आहे काय, या प्रश्नाचे उत्तर अर्थातच 'होय' असे आहे. ेमाहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी/अधिकारी यांना देखील अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजण्याची तरतुद आहे, ही तरतुद पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व ही माहिती त्यांना ज्या स्त्रोताकडून प्राप्त झाली तेथील सर्व कर्मचारी हे एकत्रितपणे जबाबदार ठरत असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा १३४ दिवस विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (१३४ दिवसांसाठी) कमाल एकूण रु. २५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

उपरोक्त शास्तीची कर्मचारी/अधिकारी निहाय विभागणी आयुक्त पशुसंवर्धन यांनी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व सर्व संबंधित सदर शास्तीचा भरणा कोषागारात नियमितपणे करतील असे पहावे.

अपिलार्थीस आता अपेक्षित माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २७.८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६)द्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न देऊन, त्यांनी अपिलावर दि. २९.११.२००८ रोजी म्हणजे अंदाजे दोन महिन्याच्या विलंबाने दिलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद आयुक्त, पशुसंवर्धन यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना एकूण रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार) शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

३) आयुक्त, पशुसंवर्धन,पुणे यांनी उपरोक्त आदेश क्र.२ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत करावी व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीच्या रकमेचा जास्तीत जास्त पाच हप्त्यात नियमितपणे कोषागारात पूर्णपणे भरणा करतील याची दक्षता घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एस.आय.आरीफोद्दीन, घ.नं.४-११-४३/७३९,आझम कॉलनी,रोशनगेट, सादत मस्जीदजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. आयुक्त, पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत, पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

१ सौ. जयवंताबाई भालेराव, : अपिलार्थी
सुलीभंजन ता.खुलताबाद जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, खुलताबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, खुलताबाद,जि.औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
नगर परिषद, खुलताबाद,जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारीः मुख्याधिकारी,
नगर परिषद, खुलताबाद,जि.औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २८.११.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदरचे अपील त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळाल्याने केले असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, खुलताबाद व सुलीभंजन हद्दीमधील नळ जोडणीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "अधिकृत, घरगुती, व कमर्शियल ०.५ इंच, १ इंच नळजोडणी संख्या, त्यांच्याकडील नळपट्टी थकबाकी,नावासह यादी, खुलताबाद व सुलीभंजन हद्दीमध्ये गि.न.प.च्या पाईपलाईनवर अनधिकृत नळजोडणीची संख्या नावासह यादी व ही जोडणी नियमित करण्यासाठी केलेली कार्यवाही" - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. १७.१०.२००८ रोजी देऊ केली. तथापि अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार केला नाही.यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे आयोगास आज रोजी निवेदन सादर करण्यात आले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती दि. १७.१०.२००८ रोजी तयार करुन ती अपिलार्थीस देण्याकरिता नगरपरिषदेचे कर्मचारी गेले असता, त्यांनी माहिती घेण्यास इन्कार केला, या इन्काराचे कारण अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांना या माहितीची गरज नाही परंतु अपिलार्थीच्या पाणीपुरवठा योजनेचे काम करुन द्यावे. अपिलार्थीने ही माहिती अस्वीकृत करण्याची घटना तेथील श्री. अनिल शंकर अंभोरे व श्री. उत्तम भगाजी फुलारे यांच्या उपस्थितीत घडलेली आहे व तसे त्यांच्याकडून (साक्षीदाराकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी) लिहूनही घेतलेले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या म्हणण्याची दखल घेऊन नगरपरिषदेने आज अपिलार्थीच्या नवीन पाणीपुरवठयाचे काम करुन दिले असल्याचे या निवेदनामध्ये म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे अथवा या निवेदनामधील बाबींचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती मागण्याचा उद्देश सफल झाला असल्याचे आयोगास अवगत करुन दिले. अपिलार्थीच्या अनुपस्थितीवरुन अपिलार्थीस विचाराधीन अपील अर्जाशी संबंधित माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य असावे, असे आयोगास वाटत नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. जयवंताबाई भालेराव,सुलीभंजन ता.खुलताबाद जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,नगर परिषद, खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११८
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. विजया गोविंद पवार,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दि. २१.८.२००८ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला असता, त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २४.९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्या अपील अर्जास केराची टोपली दाखविली

असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येथे की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २१.८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे विश्वभारती प्राथमिक विद्यालय,सिडको,एन.७,औरंगाबाद या शाळेची शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दि. २५.७.२००७ रोजी केलेल्या तपासणीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.९.२००८ रोजी परत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडेच प्रथम अपील सादर केले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे ज्या माहितीसाठीची मागणी केली आहे त्या अर्जासंदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेलेले असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी आयोगास अवगत करुन दिले.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्रा.) यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि.२४.९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांच्याकडे पाच दिवसांच्या आत पाठवावी. सदर अपील अर्ज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय घ्यावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२४.९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. विजय गोविंद पवार,रा. एन-९, एच-५१/१,श्रीकृष्णनगर,हडको,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या दि.२४.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह,या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अभयकुमार बलिराम यादव,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग घनसावंगी, जि.जालना<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>विभाग जालना. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे, की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी ठेवली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.०७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,दि. ०१.०४.२००७ ते अपिलार्थीस माहिती मिळेपर्यंत या कालावधीची रोजगार हमी योजनेसंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जामध्ये, 'माहितीशी संबंधित कालावधी' या मुद्यासमोर कोणताही अभिप्राय दिलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०७.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दि.०७.०७.२००८ या दिनांकाच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या रोहयो अंतर्गत कामासंबंधीच्या माहितीचा कालावधी- 'दि. ०१.०४.२००७ ते माहिती मिळेपर्यंत' असा नमूद केलेला आहे व तसेच माहिती मागण्याच्या विहित नमुन्यातील या अर्जामध्ये 'माहितीशी संबंधित कालावधी' या मुद्यासमोर कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. यावरुन अपिलार्थीस दि. ०१.०४.२००७ पासून पुढे निश्चितपणे कोणत्या तारखेपर्यंतची माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागताना अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडील निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधित आहे, याचा स्पष्ट

उल्लेख करणे त्यांना अनिवार्य आहे. विचाराधीन अपील अर्जाशी संबंधित अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने अशाप्रकारच्या विशिष्ट कालावधीचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये न केल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचा कालावधी कधीही संपणार नाही, असे दिसून येते. अपिलार्थीने अशाप्रकारे अनिश्‍चित कालावधीसाठी मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, लोकप्रश्न कार्यालय,रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक,जालना ता.जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२०
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

१ श्री. भाऊसाहेब रघुनाथ बोबडे, : अपिलार्थी
रा.इसारवाडी, ता.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेविका,
ग्रुप ग्रामपंचायत,इसारवाडी,
ता.पैठण जि.औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अथवा पंचायत समिती कार्यालयाकडून माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, दि. १.१०.२००८ ते दि.१५.१०.२००८ या कालावधीशी संबंधित ग्राम पंचायत क्षेत्रातील अतिक्रमणासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती मध्ये - "ग्राम पंचायत क्षेत्रातील अतिक्रमणाचा सर्व्हे केला काय?, पंचायत समिती पैठण यांना अहवाल सादर केल्याची माहिती व सदर अतिक्रमणासंदर्भात कार्यवाही करणार आहेत काय?" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे आढळून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, आज रोजी आयोगाकडील सुनावणीची कल्पना त्यांनी अपिलार्थीस तोंडी दिली होती. अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज दिल्यानंतर व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत किंवा यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दि. ३१.३.२००९ रोजी दिली असून सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही असलेली प्रत त्यांनी आयोगास दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. २६.११.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देणे शक्य झाले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या

मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या तीन मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल स्पष्टीकरणे अथवा खुलासे मागणे हे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- "पंचायत समिती, पैठण यांना अहवाल सादर केल्याची माहिती"- ही माहिती मागितली होती, या मुद्याद्वारे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांनी पंचायत समिती,पैठण यांच्याकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत हवी होती तर त्यांनी 'अहवालाची प्रत' असा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये करावयास हवा होता. तथापि त्यांनी अशाप्रकारचा उल्लेख येथे केलेला नाही, एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी पंचायत समिती,पैठण यांचेकडे सादर केलेल्या अहवालाची प्रत अपिलार्थीस दाखविली आहे. अर्थात्, जन माहिती अधिकारी यांचे हे विधान आयोग ग्राहय धरत नाही, कारण यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ग्राम पंचायत क्षेत्रातील अतिक्रमणाची यादी दि. ३०.३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा त्यांनी कोणताही पुरवा आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नाही आणि आज रोजी सुनावणीस देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत, हे पाहता अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे

स्वारस्य नसावे, असे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब रघुनाथ बोबडे,रा.इसारवाडी, ता.पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका,ग्रुप ग्रामपंचायत,इसारवाडी,ता.पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६०९
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,<br>रा.अंबाजोगाई, जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी,<br>स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व<br>महाविद्यालय,अंबाजोगाई,जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीष्ठाता,<br>स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व<br>महाविद्यालय,अंबाजोगाई,जि.बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातच उपलब्ध असलेल्या माहितीबद्दल मुदतीत निर्णय न घेऊन पत्रव्यवहार न करता ३० व्या दिवशी पैसे भरण्याकरिता पत्र दिले. माहितीसाठी शुल्क रु.११८/- भरले असता, चुकीची, दिशाभूल करणारी, अपूरी माहिती दिली, अर्ज दाखल झाल्यावर मागच्या तारखेचे दस्तावेज तयार करणे, छायांकित प्रतीकरिता प्रत्यक्षात ३० पैसे खर्च येत असताना रु.२/- प्रमाणे आकारणे, अधिकाऱ्याचे

दस्तऐवजावर नोंद न करणे, असंयुक्तीक फीची वसूली करणे, सात दिवसांत माहिती पुरविता येत असताना टाळाटाळ,दिरंगाई,निष्काळजीपणा,चुकीची दुरुस्ती करुन नवीन दस्तावेज तयार करणे व कर्मचाऱ्यांना पाठीशी घालून अपील करण्यास भाग पाडणे याबद्दल त्यांना अधिनियमातील कलम २०(१) नुसार २५,०००/- रुपये दंड तसेच शासकीय दंड व नुकसानभरपाई म्हणून प्रत्येकी रु.५०००/- इतके आकारावे व अधिनियमातील कलम २०(२) प्रमाणे त्यांची शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करावी, अशी विनंती केली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे, कार्यालयीन कामकाजात भ्रष्टाचार दिसून येत असल्याने विभागीय पोलीस भ्रष्टाचार निबंधक कार्यालय,औरंगाबाद यांनी किंवा अधीक्षक पोलीस भ्रष्टाचार निबंधक कार्यालय,बीड यांच्याकडून गुन्हा नोंद करण्याकरिता शिफारस करण्यात यावी, असे नमूद करुन आयोगास पुढे असे अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणी व अपील निर्णय न्यायकवित पध्दतीने न घेता वरिष्ठ अधिकारी व सर्व विभागाचे प्रमुख यांच्या कर्तव्यावर पडदा घालून कायद्याची अवहेलना केली आहे. त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई करण्याकरिता मा.राज्यपाल साहेबांना शिफारस करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय,अंबाजोगाई जि.बीड येथे रुग्णालय व कॉलेजकरिता औषध,गाद्या,दैनंदिन लागणारे खाद्यपदार्थ व इतर साहित्य खरेदी केले जातात व त्यासाठी स्थापन केलेल्या विविध समित्यांबाबत व या समित्यांमार्फत केलेल्या खर्चाची माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये,- "जानेवारी, १९९५ ते डिसेंबर, २००६ या कालावधीतील मेडीकल स्टोअर खरेदी समितीचे वर्षनिहाय लेखी माहिती, याच कालावधीतील सामान्य जनरल स्टोर येथील खरेदी समितीचे वर्षनिहाय माहिती, याच कालावधीतील पाकशाळा समिती, निविदा उघडतेवेळी उपस्थित अधिकारी, खाद्यपदार्थ तपासणी करणाऱ्या पदाधिकाऱ्याच्या नावाची वर्षनिहाय लेखी माहिती,

जानेवारी, १९९८ ते डिसेंबर, २००६ या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय येथे गाद्या,उशा,कापूस खरेदी निविदा मागविण्याकरिता केलेला पत्रव्यवहार व निविदा काढतेवेळेस सही केलेल्या अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांच्या नावासह वर्षनिहाय माहिती व गाद्या,उशा तयार करणे व कापूस खर्चाबाबत जानेवारी, १९९९ ते डिसेंबर, २००६ या कालावधीतील हुसेन गादी घर यांना अदा केलेल्या रोख रकमेचे दिनांकाची लेखी माहिती व रोख रक्कम मिळाल्याच्या पावत्यांची छायाप्रत "- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटी रु. ११८/- इतके शुल्क आकारुन एकूण ६४ पृष्ठांची माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या कथित निर्णयाद्वारे कोणताही निर्णय दिला नसून अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जातील प्रत्येक मुद्यावर त्यांचे अभिप्राय नोंदविल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कथित निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस संपूर्ण माहिती त्यांनी दि. ७.३.२००७ रोजी सशुल्क व दि. ३०.४.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे स्पष्ट केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वाईट उद्देशाने

माहितीची मागणी करीत असतात व वारंवार कार्यालयीन कामकाजात दबावतंत्र वापरुन अडथळे आणत असतात.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दोन टप्प्यात संपूर्ण माहिती दिली असून अपिलार्थीच्या दि. १६.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. ३०.४.२००७ रोजी निर्णय दिला.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती सत्य व अचूक आहे व ती त्यांनी तपासली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. ६.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी ३० व्या दिवशी पत्र देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवावयाचे असते. त्याप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २९ व्या दिवशी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविले आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष असल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांच्या कार्यालयात झेरॉक्स मशीन असून कार्यालयास माहिती देण्याकरिता ३० पैसे प्रतिपृष्ठ इतका खर्च येत असताना अपिलार्थीकडून मात्र प्रतिपृष्ठ रु. २/- माहितीसाठी आकारणी केली असल्याची तक्रार अपिलार्थीने आयोगाकडे केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २७ व कलम २ नुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी आकारावयाच्या शुल्काचा दर राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्याकडील अधिसूचना शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आर. टी. आय. २००५/ सी. आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ नुसार निश्चित केला असून

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दारिद्रयरेषेखालील व्यक्ती वगळता इतर कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास ही माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत या अधिसूचनेद्वारे विहित केलेल्या दराने प्राप्त करुन घ्यावी लागेल, ही त्यामधील तरतुद पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ रु.२/- हा दर आकारावयाची जन माहिती अधिकारी यांची कृती बरोबर आहे. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर आपले स्वतःचे अभिप्राय नोंदवून ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. मात्र ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर अनुपस्थित आहेत. त्याचबरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने अर्जातील सर्व मुद्यांद्वारे सर्वसाधारणपणे मोघम स्वरुपात माहिती विचारली आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "-----वर्षनिहाय लेखी माहिती" अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. मात्र लेखी माहिती म्हणजे निश्चित कोणत्या मुद्यावरील माहिती याचा उल्लेख अपिलार्थीने या भागामध्ये केलेला नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस मूळात देय होत नाही, एवढे असूनही अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये केलेल्या वाढीव व्याप्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.४.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे.अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आयोग आदेशित करीत नाही. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाबद्दल काही अभिप्राय व्यक्त केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०.४.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीने

त्यांच्याकडे प्रथम अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा समाचार घेतल्याचे दिसून येत आहे. या सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर होते. अपिलार्थीने या सुनावणीमध्ये निश्चितपणे त्यांचे कोणते आक्षेप तोंडी युक्तीवादामध्ये नमूद केले आहेत, हे अपिलार्थी आज गैरहजर असल्यामुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी दिलेल्या निर्णयावर फक्त एवढेच म्हणता येईल की, त्यांनी दिलेला कथित निर्णय हा निर्णय होत नसून ते अपिलार्थीबरोबर घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना येथे असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाल्यानंतर त्यांचे स्पष्ट आदेश त्यांच्या निर्णयाच्या शेवटी वेगळयाने नमूद करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, जेल कॉर्नर,पहिला माळा,साईबाबा मंदिरासमोर,अंबाजोगाई, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीष्ठाता,स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१०
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, : अपिलार्थी
रा. परळी वैजनाथ, जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बीसीयुडी),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : श्रीमती व्ही.व्ही.देशपांडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांना शास्तीसह शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी व त्यांच्या दि.

२१.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी मागणी केलेली सत्य माहिती त्यांना मिळविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २१.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, समकक्षतेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली. परंतु या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०१.२००८ रोजी अंतिम निर्णय घेऊन अपिलार्थी दोन वेळेस सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांना माहिती मिळविण्यात रस नाही, असे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दि. ३०.८.२००७ रोजी विनामूल्य पुरविली असून त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने एम.ए.सोशॉलॉजी ही पदवी प्राप्त केली असून या पदवी परीक्षेमध्ये त्यांना ५५ टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्याने त्यांना सोशॉलॉजी या विषयाकरिता अधिव्याख्याता म्हणून नेमणूक देता येत नाही. अपिलार्थी हे एम.एस.डब्ल्यू ची पदवी उत्तीर्ण झाले असून एम.एस.डब्ल्यू ची परीक्षा उत्तीर्ण होणे हे एम.ए.(सोशॉलॉजी) शी समकक्ष मानण्यात येत

नाही. अपिलार्थीने यासंदर्भात विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे देखील अर्ज केला होता. तथापि तक्रार निवारण समितीने अपिलार्थीची मागणी अमान्य केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात केली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही व त्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत होते व त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती देय होत नाही, एवढे असूनदेखील जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.८.२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात योग्य तो खुलासा केला आहे. त्यांच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ०५.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ४.१२.२००७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली. तथापि सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिले, यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी परत दि. ९.१.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, याही सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये रस नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे समकक्षतेच्या या प्रश्नासंदर्भात वेळोवेळी अशाच प्रकारची द्वितीय अपिले केली आहेत. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या वैयक्तिक गाऱ्हाण्याचा निपटारा राज्य माहिती आयोगाच्या माध्यमाने करुन हवा असल्याचे दिसून येते. मात्र त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठीची

मांडणी ते त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये योग्य तऱ्हेने करीत नाहीत, तसेच त्यांच्या वैयक्तिक गाऱ्हाण्याकरिता वेगळे सक्षम प्राधिकरण अस्तित्त्वात असल्याने, अपिलार्थीने त्यांच्यामार्फत त्यांच्या गाऱ्हाण्याची तड लावावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली मूळ माहिती ही वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,रा. कनकदंडे निवास,सरकारवाडा,अंबावेस,परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बीसीयुडी),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६११
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, : अपिलार्थी
रा. परळी वैजनाथ, जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बीसीयुडी),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : श्री.एच.व्ही.देशमुख

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३१.०१.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न देऊन जाणूनबुजून कायद्याची पायमल्ली केल्याने त्यांनी दि. ८.१२.२००६

रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले असता, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न देऊन माहिती अधिकार कायद्याची क्रूर चेष्टा करुन कायद्याचा विश्वासघात केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१०.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, समाजशास्त्र व समाजकार्य या विषयाच्या समकक्षतेसंदर्भात एकूण ९मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. मात्र अपिलार्थीस अपेक्षित पत्र/माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दि. १७.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. त्यांना ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविली असून, ही माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे, यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.११.२००६ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे आणि हा प्रतिसाद अपिलार्थीस दिल्याच्या संदर्भात त्यांनी योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे व त्यांनी आयोगास सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने किंवा माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अधिनियमातील कलम १९(६) नुसार जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर दि. ०३.१.२००७ रोजी अगर दि. १८.१.२००७ पूर्वी (वाढविलेल्या कालावधीच्या कारणाच्या लेखी उल्लेखासह) सुनावणी घेऊन निर्णय घेणे अभिप्रेत होते. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी पाच महिन्यांचा विलंब लावून अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडील दि. ७.६.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे निकाली काढले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, या पत्रामध्ये मुद्दा क्र. ३ व ८ द्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काहीशी चुकीची व अर्धवट माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने,"प्रस्ताव प्रलंबित होण्यास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची संपूर्ण नावे व पद." ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली होती. मात्र यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, "मान्यतेबाबत आपणास खुलासा कळविण्यात येईल व अपिलार्थीने दि. ७ जून २००७ रोजीच्या सुनावणीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दस्तऐवजानुसार कार्यालयीन कार्यवाही होईल",

असे कळविले. या उत्तरात अपिलार्थीचा संदर्भिय प्रस्ताव प्रलंबित राहण्यासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व पद याची माहिती नाही. जर यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली नसेल तर, या प्रकरणी अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस तसे कळविले नाही. तसेच अपिलार्थीस मुद्दा क्र. ८ (मूळ अर्जातील मुद्दा क्र.९) शी संबंधित दिलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर अर्धवट आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ द्वारे, "मान्य रोस्टरनुसार कोणत्या विषयाच्या जागा ३ टक्के अपंगासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत? " अशी माहिती विचारली होती. तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी " अपंगाचे आरक्षण हे समांतर असते,आरक्षित किंवा खुल्या प्रवर्गातून सदरील ३ टक्के आरक्षण भरले जाते" अशी माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. मात्र अपंगांसाठी राखीव जागा व विषय यांचा कोणत्याही प्रकारे संबंध येतो किंवा अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे कोणत्या विषयावर अशाप्रकारच्या जागा राखीव ठेवल्या जातात याची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,५,६ शी संबंधित माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय नाही. मात्र ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उत्तराच्या स्वरुपात दिली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ४.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) चा, अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीत सुनावणी न घेऊन, भंग केल्याचे याप्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी त्यांनी पाच महिने इतका प्रदीर्घ कालावधी घेतलेला आहे. सुनावणीसाठी वेळ लावणे म्हणजेच निर्णय नाकारणे असे मानावे लागेल. या मुद्यावर कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी विद्यापीठाकडील वेगवेगळया

कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी हे अर्जदारास वेळीच माहिती देतात किंवा कसे, व तसेच जन अपिलीय अधिकारी हे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अर्जदाराच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देतात किंवा कसे, याबाबत त्यांच्या स्तरावर एक सूचनावजा परिपत्रक जारी करावे व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची विद्यापीठामध्ये खऱ्या अर्थाने व आशयाने अंमलबजावणी होईल, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ८ च्या संदर्भातील उर्वरित माहिती, निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,रा. कनकदंडे निवास,सरकारवाडा,अंबावेस,परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (शैक्षणिक विभाग),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ (बीसीयुडी),डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१२
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलास माधवराव चव्हाण,<br>रा. लोहा (जुना) ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, लोहा,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज देऊनही त्यांना ३८ दिवस इतका कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अर्ज दिल्यापासून ५८ दिवसांनंतर दि. १६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देवविली होती. जन माहिती

अधिकारी यांच्याविरुध्द जन अपिलीय अधिकारी यांनी कारवाई केली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. आज रोजी सुनावणीस हजर राहण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि. १३.०३.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि.२५.०३.२००९ रोजी ठीक ०५.३५ वा. त्यांच्या कार्यालयातील श्री.चंदू ए.सी.,कार्यालयीन अधीक्षक, जि.प.शिक्षण विभाग यांच्यामार्फत सुचना देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १८.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सर्व शिक्षा अभियानाची आर्थिक वर्ष २००६-०७ मधील काही माहिती त्यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. माहितीसाठीचा अर्ज करुन ३० दिवसांचा कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन निकाली काढले. सदर सुनावणी वृत्तांत अपिलार्थीस दि. १९.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीचे इतिवृत्त पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सुनावणीच्या दिवशी म्हणजेच दि. १६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः प्राप्त झाली आहे.

या इतिवृत्तामध्ये असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या सुनावणीच्या वेळी त्यांनी अपिलार्थीस दि. १८.९.२००७ रोजी माहिती पाठविल्याचा कोणताही सबळ पुरावा सादर केला नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे अपिलार्थीस दि. २५.९.२००७ रोजी माहिती पाठविली आहे. यासंदर्भातील पोस्टाची नोंद जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळी सादर केली असावी, असे दिसून येते. यावरुन आयोग असा निष्कर्ष काढत आहे की अपिलार्थीच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.प्राप्त माहितीच्या दर्जाबाबत अपिलार्थीचे कोणतेही आक्षेप नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी ५८ दिवसांचा विलंब लागल्याचे नमूद केले आहे. या मुद्यासंदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जास मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती पाठविण्यासाठी तीस दिवस इतका कालावधी अनुज्ञेय आहे. हा अनुज्ञेय कालावधी विलंबाच्या कालावधीमध्ये धरण्यात येत नाही. अनुज्ञेय कालावधीनंतर माहिती देण्यासाठी लागलेला प्रत्येक दिवस हा विलंबाचा दिवस म्हणून समजण्यात येतो, हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सात दिवसांचा विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. तसेच येथे अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे किंवा त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे अधिकार नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी याप्रकरणी अपिलार्थीस सात दिवसांच्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.१७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी

हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना एकूण रु.१७५०/- शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास माधवराव चव्हाण, रा.लोहा (जुना) ता.लोहा,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१३
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नौनिहाल ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
नौनिहाल एज्युकेशन सोसायटी, नांदेड.
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०६.०८.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी ती विहित मुदतीत न दिल्याने जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नौनिहाल एज्यूकेशन

सोसायटी, यांच्याकडे पोस्टाने प्रथम अपील पाठविले, तरीही त्यांना माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ होत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, याप्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेमध्ये सन २००० ते २००७ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांसाठी खरेदी केलेल्या शालेय शैक्षणिक साहित्य बिलांच्या सत्यप्रती, तसेच शालेय शैक्षणिक साहित्य, किती,कशाप्रकारे,कोणास वाटप करण्यात आले किंवा त्या साहित्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला , तसेच विविध योजनेअंतर्गत ४ थी ते ७ वी पर्यंतच्या किती लाभधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली, त्या विद्यार्थ्यांच्या नाव व स्वाक्षरी सह सत्यप्रती, शासनाच्या नियमानुसार व शैक्षणिक कायद्यानुसार वर्षात दोन वेळेस पालक मेळावे घेतल्याचे व पालक मेळाव्यास उपस्थित असलेल्या पालकांच्या नावासह व स्वाक्षरीसह रजिस्टरमधील नोंदीची सत्यप्रत अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे दि. ०७.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जरी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज पाठविला असला तरी यासंदर्भातील योग्य तो पुरावा त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही. तसेच आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये सर्व शिक्षण संस्थेकरिता जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील

अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडून प्रथमतः सुनावणी होणे आयोगास अगत्याचे वाटते.

सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,नांदेड यांना अपिलार्थीच्या मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जाची प्रत देण्यात येऊन असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपले अंतिम निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०७.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल,रा. समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नौनिहाल ऊर्दू प्राथमिक शाळा, खडकपूरा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष,नौनिहाल एज्यूकेशन सोसायटी,चैतन्यनगररोड नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दि ०७.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६१८
निर्णय दिनांक ०२-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती जयश्री तातेराव लामतुरे,<br>रा. अहमदपूर जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी,<br>निलंगा, जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय वन अधिकारी,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०४.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.११.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्याची बाजू घेऊन चुकीचा व एकतर्फी निर्णय दिला आहे. त्यामुळे संबंधितावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- निलंगा परिक्षेत्रामध्ये रोहयोंतर्गत विविध कामावरील तालुका व गावनिहाय कामाच्या प्रकारासह रो.ह.यो.कामावरील सर्व हजेरीपटाच्या छायाप्रती, संबंधित कामनिहाय कर्मचाऱ्यांची नावे व पत्ता - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६-२००७ असा होता.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता, अपिलार्थीस अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कृतीमुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत, तसेच आज रोजी सुनावणीस हजर राहण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि. ०५.२.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि.२६.०३.२००९ रोजी १२.४० वा. त्यांच्या कार्यालयातील श्री.देशपांडे, व.लि.यांच्यामार्फत सुचना देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय घेतलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात सादर केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे

त्यांनी केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबतच्या कागदपत्राबरोबर जोडला नाही, हे पाहता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.१०.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर निर्णय होणे आयोगास अगत्याचे वाटते, सबब, जन अपिलीय अधिकारी यांना यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०१.१०.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत स्वतः किंवा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित नियुक्त जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०१.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती जयश्री तातेराव लामतुरे,द्वारा संजयभाऊ जयराम कांबळे,इंडिया एस.टी.डी.तहसीलसमोर,अहमदपूर जि.लातूर-४१३ ५१५.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,निलंगा, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद यांना, अपिलार्थीच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२१

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. साहेबराव प्रेमचंद क्षीरसागर, अपिलार्थी
मु. खुडसरगांव, पो. पाथरे खुर्द, तालुका राहुरी, जिल्हा
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खुडसरगांव,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी,
तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०४-२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये त्यांना विचाराधीन अपिलासंदर्भातील मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून लेखी स्वरुपात मिळाली असल्याने त्यांची आता काहीही तक्रार राहिलेली नाही असे नमूद करुन पुढे विचाराधीन अपील रद्द करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२१/२००८, दिनांक ११-०९-२००८ खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साहेबराव प्रेमचंद क्षीरसागर, मु. खुडसरगांव, पो. पाथरे खुर्द, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खुडसरगांव, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक १२२/०८, १२३/०८, १२४/०८ व १२५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२, १२३, १२४ व १२५

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. किशोर नामदेवराव गुणवरे, अपिलार्थी

प्लॉट नं. १२४, न्यू आशिष कॉलनी, कॉटेज कॉर्नर,

फार्मसी कॉलेजमागे, सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, श्रीगोंदा उपविभाग, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्जत विभाग, कर्जत, तालुका कर्जत,

जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी दाखल केलेली तीन व्दितीय अपिले (अपील क्रमांक १२२/०८, १२३/०८ व १२५/०८) व दिनांक ०१-०८-२००८ रोजी दाखल केलेले एक अपील (अपील क्रमांक १२४/०८) अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दाखल केलेली चार अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या सर्व अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या मीटर रीडींगसंदर्भात काही माहिती मागविली असता ती त्यांना प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कर्जत विभाग, कर्जत यांच्याकडे प्रथम अपिले केली. परंतु या अपील अर्जांवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करेपर्यंत संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

अपिलार्थीच्या या सर्व अपिलांशी संबंधीत मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील तांत्रिक क्लिष्टता तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खाजगी कंपनीने तयार केली आहे हे लक्षात घेता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे या टप्पावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या तीन प्रथम अपील अर्जांवर व दिनांक १०-०५-२००८ रोजीच्या एका प्रथम अपील अर्जावर (अपील क्रमांक १२४/०८), हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत, झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. या सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती ज्या खाजगी कंपनीने तयार केली आहे त्या कंपनीच्या सक्षम अधिका-याचे म्हणणे लक्षात घ्यावे. सुनावणीचे पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या प्रस्तावित दिनांकाच्या पूर्वी किमान सात दिवसाच्या आधी प्राप्त होईल याची दक्षता जन अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली चारही व्दितीय अपिले (अपील क्रमांक १२२/०८, १२३/०८, १२४/०८ व १२५/०८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १२२/०८, १२३/०८, १२४/०८ व १२५/०८ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२.	जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या उपरोक्त प्रकरणी त्यांनी दाखल केलेल्या चार प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अहमदनगर	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०४-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. किशोर नामदेवराव गुणवरे, प्लॉट नं. १२४, न्यू आशिष कॉलनी, कॉटेज कॉर्नर, फार्मसी कॉलेजमागे, सावेडी, अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, श्रीगोंदा उपविभाग, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कर्जत विभाग, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२६

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याकडे काही माहिती मागितली असता ती माहिती देण्यासाठी संबंधीत प्राचार्यानी त्यांना, त्यांचे महाविद्यालय शासकीय प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नसल्याने आणि

अपिलार्थीस माहिती उघड केल्यास अधिनियमातील कलम ८ (त्र) चा भंग होत असल्याचे कारण दाखवून त्यांना माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे त्यांनी पुणे विद्यापीठाचे संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, यांच्याकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपिलावर, त्यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे प्राचार्य, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर कोळपेवाडी, तालुका कोपरगांव यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाविषयी एकूण आठ वेगवगळ्या मुद्दयावर ऑगस्ट २००२ ते मार्च २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व प्राध्यापकांना UGC प्रमाणे देण्यात येणारी वेतनश्रेणी, सर्व प्राध्यापक NET अथवा SET परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याबाबतच्या झेरॉक्स प्रती, प्राचार्याचे PHD पास प्रमाणपत्र, सर्व प्राध्यापकांना पदवी व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण आहे काय अथवा B + श्रेणी दिली आहे काय त्याच्या झेरॉक्स प्रती, प्राध्यापकांच्या वेतनाच्या इतर भत्त्यासह तपशील, विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्राध्यापकांची नांवे, SC/NT पैकी कोणत्या वर्गातील प्राध्यापक आहेत त्यांच्या वर्गाचा तपशील व नांवे व नोव्हेंबर २००७ मध्ये विद्यापीठाकडून महाविद्यालयास प्राप्त झालेल्या पत्राच्या झेरॉक्स प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने दिनांक २६-०३-२००९ रोजी ०५-०० वाजता दूरध्वनीव्दारे गट शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना या माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अपिलार्थीस त्यांचे महाविद्यालय विनाअनुदानित असल्यामुळे व अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती उघड केल्यास अधिनियमातील कलम ८ (त्र) चा भंग होत असल्याने माहिती देण्याचे नाकारले. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षेसाठी पाठविले जाते. हे महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्नीत असून

पुणे विद्यापीठाचे त्यावर नियंत्रण आहे. या महाविद्यालयातील प्राध्यापकांची मान्यता या विद्यापीठाच्या सहमतीने होणे विद्यापीठ नियमानुसार अभिप्रेत आहे. त्यामुळे जरी हे महाविद्यालय शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त करुन घेत नसले तरी पुणे विद्यापीठ जे केंद्र शासनाच्या " विद्यापिठ कायदा " नुसार स्थापन झालेले आहे. त्यांचे त्यावर नियंत्रण आहे. अधिनियमातील कलम २ चे अवलोकन करता त्यामध्ये, " ---------------------------- - समुचित शासनाची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्याच्याकडून भरीव वित्त पुरवठा केलेली संस्था" असे म्हटले आहे. ही संस्था धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी झालेली संस्था आहे. अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे म्हटले आहे की, " ---------------------------------- त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती " या व्याख्येवरुन अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे ती संस्था जरी खाजगी असली तरी त्यावर पुणे विद्यापीठ जे विद्यापिठ कायद्यानुसार स्थापन झाले आहे, त्याचे नियंत्रण असल्याने तसेच विद्यापिठ कायद्याच्या तरतुदीचे विचाराधीन महाविद्यालय पालन करत असल्याने या महाविद्यालयास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व तरतुदी तंतोतंत लागू होत आहेत. या महाविद्यालयाची माहिती धर्मादाय आयुक्त हे प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे वरील संस्थेवर शासनाचे प्रतिनिधी म्हणून अशा प्रकारच्या संस्थेवर नियंत्रक म्हणून काम करण्यास त्यांना प्रत्यवाय नाही. आयोगाने यापूर्वी सर्व खाजगी शिक्षण संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ कशा प्रकारे लागू होतो याचे सविस्तर विवेचन त्यांच्या अनेक निर्णयामध्ये केलेले आहे. यावरुन माहिती अधिकार अधिनियम २००५ हा या संस्थेस कसा लागू होतो हे स्पष्ट होते.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतून कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी बाबीत अगंतूक हस्तक्षेप होईल असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे या माहितीचे सार्वजनिक स्वरुप, या बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उघड करण्याचे नाकारतांना अधिनियमातील कलम ८ (त्र) चे दिलेले कारण या प्रकरणी लावणे येथे योग्य होणार नाही.

वरील प्रकारे अपिलार्थीस माहिती नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कारणांचे होत असलेले निरसन पाहता, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव यांना असे आदेशित करण्यात येते की,

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ हे आपल्या महाविद्यालयास केवळ ते विनाअनुदानित असल्यामुळे लागू होत नाहीत ही संबंधित संस्थाचालकाची भावना चुकीची आहे. त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका कराव्यात. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना देखील असे सूचित करण्यात येते की, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत या सूचनांचे अनुपालन करतील असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गौतम एज्युकेशन सोसायटीचे, कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, गणेशखिंड, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२७

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, — अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, सुरेगांव ग्रामपंचायत सुरेगांव, तालुका
कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव, जिल्हा
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि प्रथम

अपिलाच्या सुनावणीमध्ये त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. व तसेच त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९७-२००२ या कालावधीशी संबंधीत, त्यांच्या कार्यालयाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार व सुरेगांवसह आसपासच्या गावांच्या पाणीपुरवठा याबाबत एकूण सात मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण सात मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १, २, ३ व ६ शी संबंधीत माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी व मुद्दा क्रमांक ४, ५, ७ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस सुनावणीमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देता येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व मुद्दा क्रमांक १, २, ३ व ६ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी व्यक्तिशः दिली. तथापि यासंदर्भातील योग्य तो पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने ही माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे आयोगासमोर सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. मात्र ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात व्यक्तिशः किती वेळा उपस्थित झाले त्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केलेला नाही. तसेच या अर्जातील माहिती घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केला आहे. माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एकूण सात मुद्यापैकी चार मुद्दयावरील माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्जावर झालेल्या सुनावणीच्या वेळी दिल्याचे आयोगास सांगत आहेत. मात्र या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, यातील मुद्दा क्रमांक पाच व्दारे अपिलार्थीने "मा. साखर आयुक्त यांनी मान्यता दिलेले पत्र" अशा प्रकारची मोघम माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्दयावर अपिलार्थीने या पत्राच्या विषयासंदर्भात आणि दिनांक याबाबत कोणताही तपशील न दिल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती, त्यांना ती मोघम स्वरुपाची असल्याने, देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक पाच वगळता) त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची अपेक्षा केली असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये याच कालावधीमध्ये व्यक्तिशः उपस्थित रहावे लागेल. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिका-याकडून विनामूल्य देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक पाच वगळता) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०४-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, सुरेगांव ग्रामपंचायत सुरेगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. अभिजीत सी. पूपल, अपिलार्थी

बंगला नं. ७, विवेकानंद हौसिंग सोसायटी, पाईपलाईनरोड,

सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी (महसूल)

कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी

कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपिलावर अद्यापपावेतो जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त झालेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बिगर शेती वसूली आदेशासंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला गेला नाही. या प्रकरणी असेही आढळून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांनाच उद्देशून केला होता. हे दोनही अर्ज उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे या अर्जांच्या प्रतींवरील कार्यालयाच्या शिक्क्यावरुन दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याबरोबर आणलेली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती त्यामध्ये समाविष्ट आहे काय असे विचारले असता, अपिलार्थीने ही माहिती त्यांना प्रथमतः तपासून घ्यावी लागेल व त्यानंतर आपले अभिप्राय व्यक्त करणे शक्य होईल असे आयोगास सांगितले. हे पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहील असे आयोगास वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, सदर निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत ते राज्य माहिती आयोगाकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अहमदनगर

दिनांक ०४-०४-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभिजीत सी. पूपल, बंगला नं. ७, विवेकानंद हौसिंग सोसायटी, पाईपलाईनरोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२९

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. बळवंत गोविंद पादीर, अपिलार्थी
मु. पो. हिंगणगांव,
तालुका जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हिंगणगांव,
तालुका जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर, तालुका
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने सदरचे अपील जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राच्या विरुध्द केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिंगणगांव ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील मंगल कार्यालयाच्या इमारतीबाबत दिनांक १८-०१-२००७ रोजीचे कामाचे आदेश, ब-१ निविदेची प्रत, मंगल कार्यालयाचे काम झाले किंवा नाही, मुदतीत झाले किंवा नाही व नकाशाची प्रत ही माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी युक्तिवाद केला. अपिलार्थीने त्यांना मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याबद्दल आयोगाकडे दिलगीरी व्यक्त केली व आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही आले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांना माहिती पोस्टाने हवी आहे किंवा समक्ष माहिती हवी आहे याबाबत कोणताही उल्लेख केला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कशा प्रकारे माहिती हवी आहे याचा खुलासा झाला नसावा. परंतु याचबरोबर असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी

इमारतीच्या कामाच्या आदेशाची प्रत (दिनांक १८-०१-२००७), बांधकामाचा नकाशा या व्यतिरिक्त उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत, कारणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे अर्जदारास अनुज्ञेय नाही. अपिलार्थीस देय माहिती त्यांना सात दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदरील इमारतीचे कार्यारंभ आदेश संबंधीत उप अभियंता यांनी दिल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती जर संबंधित उप अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधीत होती तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत संबंधित उप अभियंता यांच्याकडे पाठवून देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना येथे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नसल्याने आता ही माहिती संबंधित उप अभियंत्याकडून प्राप्त करुन घेऊन त्यांनी ती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये कोणताही प्रतिसाद न देऊन व त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कोणतीही कारवाई न करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर
दिनांक ०४-०४-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बळवंत गोविंद पादीर, मु. पो. हिंगणगांव, तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, हिंगणगांव, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३०

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. अयाज एस. एम. आय. अपिलार्थी

१६९२, झेंडी गेट, शनि गल्ली,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा निवासी नायब तहसीलदार,

तहसील कार्यालय, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, अहमदनगर,

जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या अर्जानुसार मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःस्सर टाळाटाळ केली असून त्यांना दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे निवडणूक ओळखपत्रासंदर्भात सन २००३ या कालावधीशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" २२९ अहमदनगर (दक्षिण) विधानसभा मतदारसंघाच्या १ ऑक्टोबर २००३ रोजी अस्तीत्वात असलेल्या मतदार यादीवरुन झेंडीगेट भागातील, यादी भाग क्र. ९५ घर नं. १६७३ मधील शेख अहमद अ. रज्जाक ओळखपत्र क्रमांक ०४०८३७७ या क्रमांकाचे मतदार ओळखपत्र नक्कल माहिती करीता मिळावे ०४०८३७७ मतदार ओळखपत्र नक्कल (सर्टीफाईड) मिळावे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सत्य माहिती देण्याचे टाळले असून दबावखाली जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. त्यांनी ज्या व्यक्तीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या व्यक्तीच्या नावाने दुसरीच व्यक्ती निवडणूक लढवून निवडून येत असून याव्दारे प्राप्त पदाचे सर्व लाभ घेत आहे व पर्यायाने जनतेची फसवणूक होत आहे त्यामुळे त्यांना, मूळ अर्जात त्यांनी मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांच्या क्रमांक ०४०८३७७ च्या ओळखपत्राची सर्टिफाईड नक्कल मागितली आहे, ती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. शेख

अहमद अ. रज्जाक यांच्या क्रमांक ०४०८३७७ च्या मतदार ओळखपत्राची नक्कल जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि सुनावणीच्या वेळी आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी असे अवगत केले की, सर्व संबंधीतांना मूळ निवडणूक ओळखपत्राची नेहमी एकच प्रत काढून देण्यात येत असते व ती प्रत संबंधित व्यक्तीकडे उपलब्ध असते. १९९४ साली मतदार यादीमध्ये मतदारांचे फोटो छापण्याचे काम सुरु झाले. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये ज्या मतदारांचे फोटो संबंधित यादी तयार करण्याच्या वेळी संबंधित एजन्सीकडे उपलब्ध झाले त्या मतदारांचे फोटो त्यांनी त्या यादीमध्ये छापले व जे फोटो त्यांना उपलब्ध झाले नाहीत ते फोटो त्यांनी छापलेले नाहीत. श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांच्या मतदार यादीतील नावाची तपासणी केली असता त्यांचे नाव मतदार यादीमध्ये आहे. नावासमोर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेला ओळखपत्र क्रमांक देखील छापलेला आहे. श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांचा फोटो मतदार यादीमध्ये आजतागायत छापला गेलेला नाही. आता काही कालावधीनंतर होणा-या लोकसभा निवडणुकीकरिता नव्याने अशा प्रकारच्या याद्या तयार करण्यात येत असून जर या यादीमध्ये श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांच्या नावासमोर जर फोटो छापला गेला असेल तर ते त्याप्रमाणे अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. ही यादी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ३ ते ४ दिवसात प्राप्त होण्याची शक्यता आहे. सबब तहसीलदार, अहमदनगर यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, लगेच सुधारित यादीत जर श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांचा फोटो जर त्यांच्या नावासमोर छापला गेला असेल तर ही प्रत त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयावर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, अहमदनगर यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये त्रयस्थ पक्षासंदर्भात व्यक्त केलेल्या अभिप्रायाप्रमाणे जर लोकसभा निवडणुकीकरिता करण्यात येणा-या यादीमध्ये श्री. शेख अहमद अ. रज्जाक यांचा फोटो छापला गेला नसेल तर त्यांनी या प्रकरणी गांभीर्याने विचार करुन संबंधितांवर कायद्याप्रमाणे आवश्यक ती कारवाई तातडीने करावी.

अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात नियमाप्रमाणे कारवाई करणे एवढीच प्रक्रिया समाविष्ट आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध असलेली माहिती जशीच्या तशी पुरविली असल्याने, ही माहिती देण्यास जन

माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती देण्यासाठी हेतुपुरःस्सर टाळले हा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर<br>
दिनांक ०४-०४-२००९

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अयाज एस. एम. आय. १६९२, झेंडी गेट, शनि गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक १३१/०८ व १३२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३१ व १३२

निर्णय दिनांक ०४-०४-२००९

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, अपिलार्थी
मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ <u>अपील क्रमांक १३१/२००८</u>
जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर

२ <u>अपील क्रमांक १३२/२००८</u>
जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक विभाग, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०४-०४-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक १३१/२००८ व अपील क्रमांक १३२/२००८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने मागणी केलेला विषय एकच असल्याने व अपिलार्थीने मूळ अर्ज व आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले ही एकाच दिवशी केली असल्याने आयोगातर्फे या दोनही अपिलांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

**<u>अपील क्रमांक १३१/२००८</u>**

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, " मौजे आखेगांव डोंगर येथील गट नंबर २०५ च्या मोजणी नकाशासंदर्भात मोजणी नकाशावर लाल पेनने रेषा काढल्या असून गट नंबर २०५, २०६ व २०७ चे मोजणी नकाशाचे गटनिहाय क्षेत्रफळ काढून देणे " अशा प्रकारची माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सविस्तरपणे विवेचनासह सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, ज्या नकाशातील दोन बिंदूमधील माहिती व क्षेत्रफळ त्यांना अपेक्षित आहे त्या नकाशाच्या मूळ प्रतीची अपिलार्थीकडे प्रथमतः मागणी केली व मूळ प्रती अपिलार्थीकडे उपलब्ध नसल्यास त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून नियमीत फीस भरुन प्राप्त करुन व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी योग्य त्या कारवाईस्तव सादर करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांना आयोगाने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न घेण्याची कारणे विचारली असता, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीच्या विचाराधीन प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीची पाहणी केली असता, अपिलार्थीने हा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केला असल्याचा कोणताही पुरावा त्यासोबत जोडला असल्याचे किंवा या अपील अर्जाच्या प्रतीवरुन जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कोणत्याही संबंधित लिपिकाची सही, शिक्का

त्यावर उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. यावरुन मूळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. अपिलार्थीने या अपिलाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या नकाशावर स्वतःच्या हाताने लाल रंगाने रेषा काढल्या असून त्या रेषांची मापे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहेत. ही लांबी नकाशावरील स्केलने अपिलार्थीस काढून घेता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना सूचित केले आहे व तसेच अपिलार्थीस ज्या भूखंडाचे क्षेत्रफळ जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होते त्या भूखंडाचा नकाशा व आकारबंधाच्या मूळ प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्यास त्यांनी अपिलार्थीस सुचविले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कोणतीही कारवाई अपिलार्थीने केलेली नाही.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती तयार करुन हवी आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहितीची मागणी करता येते. तथापि अपिलार्थीने या प्रकरणी स्वतः काही प्रश्न उपस्थित करुन यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तरे अपेक्षिली आहेत. अशा प्रकारच्या माहितीच्या देवाणघेवाणीची अथवा प्रश्नोत्तराची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहितीच अवैध ठरत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे केलेल्या अर्जास दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे आवश्यक तो खुलासा केला आहे आणि अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते कशा प्रकारे प्राप्त करुन घेऊ शकतील याचे योग्य ते मार्गदर्शन केले आहे. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही सुचनेचे पालन न करता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी व त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्याचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १३२/२००८**

अपिलार्थीने हे अपील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या अपिलाच्या संबंधात दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे आखेगांव डोंगर येथील गट नंबर २०५, २०६, २०७ शी संबंधीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मोजणी नकाशावर लाल रंगाने रेषा मारल्या असून त्या रेषांची व नकाशाच्या क्षेत्रफळाची मापे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहेत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००८ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, नकाशातील विहित केलेल्या परिमाणात त्यांनी मापे काढून घ्यावीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या या अपिलावर निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचे नमूद करुन, अमान्य केले.

सदर आदेश त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००८ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे पाठविले. या प्रकरणास देखील अपील क्रमांक १३१/२००८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व कारणमिमांसा तंतोतंत लागू होत आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे दिनांक ०६-०७-२००८ रोजी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय पाठविला असतांनाही (यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे) अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये या अपील अर्जावर निर्णय झाला नाही असे नमूद केले, आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३१/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२.	अपील क्रमांक १३२/२००८ फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०४-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३३
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. अरुण भाऊसाहेब कार्लेकर, : अपिलार्थी
मु.पो.चिखली ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
म्हसे माध्यमिक विद्यालय, म्हसे
ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. ३०.१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेले असता, त्यांनी रोख पैसे न घेता, बँकेच्या खात्यामध्ये पैसे भरण्याचे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी दि. १०.०३.२००८ रोजी सदर पैसे बँकेमध्ये भरले. पैसे भरुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन

अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे, तसेच शिक्षणाधिकारी यांच्याकडे पहिले अपील करण्यात आल्यानंतर त्यांनी ८ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचविल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली नाही.त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी त्यांनी या अर्जाच्या शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची, दि. २६.११.२००१ ते ३०.१.२००८ या कालावधीशी संबंधित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मान्यतेच्या शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रमाणित प्रती, या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश व रुजू रिपोर्ट यांच्या प्रमाणित छायाप्रती, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांनी दिलेल्या टक्केवारी अनुदान आदेशाच्या प्रमाणित प्रती व जून २००७ ते दि. ३०.१.२००८ पर्यंतच्या या कर्मचाऱ्यांच्या पगारपत्रकाच्या प्रमाणित प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेले असता त्यांनी हे शुल्क न स्वीकारता, अपिलार्थीस या शुल्काचा भरणा संस्थेच्या खात्यामध्ये बँकेत करण्यास सांगितले, त्यामुळे त्यांनी या शुल्काचा भरणा अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील शाळेच्या खात्यामध्ये केला, मात्र त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त झाली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.३.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कलम ११ प्रमाणे अडचण निर्माण झाली असल्याचे कळविले व अपिलार्थीस,

संबंधित कर्मचाऱ्यांची माहिती उघड करण्यासाठी त्यांची परवानगी घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी १० वीचा निकाल असल्याने ते अपिलार्थीचे प्रथम अपील सुनावणीस गैरहजर राहिले. अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या पत्नीच्या नावाने मागितली होती व स्वतः अपिलार्थीस ही माहिती संस्थेकडून यापूर्वीच दिली गेली असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित त्रयस्थ पक्ष त्यांच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, यांनी हरकत घेतल्याने अपिलार्थीस माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण झाला होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या, अपिलार्थीस त्यांनी यापूर्वीच माहिती पुरविल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कलम ११ ची अडचण होती, हा युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही, कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे जरी म्हटले असले तरी ज्या अर्जाच्या संबंधाने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे तो अर्ज अपिलार्थीने केला नसून त्यांची पत्नी सौ. मिरा अरुण कार्लेकर यांनी केला होता. अपिलार्थी व त्यांच्या पत्नी या दोन पूर्णपणे भिन्न व्यक्ति आहेत, त्यामुळे जरी एकच माहिती अपिलार्थी व त्यांच्या पत्नी यांनी दोन स्वतंत्र अर्जाद्वारे मागविली असली तरी या दोनही अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना स्वतंत्रपणे माहिती पुरविणे हे त्यांना अनिवार्य आहे. पत्नीस माहिती पुरविली म्हणून पतीस माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही, हे जन माहिती अधिकारी यांचे गृहीतक पूर्णतया चुकीचे आहे. विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीने त्यांच्या बँक खात्यात जमा केले, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावरील दि.२६.०६.२००८ रोजीच्या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती न पुरविण्याची जन माहिती

अधिकारी यांची कृती, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, त्यांनी केलेली टाळाटाळच अधिक स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ चा मुद्दा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात या प्रकरणात उपस्थित केला आहे, यासंदर्भात आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती प्राप्त करुन घेणे हा अपिलार्थीचा हक्क आहे. ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) व ९ च्या तरतुदीचा कोणत्याही प्रकारे भंग होणार असल्याची शक्यता या प्रकरणी दुरान्वयाने देखील संभवत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्याचे जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २६.६.२००८ रोजीच्या निर्णयानंतर ज्ञात झाले असूनही त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे सिध्द होत असल्याने आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून माहितीपोटीचे प्राप्त करुन घेतलेले शुल्क रु.३८०/- हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसांच्या आत परत करावे, असे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने, अध्यक्ष,श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व माहितीपोटीचे प्राप्त करुन घेतलेले शुल्क रु.३८०/- याच कालावधीत अपिलार्थीस परत करावे.

३. अध्यक्ष,श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण भाऊसाहेब कार्लेकर,मु.पो.चिखली,ता.श्रीगोंदा,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, म्हसे माध्यमिक विद्यालय, म्हसे ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, श्रीगोंदा तालुका कृषि सेवा संघ, म्हसे ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३४
निर्णय दिनांक   ०६-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. देशमुख मोईन अब्दुल्ल लतिफ,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : आरोग्य अधिकारी,
जिल्हा रुग्णालय,अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजीचे दि. १५.१२.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट स्वरुपात आयोगास विनंती केलेली नाही. परंतु त्यांना, "आवश्यक असलेली माहिती" या मुद्यासमोरील त्यांचे अभिप्राय पाहता, त्यांना अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील कर्मचारी त्रयस्थ पक्ष श्री. संजय ठोंबरे,यांच्या संबंधीची काही माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. संजय ठोंबरे यांच्यासंबंधी सन १९९० ते अपिलार्थीने अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंत एकूण ११ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "रुग्णालयात सेवेत असलेले कर्मचारी श्री. संजय ठोंबरे यांची कनिष्ठ लिपीक या पदावर नेमणूक केली होती त्या पदासाठी असलेली शैक्षणिक अर्हता, त्यांनी नोकरीला हजर होताना सादर केलेल्या कागदपत्रांची यादी व इतरही काही मुद्यांवर श्री. संजय ठोंबरे यांच्या व त्यांच्या कुटुंबियांविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. १३.०७.२००८ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज दि. १६.७.२००८ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाला. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जावर कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाकडूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी ज्या व्यक्तीविषयी माहितीची मागणी केली आहे, ती व्यक्ती भ्रष्टाचारी आहे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांनी यासंदर्भात आरोग्य उपसंचालक, नाशिक यांच्याकडे अर्ज केला असता, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते, परंतु अद्यापही ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त होऊ शकली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी, जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याची कारणे आयोगास सांगता आली नाहीत. तसेच अपिलार्थीच्या दि. १६.७.२००८ रोजीच्या प्राप्त प्रथम अपील अर्जावर निर्णय न देण्याची कारणे देखील जन अपिलीय अधिकारी यांना आयोगासमोर सांगता आली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमान्वये मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही स्वरुपाचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जातील एकूण ११ मुद्यांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये या अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ९ हे तीन मुद्दे वगळता, उर्वरित ८ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित असलेली माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) च्या तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमानुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपातील माहितीच देय होते. अर्जदाराच्या माहितीबाबतच्या शंकांचे प्रश्नार्थक मुद्यास उत्तरे देऊन शंकांचे निरसन करणे, अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीप्रमाणे माहिती मागणे व माहिती देणे यामध्ये अभिप्रेत नाही. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये त्रयस्थ पक्ष श्री. संजय ठोंबरे यांच्या काही खाजगी बाबींसंदर्भात माहिती मागविली आहे. उदाहरणार्थ, "त्यांचा पगार किती,त्यांच्या घरात किती व्यक्ती आहेत, लहान असतील तर त्यांचे शाळा,कॉलेज कोणते, स्थावर असलेल्या वाहनांचा तपशील (दुचाकी, चारचाकी), स्थावर असलेल्या संपत्तीचा तपशील उदा.घर, शेती, घरातल्या वस्तु," ही माहिती अपिलार्थीस उघड केल्यास कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. मात्र त्रयस्थ पक्ष यांच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप

होऊन अधिनियमातील ८(१)(ज) चा निश्चितपणे भंग होईल, अशी आयोगाची खात्री झाल्याने या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्रयस्थ पक्ष ज्या पदावर काम करीत आहे, त्या पदावरील सेवाप्रवेश नियमाच्या प्रती, त्रयस्थ पक्षाने नोकरीत रुजू होताना सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व त्यांच्या सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने, उघड करण्यास कोणाचीही हरकत असणे संभवत नाही, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ९ च्या संदर्भातील त्रयस्थ पक्षाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे व कसलाही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वा वृत्ती स्पष्ट केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे, सबब संचालक (आरोग्य सेवा), मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असेही त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली (मुद्दा क्र.१,२ व ९ शी संबंधित) संपूर्ण

माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक (आरोग्य सेवा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ,घर नं.२०/८,गजानन हौसिंग सोसायटी, जुना मुकुंदनगर, औरंगाबाद रोड,अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आरोग्य सेवा, ५ वा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३५
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. श्रीराम नागुशेठ धोत्रे, : अपिलार्थी
अहमदनगर,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपकार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कं.लि.शहर विभाग,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कं.लि.शहर विभाग,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २३.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दि. ०४.०४.२००९ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे व त्यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याने सदर अपील ते चालवू इच्छित नसल्याचे आयोगास सांगितले.

खुद्द अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झालेल्या कथित माहितीने समाधान झाले असल्याने, विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३५/०८, दि.२७.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीराम नागुशेठ धोत्रे,घ.नं.६८६०,चितळेरोड,मिरावली दर्ग्याच्या मागे,अहमदनगर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.लि.शहर विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.लि.शहर विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. बाळासाहेब भिवशेन काटे, : अपिलार्थी
मु.पो.आखेगाव डोंगर,ता.शेवगाव
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,शेवगाव
जि.अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
भूमी अभिलेख नाशिक प्रदेश
नाशिक.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक,
भूमी अभिलेख, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०६.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयाकडून दि ११.०८.२००८ रोजी प्राप्त झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अद्यापही दिली नसल्याचे व तसेच यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २७.१२.२००७ रोजी सूचना देऊनही जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे व अंतिमतः आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २२.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे आखेगाव डोंगर येथील संपूर्ण गावाच्या सर्व्हेनंबरबाबत त्यातील क्षेत्रफळाबाबत काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. यातील मुद्दा क्र.१ द्वारे त्यांनी "आखेगाव डोंगर येथील संपूर्ण गावाचा सर्व्हेनंबरचा नकाशा, " मुद्दा क्र. २ द्वारे, "मौ.आखेगाव डोंगर येथील गट नंबर २०५ ची व जमीन सातबारावर ३ हेक्टर ९७ आर असून सदरच्या गटनंबरची मोजणी दि.०६.७.१९९५ व दि.०९.१.२००१ रोजी झाली असता, सदरच्या प्रत्येकी मोजणी नकाशात १० आर. जमीन कमी दाखविण्याचे कारण" व मुद्दा क्र. ३ द्वारे, "तालुकानिरीक्षक भूमी अभिलेख,शेवगाव यांच्याकडे दि. ०७.०१.२००३ रोजीच्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दि.२८.१.२००३ पर्यंत जमिनीचे क्षेत्रफळ काढून दिलेले नसल्यामुळे सदरचे क्षेत्रफळ काढून (तपासून) मिळणे तसेच नक्कल फी व टपाल फी इ. कळविणे,"अशी माहिती मागविली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस गावाचा नकाशा, समक्ष फी भरुन घेऊन जाण्याचे सूचित केले. मात्र अपिलार्थीस त्यांच्या अर्जामधील ग.नं. २०५ च्या मोजणीसंदर्भात माहिती अपिलार्थीस तूर्त देता येणे शक्य नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. ०८.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, "अपिलार्थीने अपील अर्जात मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शेवगाव यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत तरी त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी" असे त्यांच्या

दि. २७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे उत्तर दिले. तथापि तदनंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १८.१०.२००७ रोजी प्रतिसाद दिला आहे, आयोगास त्यांनी पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांनी कोर्टाकडे सादर केली आहे, या माहितीची दुसरी प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ही माहिती त्यांना प्रथमतः कोर्टाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे गट नं.२०५चे क्षेत्रफळ मोजमाप करुन मागितले आहे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या जमीनीच्या हद्दीबाबत न्यायालयात वाद चालू असून या प्रकरणी सर्व कागदपत्रे कोर्टात दाखल करण्यात आलेली आहेत. त्यामुळे कोर्टाच्या आदेशाशिवाय ते त्याचे क्षेत्रफळ काढून देऊ शकत नाहीत.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भाने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने व जरी हे प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी ही माहिती देण्यासाठी कोणत्याही न्यायालयाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विशिष्ट असा प्रतिबंध न केल्याने, ही माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८(१) अथवा (९) मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होईल, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने १० आर इतके क्षेत्रफळ कमी का लावले, अशी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती त्यांना विचारली आहे, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती'

या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ७.१.२००३ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या भूखंडाचे क्षेत्रफळ काढून देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या विनंतीवर जन माहिती अधिकारी यांनी प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही त्वरेने करावी, असे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्जाचे याप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, अपिलार्थीस केवळ मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय होत असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आता विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब भिवशेन काटे,मु.पो.आखेगाव डोंगर,ता.शेवगाव जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,शेवगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.नानासाहेब शंकर लोखंडे,<br>ता. राहाता, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत तिसगाव,<br>ता.राहाता,जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती, राहाता,जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्याचे नमूद करुन ही माहिती त्यांना समाधानकारक का वाटत नाही, याबद्दलची कारणे दिली आहेत. अपिलार्थीने यासंदर्भात असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती तक्त्याच्या स्वरुपात प्राप्त झालेली नाही, खर्चबीलाच्या साक्षांकित प्रती नाहीत,

ठेकेदाराचे नाव व टेंडरबाबत माहिती नाही, या सर्व कारणास्तव त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अद्यापपावेतो समाधान झाले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४-०५ या कालावधीतील - "तिसगाव ग्राम पंचायतीमधील दिवाबत्ती खर्च,अंतर्गत रस्ता खडीकरण खर्च,तिसगावमधील गावठाण क्षेत्राचे माप, शालेय पाण्याची टाकी खर्चाचा तपशील,१२ वा वित्त आयोग, सार्वजनिक स्वच्छतागृह खर्च, स्मशानभूमी, पाण्याची टाकी इत्यादी खर्चाचा तपशील," - ही माहिती,एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०४.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी अपेक्षित माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे उपलब्ध करुन दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९((१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु हा अर्ज अपिलार्थीस विहित मुदतीत केला नसल्याचे कारण दाखवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील माहितीचे समर्थन करण्याकरिता आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भातील मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त "खर्चाचा तपशील" एवढीच माहिती प्रत्येक मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. "खर्चाचा तपशील" म्हणजे नेमके काय किंवा यासंदर्भात अपिलार्थीस कोणत्या

मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हवी आहे, याचा कोणत्याही प्रकारे निर्देश त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये केले नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्दे त्यांच्या प्रथम अर्जामध्ये समाविष्ट नाहीत. अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व बरोबर प्रतिसाद दिला असल्याने व अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीची मांडणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये योग्यरित्या न करता आल्यामुळे, माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. आज देखील सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांना अपेक्षित असलेली अतिरिक्त मुद्यांवरील माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळया अर्जाद्वारे मागितल्यास त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त होऊ शकेल. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर, या प्रकरणी कोणताही मुद्दा आता नव्याने उपस्थित होत नसल्याने, विचार करण्याचे प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नानासाहेब शंकर लोखंडे,रा. तिसगाव (प्रवरा) ता.राहाता,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तिसगाव,ता.राहाता,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, राहाता,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.नानासाहेब श्रावण ओहोळ,<br>रा.संगमनेर खूर्द ता.संगमनेर,<br>जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपनिरीक्षक,लोणी पोलीस स्टेशन,<br>ता.राहाता,जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपअधीक्षक,शिर्डी,<br>ता. राहाता,जि.अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहा.पोलीस निरीक्षक,लोणी पोलीस स्टेशन,ता.राहाता,जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय पोलीस अधिकारी, कोपरगाव विभाग (कॅम्प शिर्डी),जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०२.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांनी श्री. बाबासाहेब श्रावण व श्रावण पुंजा ओहोळ यांच्याविरुध्द दि. ०४.१२.२००५ ते २१.१२.२००६ पर्यंत १० अर्ज दिले असताना कार्यवाही का होत नाही, सन २००५ ते २००६ या कालावधीत आरोपीवर कार्यवाही का नाही, राजकीय दडपण किंवा आपले आर्थिक हितसंबंध, कार्यवाही कधी होणार" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जातील मागणी केलेल्या माहितीवरुन निश्चित स्वरुपाचा बोध न झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये सुस्पष्ट अर्ज करण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून एक पत्र लिहिले, या पत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भित केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात केलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००८ व २८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिलेल्या प्रकरणासंदर्भात त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांतील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात अर्जदाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये माहिती देण्यासंदर्भात समाविष्ट असल्याचे दिसून येते. 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत अथवा कृतीबाबत अर्जदारास स्पष्टीकरण करणे अथवा खुलासा करणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत नसल्याने, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे, असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, देय होत नसूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली आहे, हे वेळोवेळी अवगत केले आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.नानासाहेब श्रावण ओहोळ,रा.संगमनेर खूर्द ता.संगमनेर,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस निरीक्षक,लोणी पोलीस स्टेशन,ता.राहाता,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, कोपरगाव विभाग (कॅम्प शिर्डी),जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३९
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. विजय लक्ष्मणराव म्हस्के, : अपिलार्थी
अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,अहमदनगर जिल्हयातील अनुदानित शाळांची यादी, अनुदानित शाळांमधील

विद्यार्थी संख्या, अनुदानित शाळांमधील मंजूर शिक्षकांची संख्या, डी.एड्, बी.एड्, बी.पी.एड्./ एम.पी.एड्. कार्यरत क्रिडा शिक्षक अशी सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व विशिष्ट विवरणपत्रामध्ये अपेक्षिली होती, त्या विवरणपत्राचा नमुना त्यांनी या अर्जासोबत जोडला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जासंदर्भात त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. ०२.०६.२००८ रोजी एक पत्र प्राप्त झाले असून त्यामध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील यादीची झेरॉक्स प्रत त्यांच्या कार्यालयातून समक्ष घेऊन जाण्याचे सूचित केले व अपिलार्थीने ज्या विशिष्ट विवरणपत्रात माहिती मागितली आहे, त्या विवरणपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तसेच त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे शाळानिहाय विद्यार्थी संख्या यादीमध्ये नमूद नसल्याचे कळवून संबंधित संस्थेच्या मुख्याध्यापकांकडून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे उपस्थित आहेत. मात्र जन माहिती व अपिलीय अधिकारी हे त्यांना आयोगाच्या आज रोजी सुनावणीसाठी राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.१९.०३.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि. ३०.०३.२००९ रोजी ठीक १२.३५ वा श्री.सदाव्रते, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे उपस्थित

राहण्याच्या सूचना देऊनही, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असून त्यांनी अशाचप्रकारची माहिती २००५ साली जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता, त्यांना अशाच प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली होती. ते स्वत: बी.पी.एड्./एम.पी.एड्. असोशिएशनचे जिल्हाध्यक्ष असून शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रति २५० विद्यार्थी,एक शारीरिक शिक्षक या प्रमाणात नेमणूका न केल्या गेल्यामुळे त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी म्हणतात,त्याप्रमाणे जरी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असतील तरी ही माहिती आता त्यांना सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करुन घेऊन एकत्रितपणे अपिलार्थीस द्यावी लागेल, कारण या प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून या पत्राच्या प्रती अपिलार्थीस देणे भाग होते. परंतु त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही, अपिलार्थीच्या दि.०८.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात थोडासा प्रतिसाद दिला गेला. तथापि तो पूर्णत: सकारात्मक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण

माहिती  त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय एकूण ३५ दिवस इतक्या दीर्घ काळासाठी वंचित ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना  असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ३५ दिवस इतका प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.८७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित  होताच  तीस  दिवसांच्या आत  सरळ  आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन  खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून ३५ दिवस इतका प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.८७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ

नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय लक्ष्मणराव म्हस्के, सई, जाधवनगर,जाधव पेट्रोल पंपाशेजारी, नगर-कल्याणरोड, अहमदनगर, जि.अहमदनगर-४१४००१

२. जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक ) जिल्हा परिषद,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १४०/०८, १४१/०८ व १४२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४०,१४१ व १४२
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, : अपिलार्थी
रा.लोणी खूर्द,ता.राहाता
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ अपील क्र.१४०/०८ व १४२/०८

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>मुळा पाटबंधारे विभाग,अहमदनगर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक | : प्रतिवादी |

२ अपील क्र.१४१/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग क्र.१,<br>अहमदनगर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>पुणे पाटबंधारे मंडळ,पुणे |

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, अपील क्र. १४०/०८ व १४२/०८ या प्रकरणातील जन माहिती व अपिलीय अधिकारी, अपील क्र. १४१/०८ या प्रकरणातील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी नोंदविलेली दोन व दि. १५.०९.२००८ रोजी नोंदविलेले एक अशी एकूण तीन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अद्यापही दिली नसल्याचे नमूद केले आहे व तसेच यासंदर्भात अपिलार्थीने दि. २५.८.२००८ व १५.९.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले एकाच मूळ अर्जाच्या संदर्भात आहेत. त्यामुळे या तीन अपील अर्जांपैकी अपील क्र.१४०/०८ व १४२/०८ या दोन अपिलांची एकत्रितपणे व तदनंतर अपील क्र. १४१/०८ ची सुनावणी घेण्यात येत आहे.

**अपील क्र. १४०/०८ व अपील क्र.१४२/०८:**

उपरोक्त दोन द्वितीय अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ०५.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागविली असता, ही माहिती कार्यालयात तयार नसल्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कळविले. तथापि त्यांना हे मान्य न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. ११.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या गैरहजेरीत सुनावणी घेऊन निर्णय दिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि. ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाने ज्या कामाची बीले अदा केली होती, त्या कामाची नावे, किंमत, पूर्ण करण्याची मुदत,ज्या वरिष्ठ अधिकाऱ्याने कामास भेटी दिल्या त्यांचे नाव व हुद्दा, एकूण कामांची संख्या, उपविभागातील कार्यरत शाखा अभियंत्यांची नावे, शाखा अभियंता यांना नेमून दिलेली कामे व कार्यरत शाखा अभियंत्यांकडून पूर्ण झालेल्या कामांची माहिती, चालू असलेल्या कामांची माहिती, कंत्राटदाराचे नाव, कामाची किंमत व काम करण्यास देण्यात आलेली मुदत, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज करतांना प्रत्येक मुद्याच्यासमोर, "माहिती साध्या कागदावर देणे,माहिती आकडेवारीत देणे " अशाप्रकारच्या सूचना जन माहिती अधिकारी यांना केलेल्या आहेत. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे तयार नाही व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त उपलब्ध माहिती मिळू शकेल, असे कळविले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती तयार करुन मागविली असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद न देता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०७.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीच्या मागणीनुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशावर सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, कडा या अधिकाऱ्याची सही आहे.प्रत्येक अपील निर्णयावर जो अधिकारी सुनावणी घेण्यास सक्षम आहे, त्याच अधिकाऱ्याने अशाप्रकारच्या आदेशावर सही करणे अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून ज्या अधीक्षक अभियंता यांची विशेषत्त्वेकरुन नेमणूक करण्यात आली आहे. त्या अधिकाऱ्याने सही न करता या आदेशावर त्यांच्या सहायकाने सही करुन हे आदेश निर्गमित केले आहेत. सक्षम अधिकाऱ्याने या आदेशावर सही न केल्याने जन अपिलीय अधिकारी यांचे सदर दि.१०.०७.२००८ रोजीचे कथित आदेश अवैध ठरविण्यात येत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की,अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील प्रत्येक मुद्यावर "माहिती साध्या कागदावर देणे,माहिती आकडेवारीत देणे " या वाक्याचा अर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती तयार करुन हवी आहे, असा काढला व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती सशुल्क देण्यास ते तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दि. २३.८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे शुल्क रु.११२०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे दि. ०४.०६.२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे, अधिनियमातील कलम ७ (३)(क) प्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील कळविणे अपेक्षित होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस रु.११२०/- इतके शुल्क भरण्याचे त्यांच्या दि. २३.८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले असल्याने अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी शुल्क आकारणी करणे जन माहिती अधिकारी यांना अनुज्ञेय आहे हा युक्तिवाद, आयोगास मान्य नाही, कारण अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी दिलेला हा प्रतिसाद अधिनियमातील कलम ७(१) मधील विहित केलेल्या मुदतीनंतर दिला आहे. तसेच यामध्ये त्यांनी अपिलार्थीस शुल्काचा तपशील कळविला नाही, यामुळे मूळात हा प्रतिसाद कालबाहय व अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात देण्यासंबंधी कार्यवाही करावयाची असल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागत असताना, ती आकडेवारीत देणे अथवा साध्या कागदावर देणे, अशाप्रकारच्या सूचना त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे करु नयेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपील अर्जावर निर्णय देताना त्या आदेशावर त्यांनी स्वत: सही करणे त्यांना अनिवार्य आहे.

**अपील क्र. १४१/०८:**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे. नियमाप्रमाणे शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतरही त्यांना अशाप्रकारची अपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी एकूण रु.५५/- इतके शुल्क आकारले आहे. मात्र त्यांना, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५,६ व ७ शी संबंधित माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे पुरविणे भाग होते, मात्र या प्रकरणी

त्यांनी अपिलार्थीस या मुद्यांची माहिती दिली नसल्याचे त्यांच्याकडील अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीची तपासणी करता आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने या मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने व प्रथमतः अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याने आता ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पूर्णतः देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत असतानाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपूर्ण माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून त्यांनी सदर माहिती देण्यापोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५५/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५,६ व ७ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी व या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.५५/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपील क्र.१४०/०८,१४१/०८ व १४२/०८ ही तीनही अपिले, मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १४०/०८, १४१/०८ व १४२/०८ मान्य करण्यात येत आहे.
२. अपील क्र. १४०/०८ व १४२/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

कृ.मा.प.५...

३. अपील क्र. १४१/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,५,६ व ७ शी संबंधित माहिती आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.५५/- इतके त्यांना याच कालावधीत परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे,रा.लोणी खूर्द,ता.राहाता जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,मुळा पाटबंधारे विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग क्र.१,सिंचन भवन,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४३
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. सुनिल दयाकिसन बजाज, : अपिलार्थी
रा.राहुरी,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
नगर परिषद, राहुरी, जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, राहुरी,
जि. अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्य लिपीक,
नगर परिषद, राहुरी, जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००८ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाची दखल घेतली नाही व माहिती मिळविण्यासाठी व फी खुलाशासाठी विचारणा करण्यासाठी गेले असता, कर्मचाऱ्यांनी त्यांना उद्देशून "गेटआऊट" म्हणून शब्द वापरले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठी केलेल्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्याची तयारी दर्शविली व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५२८/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ०२.०८.२००८ रोजी प्रथम अपील सादर केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केलेली केलेली माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती देऊन माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली केली असल्याचे नमूद केले आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे झेरॉक्स प्रत देण्यासाठी त्यांना रु. ५००/- झेरॉक्ससाठी आकारणी करण्यात आली आहे, ही मागणी बेकायदेशीर व अपिलार्थीची लुट करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असल्याने अपिलार्थीस न्यायापासून वंचित राहावे लागत आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कारवाई करावी आणि अपिलार्थीस विनाकारण अर्ज, पत्रव्यवहार करणे, आर्थिक व मानसिक त्रास सोसावा लागला असल्याने संबंधितांकडून झालेल्या खर्चाची भरपाई अपिलार्थीस मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि.२१.७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देऊ केली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये बांधकामाच्या नकाशाच्या प्रतींचा समावेश होता. इतक्या मोठया

आकारमानाच्या प्रती काढण्याची सुविधा राहुरी नगरपालिकेच्या कार्यालयामध्ये अथवा राहुरी नगर पालिका क्षेत्रामध्ये नसल्याने ही प्रत त्यांना अहमदनगर येथून काढून घ्यावी लागली त्यामुळे याकामी लागलेल्या खर्चाची मागणी त्यांनी अपिलार्थीकडे केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, शासनाकडून त्यांना प्राप्त झालेल्या निधीचा तपशील त्यांना एकूण ३ शासन निर्णयाद्वारे प्राप्त झाला असल्याने सदर निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस देण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे, तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना या शासननिर्णयांची आवश्यकता नसून त्यांना नगर पालिका संचालनालयातर्फे नगर परिषदेस प्राप्त झालेल्या निर्णयाची प्रत हवी आहे. यासंदर्भात पूर्वी नगर परिषद संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या निर्णयाची प्रत प्राप्त झाली होती. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, याप्रकरणी त्यांना शासनाकडून सरळ निधी प्राप्त झाला आणि निधी वितरणाच्या आदेशाबरोबरच त्यांना शासनाकडून हा निधी डी.डी.द्वारे प्राप्त झाला असून हा निधी त्यांना दि. ०३.०४.२००८ रोजी प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात त्यांना नगर पालिका संचालनालयाकडून कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगास योग्य वाटते. नगर पालिका संचालनालयाकडील आदेश मूळात जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नसल्याने, ते अपिलार्थीस नगर पालिका संचालनालयाकडील आदेश उपलब्ध करुन देऊ शकणार नाहीत,हे उघड आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी अपिलार्थीकडून मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५२८/- याचा तपशील देखील त्यांनी अपिलार्थीस दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांनी अशाप्रकारचा तपशील या पत्राद्वारे अपिलार्थीस दिला नसल्याचे दिसून येते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ मध्ये माहिती देण्याचा

प्रतिपृष्ठ दर निश्चित केला आहे. हा दर ए/४ अथवा ए/३ या आकारमानाच्या प्रतीचा आहे. या पेक्षा जर वेगळे आकारमान असेल तर ही प्रत काढण्यासाठी प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांना जितका खर्च येईल तितके शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणे त्यांना भाग आहे. यावर उपाय म्हणून अपिलार्थीस पुरविण्यासाठी प्रस्तावित असलेल्या नकाशाच्या प्रतीमध्ये ए/४ या आकारमानाचे किती कागद बसतील,याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः विचार करुन अपिलार्थीस शुल्काची आकारणी करावी. जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस 'प्रोसेसिंग फी' अशाप्रकारच्या शुल्काची आकारणी नमूद केलेली आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की,माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अथवा शासनाच्या वरील परिच्छेदामधील संदर्भित केलेल्या अधिसूचनेमध्ये अशाप्रकारच्या शुल्क आकारणीची तरतुद समाविष्ट नाही.

जन माहिती अधिकारी यांना बांधकामासाठी शासनाकडून व नगरपालिका संचालनालयाकडून निधी प्राप्त होत असतो. या प्रकरणी तो शासनाकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस शासनाकडून त्यांना प्राप्त झालेला निधी ज्या आदेशाद्वारे प्राप्त झाला आहे, त्या आदेशाच्या प्रती दिल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही हेतूपुरस्सर चुकीची दिली असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही.

तथापि अपिलार्थी त्यांच्या शंका उपस्थित करुन जन माहिती अधिकारी यांच्या माहिती देण्याच्या मूळ हेतूबद्दल संशय व्यक्त करीत आहेत, ही अपिलार्थीची कृती बरोबर नाही. त्यांना या बांधकामाचा नकाशा दुसऱ्या संदर्भाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्तही झाला आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी परत एकदा वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ठरवून, त्याचा तपशील अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावा व तदनंतर त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसांच्या आत मूळ अर्जातील माहिती सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना वरील निर्णयाप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल दयाकिसन बजाज,रा.जंगमगल्ली,राहुरी,जि.अहमदनगर-४१३ ७०५.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक,नगर परिषद, राहुरी, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, राहुरी,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१४४
निर्णय दिनांक ०६-०४-२००९

१ श्री. विजयकुमार बापूराव बोरकर, : अपिलार्थी
अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.१,
अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
पाटबंधारे मंडळ, पुणे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २५.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आणि मागणी केलेली माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठी केलेल्या त्यांच्या दि. ०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध प्रकल्पासंदर्भात सन १९७० ते २००८ या कालावधीतील माहिती एकूण २१ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.१.२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८५४/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, त्यानुसार अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०४.०३.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ११.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपील सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दि. २२.०८.२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली. मात्र या माहितीने देखील अपिलार्थीचे समाधान झाले नसल्याचे आज सुनावणीमध्ये आयोगास दिसून आले आहे. अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या निकालानंतर दिलेली माहिती देखील अपूर्ण वाटत आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद करताना अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, पाटबंधारे खात्याचे के.टी.वेअरवरील भराव अतिवृष्टीमुळे वाहून गेल्यामुळे त्यांच्या जमीनीचे नुकसान झाले व हे नुकसान भरुन देण्याकरिता त्यांना वेगवेगळया अधिकाऱ्यांकडून आश्वासन दिले गेले, मात्र त्यांच्या जमिनीची पुनर्भरणी अद्यापही करुन न दिली गेल्यामुळे त्यांनी या प्रकरणी न्यायालयात दावा दाखल केला होता परंतु पाटबंधारे खात्याकडून सदर प्रकरणी योग्य ती कागदपत्रे कोर्टास सादर न केली गेल्यामुळे अपिलार्थीस योग्य नुकसान भरपाई कोर्टाकडून मंजूर होऊ शकली नाही. त्यांच्या जमिनीच्या पुनर्भरणीची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून केल्यास त्यांचा प्रश्न मिटू शकेल.

अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या शंका व जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेली माहिती यातील तांत्रिक गुंतागुंत पाहता, अपिलार्थीच्या या तक्रारीसंदर्भात मुख्य अभियंता, पाटबंधारे (जलसंपदा) विभाग पुणे यांनी, हे आदेश निर्गमित होताच नव्वद दिवसांच्या आत अपिलार्थीसोबत एक बैठक घेऊन यासंदर्भात आपले तांत्रिक आदेश निर्गमित करावेत व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी पुरविलेली माहिती ही त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील विनंती केलेल्या मुद्यांशी सुसंगत आहे किंवा कसे ते तपासून, त्यावर आपले निर्णय द्यावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०६-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजयकुमार बापूराव बोरकर,'सौभद्र', प्लॉट नं.८,पंकज हौसिंग सोसायटी, टी.व्ही.केंद्राच्या पूर्वेस,समतानगरजवळ,अहमदनगर-४१४ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग क्र.१,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता (जलसंपदा),जलसंपदा विभाग, सिंचन भवन,बारणेरस्ता,मंगळवार पेठ,पुणे-४११ ०११ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४
निर्णय दिनांक १३-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किशोर पोपट वडवकर,<br>मु.पो.आढळगाव ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>इन्स्पेक्टर,<br>रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>रयत शिक्षण संस्था,<br>सातारा. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय मिळाला नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील केले असता त्यानंतर प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने, विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने याप्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जून २००७ ते डिसेंबर, २००७ या कालावधीतील शिक्षण सेवकांच्या प्रस्तावासंदर्भात एकूण ९ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, संबंधित संस्थेच्या सचिवांकडून अपिलार्थीस काही माहिती प्राप्त झाली, मात्र प्राप्त माहितीतील काही मुद्यांवर समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे कोणाही अर्जदाराने माहिती मागविल्यास, ते संबंधिताचा अर्ज संस्थेच्या सचिवांकडे देतात व त्यांच्यामार्फत अर्जदारास ती माहिती दिली जाते. अर्जदारास त्यांनी त्यांच्या पातळीवर सरळ माहिती देणे हे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे, याची त्यांना कल्पना नव्हती. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार त्यांच्याकडे मागितलेली माहिती ते सरळ अर्जदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्याची दक्षता घेतील. अपिलार्थीचा दि. २०.०३.२००८ रोजीचा कथित अर्ज त्यांना प्रत्यक्षात दि. २९.०३.२००८ रोजी प्राप्त झाला. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे देखील, त्यांना प्रथम अपील ठरविण्याच्या कार्यपध्दतीची कल्पना नसल्याने त्यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षतः माहिती देणे पसंत केले, असा युक्तिवाद करण्यात आला.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीचा दि. २०.०३.२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दि. २९.३.२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला, त्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी स्वतः कोणतीही कार्यवाही केली नाही.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाकडे केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. कारण एकदा माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकाऱ्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी पूर्णतया माहिती असणे हे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. कोणाही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास, अशा अर्जावर कशाप्रकारे कार्यवाही करावयाची असते, याचे सुस्पष्ट विवेचन माहिती अधिकार अधिनियमामध्ये सविस्तरपणे दिले आहे. जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यास त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अर्जदारास देण्यासाठी त्यांना परत संस्थेच्या सचिवांकडे परवानगी मागणे अथवा त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारे संदर्भ करणे हे येथे अभिप्रेत नाही. याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या सहीने दि. २०.०५.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीने देखील अपिलार्थीचे समाधान झालेले नाही.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील त्रूटी त्यांच्याकडून नजरचुकीने राहिली असल्याचे आयोगासमोर कबूल केले. यावरुन अपिलार्थीस संबंधित संस्थेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने व चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ५ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने मान्य केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व ८ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील तरतुदींशी सुसंगत नसल्याने मूळात ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपातच ती अपिलार्थीस देणे ही मुख्य प्रक्रिया आहे. 'माहिती' मागणे व ती जन माहिती अधिकारी यांनी देणे,या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही निर्णयाबाबत खुलासा,कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे हे मूळातच अर्जदारास अनुज्ञेय नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व ८ द्वारे विचारणा केलेली माहिती ही, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आपली चूक आयोगासमोर कबूल केली आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्या पत्रातील मुद्दा क्र. ३,५ व ९ च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व याचबरोबर अपिलार्थीस, "श्री. लांडगे नंदकुमार रामदास यांना मान्यता मिळाली आहे किंवा कसे," या मुद्यासंदर्भातील माहितीही त्यांनी अपिलार्थीस पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अर्धवट,दिशाभूल करणारी माहिती व ती देखील विलंबाने दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये जून, २००७ ते डिसेंबर, २००७ अखेर अहमदनगर जिल्हयात नेमणूक झालेल्या सर्व शिक्षणसेवकांची नावे दिली नाहीत व काही नावे जाणीवपूर्वक टाळली गेली आहेत, असे म्हटले आहे. तथापि निश्चितपणे कोणती नावे गाळण्यात आली आहेत, हे आयोगासमोर स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर

उपस्थित नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील अपिलार्थीने उपस्थित केलेले हे मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३,५ व ९ शी संबंधित माहिती व श्री. लांडगे यांच्या मान्यतेसंदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर पोपट वडवकर,मु.पो.आढळगाव ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर- ४१३ ७०१.

२. जन माहिती अधिकारी तथा इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५
निर्णय दिनांक १३-०४-२००९

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, : अपिलार्थी
रा.लोणी खूर्द,ता.राहाता
जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग क्र.१,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघु पाटबंधारे मंडळ,पुणे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने एकाच प्रकरणाशी संबंधित दोन एकसारखी अपिले स्वतंत्रपणे केली असल्याने व त्यापैकी एका प्रकरणाची राज्य माहिती आयोगासमोर दि. ०६.०४.२००९ रोजी सुनावणी होऊन

त्यासंबंधी आयोगाने निर्णय दिला असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १७५/०८ दि. १५.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे,रा.लोणी खूर्द,ता.राहाता जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग क्र.१,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे मंडळ,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७
निर्णय दिनांक १३-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख गणीभाई शक्करभाई,<br>तोफखाना,६३३, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : विजयाबाई रमाकांत ऊर्फ बबनराव लांडगे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०१.०३.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, श्रीमती विजयाबाई रमाकांत उर्फ बबनराव लांडगे यांचे हक्क पुन्हा कसे आले, याबाबत चुकीची नक्कल संबंधित अधिकारी यांनी त्यांना दिली, नक्कल फीची आकारणी संबंधित अधिकाऱ्याने ढोबळपणे केली व जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी हेतुपूरस्सर वेळेवर उपस्थित राहिले नाहीत. या सर्व कारणांमुळे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "अहमदनगर तोफखाना येथील सीटी सर्व्हे नं. ४४२ ड, वॉर्ड नं.२० ही मिळकत श्रीमती विजयाबाई रमाकांत उर्फ बबनराव लांडगे यांनी दि. १४.०६.१९७७ रोजी खरेदी दिल्याने त्यांचे नाव रेखांकनावरुन कमी करण्यात आल्यानंतर पुन्हा त्यांच्या नावाची नोंद कोणाच्या अर्जावरुन लागली व सदरची नोंद कोणत्या कागदपत्रांच्या आधारे लावण्यात आली, या संबंधीच्या सर्व कागदपत्रांची व पूर्वी कमी झालेल्या नोंदीबद्दलच्या हमीपत्राची प्रत" ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.--/११/२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहण्याचे व ४४२ (ड) या मिळकतीच्या समाविष्ट नोंदीची खात्री करण्यासाठी या धारिकेची पहाणी करण्याचे व अपिलार्थीस त्यांच्या शंकांचे निरसन करुन घेण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यानंतरही अपिलार्थीस कोणतीही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षित असलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, नगर तोफखाना येथील सि.स.नं.४४२(ड) या मिळकतीवर मूळ धारक श्रीमती विजयाबाई रमाकांत उर्फ बबनराव लांडगे यांचे नाव कमी करण्याचे त्यांच्या कार्यालयाकडून चुकीने राहून गेले होते. तथापि तदनंतर ही चुक दुरुस्त करण्यात आली असून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ मधील विहित केलेल्या तरतुदीनुसार ही कार्यवाही करण्यात आली आहे व अपिलार्थीस त्यांच्या मिळकतीचा दाखला आता नव्याने दिला आहे.

या प्रकरणाशी संबंधित दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पूर्वी दिल्या गेलेल्या मिळकत दाखल्यावर श्रीमती विजयाबाई रमाकांत उर्फ बबनराव लांडगे यांचे नाव, त्यांनी सदरची मिळकत अपिलार्थीच्या नातेवाईकास विकल्यानंतरही, मिळकतपत्रिकेवरुन कमी झाले नाही, वास्तविक पाहता एकदा मिळकत विकल्यानंतर मूळ मालकाचे नाव मिळकतपत्रिकेवरुन कमी करुन नवीन मालकाचे नाव सर्वसाधारण परिस्थितीत मिळकतपत्रकेवर घेणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे नजरचुकीने त्यांचे नाव कमी करण्याचे राहून गेले होते, ही चूक लक्षात आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ प्रमाणे या मिळकत पत्रिकेचे पुनर्विलोकन करुन त्यांच्या हातून पूर्वी झालेली चूक दुरुस्त केली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्त्वातच नसल्याने,अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय नसल्याने ती अपिलार्थीस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मात्र ज्या परिस्थितीत अशाप्रकारची चूक जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेली आहे, ती परिस्थिती विशद करणारी टिपणी व अपिलार्थीचे नातेवाईकाचे नाव मिळकतपत्रिकेत लावण्याचे अथवा पूर्वीच्या मालकाच्या नावाची नोंद कमी करण्याची कार्यवाही नजरचुकीने करावयाची राहून गेली, अशी वस्तुस्थिती विशद करणारी स्पष्ट कबूली जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एका पत्राद्वारे द्यावी, ही कार्यवाही

त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या प्रकरणाशी संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींचे अवलोकन करता नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार दिनांकाच्या उल्लेखाशिवाय केला जातो, असे आयोगास आढळून आले आहे. त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व पत्रांवर दिनांकाचा कोणताही उल्लेख नाही, याची आयोगाने येथे प्रकर्षाने नोंद घेतली आहे. पत्रव्यवहार करताना संबंधित शासकीय कार्यालयाने त्या पत्रांवर संपूर्ण तारीख नमूद करणे आवश्यक आहे, ही बाब जन माहिती अधिकारी यांना नव्याने सांगण्याची गरज नाही मात्र, त्यांच्या कार्यालयातर्फे अशाप्रकारे चुकीच्या व अयोग्य पध्दतीने पत्रव्यवहार का केला जातो, याचे गूढ आयोगास समजू शकत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना विनादिनांकाच्या पत्राने नोव्हेंबर, २००७ मध्ये दिलेला प्रतिसाद पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या सर्व कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास जाणवत आहे. सबब जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीबाबत निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य टिपणी पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १३-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख गणीभाई शक्करभाई,तोफखाना,६३३, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७८
निर्णय दिनांक  १३-०४-२००९

१ श्री. प्रसाद पांडुरंग जोशी, : अपिलार्थी
रा. अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राचार्य,
गंगाधरशास्त्री गुणे
आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : मानद कार्यवाह,
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १९.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती अपूर्ण स्वरुपात प्राप्त झालेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील जावक पुस्तिकेतील जा.क्र.२०८ (दि. १०.०४.२००८) ची नोंद असलेल्या पृष्ठाची, त्या पूर्वीच्या व नंतरच्या पृष्ठांच्या छायाप्रतीसह माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दि. २०.८.२००८ रोजी पत्र देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५०/- महाविद्यालयाच्या बँक खात्यावर भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित संस्थेकडून प्राप्त झालेला प्रथम प्रतिसाद हा विहित मुदतीनंतर प्राप्त झाला असल्याने अपिलार्थीने सदरचे शुल्क भरण्याचे नाकारले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने, ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जा.क्र.२०८ दि. १०.४.२००८ रोजीची नोंद असलेल्या पानांची व त्या पानांपूर्वीच्या व नंतरच्या पृष्ठांच्या छायाप्रतीची माहिती मागितली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त त्यांच्या जावक पुस्तकामधील जा.क्र.२०८ (दि.१०.०४.२००८) ची नोंद असलेल्या पृष्ठांची सत्यप्रत पुरविली आहे. अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केलेल्या मूळ अर्जामध्ये जा.क्र.२०८ ही नोंद असलेल्या पानांच्या किती पूर्वीच्या व किती नंतरच्या पृष्ठांची आवश्यकता आहे, हे स्पष्टपणे नमूद केले नाही, त्यामुळे या दोन्ही मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरते.अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे. मात्र ही माहिती त्यांना अपूर्ण का वाटते याचे विवेचन त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही व तसेच त्यांचा हा मुद्द स्पष्ट करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगास या प्रकरणाशी संबंधित उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रव्यवहारावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या "पूर्वीच्या व नंतरच्या पानाची माहिती "अपिलार्थीस मिळाली नसल्याने अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण वाटली असावी, असे आयोगातर्फे अनुमान काढण्यात येत आहे.मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात निश्चित पृष्ठांची संख्या नमूद न केल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यापरत्वे, मोघम स्वरुपाची सिध्द होत आहे. मोघम स्वरुपाची माहिती अर्जदारास देण्याचे माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये अनुज्ञेय नाही, त्यामुळे अपिलार्थीस येथे असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करताना त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी इत:पर निश्चित स्वरुपात मागविणे योग्य राहील.

वरील विषयाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येत आहे, मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, ही बाब येथे प्रकर्षाने नोंदविण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रसाद पांडुरंग जोशी,रा. व्यंकटेश अपार्टमेंट,फ्लॅट नं.६, स्वामी विवेकानंद चौक,गुजरगल्ली अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मानद कार्यवाह,आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७९
निर्णय दिनांक १३-०४-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर,<br>४४,नाईकवाडपूरा,संगमनेर,<br>जि. अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर. | | |

त्रयस्थ पक्ष : वैशाली वाईन्स, सैय्यद बाबा चौक,संगमनेर, जि. अहमदनगर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३४/- त्यांना ३० दिवसांनंतर पत्राने स्पीड पोस्टाद्वारे रु.३०/- खर्च करुन कळविले. त्यांनी साध्या पोस्टाने माहिती मागविली असता, रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती दिली. या संदर्भात त्यांनी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.०५.२००८ रोजी नगर येथे सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी त्यावेळी होऊ शकली नाही. त्यामुळे तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नंतर पुन्हा सुनावणी होईल, म्हणून अपिलार्थीने वाट पाहिली. तथापि त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली न गेल्याने व माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे. या सर्व कारणांमुळे सर्व संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई होऊन अपिलार्थीस रु.२०००/- नुकसान भरपाई व विनामूल्य माहिती देण्याबाबत आदेश देण्याची अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये अंतीमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष- वैशाली वाईन्स, सय्यद बाबा चौक, संगमनेर यांच्या दुकानातील दि. ३१.१२.२००७ रोजी झालेल्या दारु विक्रीच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे तयार करण्यात आली नव्हती. त्यांनी वैशाली वाईन्स सय्यद बाबा चौक, संगमनेर यांच्याकडून बिलाच्या प्रती मागविल्या व त्या बिलाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस

पुरविल्या. त्यांनी साध्या पोस्टाने माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना स्पीड पोस्टाने व ती देखील अपूर्ण माहिती पाठविल्याने त्यांना नाहक खर्चात टाकले. त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी त्यांना अहमदनगर येथील कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठविले, त्याप्रमाणे दि. २२.०५.२००८ रोजी सकाळी ११.०० वा. पहिल्या अपिलाच्या सुनावणीसाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहूनही जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी व आयोगाकडे द्वितीय अपील करण्यासाठी आलेला खर्च रु.२०००/- नुकसान भरपाई त्यांना संबंधितांकडून मिळावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या ५ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. १ व २ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष-वैशाली वाईन्स,संगमनेर यांच्याकडून दि. ३१.१२.२००७ रोजी झालेल्या दारु विक्री संदर्भात ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील फक्त मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात त्यांना माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे संकलीत केली जात नाही किंवा ठेवली जात नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्याकडे उपलब्ध नाही परंतु अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात या मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे भाष्य केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ५ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ असे होते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील

माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे.हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३४/-इतके भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने दि. ०७.०४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. तदनंतर अपिलार्थीस ही माहिती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०४.२००८ रोजी दिली. अधिनियमातील कलम ७(३)(क) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस त्यांनी दि. ०७.०४.२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०४.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देणे क्रमप्राप्त असताना त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. १९.०४.२००८ रोजी म्हणजेच ७ दिवसांच्या विलंबाने दिलेली आहे. अपिलार्थीने ५ मुद्यांवर माहिती मागविली असताना अपिलार्थीस फक्त एकाच मुद्यावर माहिती दिली आहे, त्यामुळे अपिलार्थीचे म्हणणे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने व अपूर्ण माहिती दिली आहे, हे अशाप्रकारे सिध्द होत आहे. अपिलार्थीने एकदा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देणे हे जन माहिती अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य ठरते, परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य वेळीच व योग्यप्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास दिसून आले आहे. अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे.त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.सबब आयुक्त, राज्य उत्पादन

शुल्क यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये व आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांनी साध्या टपालाने माहिती पाठविण्याची विनंती केली असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना स्पीड पोस्टाद्वारे माहिती पाठविल्याच्या व त्याद्वारे शासनास नाहक खर्चास भाग पाडल्याचा जन माहिती अधिकारी यांच्यावर आरोप केला आहे. या मुद्यासंदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अर्जदारास देण्यात येणारी माहिती,जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी जरी स्पीड पोस्टाद्वारे पाठविली असली तरी त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी शासनाला नाहक खर्चात पाडले आहे, असे मानता येणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास माहिती देण्याकरिता त्वरित प्रतिसाद मिळणे अपेक्षित आहे. केवळ अपिलार्थीस जलद माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने व ती निश्चितपणे अपिलार्थीस पोहोचेल याची खात्री करण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पीड पोस्टाचा वापर केला, यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा आक्षेप घेण्यायोग्य असल्याचे आयोगास वाटत नाही. मात्र अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी ठेवली व नंतर ती घेतली नाही. त्या दिवशी सुनावणी नसल्याची अपिलार्थीस कोणतीही पूर्वकल्पना न देणे व तदनंतर अंदाजे एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही सुनावणी न घेणे, हे मुद्दे निश्चितच आक्षेपार्ह आहेत. त्यामुळे या प्रकरणी आपल्या कृतीद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे मात्र निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, म.रा.मुंबई यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत असल्याने अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३४/- त्यांना आता अपिलार्थीस परत करावे लागेल.या सर्व

बाबींचा एकत्रितपणे विचार करुन जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३४/- हे याच कालावधीमध्ये परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे अपूर्ण माहिती देऊन व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता, त्यांना संगमनेर ते नगर असा दोन वेळा प्रवास करण्यास भाग पाडले, त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी दोन वेळा सुनावणीसाठी हजर राहण्यापोटी झालेला एकूण खर्च रु.१३६/- इतक्या रकमेची भरपाई अपिलार्थीस मान्य करण्यात येत आहे. सदर भरपाई जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी प्रत्येकी ५० टक्के (रु.६८/- प्रत्येकी) याप्रमाणे याच कालावधीमध्ये स्वतःच्या वेतनातून करावी. सदर आदेश अधिनियमातील कलम १९(८) (ख) मधील तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ व ५ च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ३४/- हे त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.
३. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,म.रा.मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी स्वतःच्या वेतनातून प्रत्येकी रु. ६८/- याप्रमाणे एकूण रु.१३६/- इतकी रक्कम अपिलार्थीस नुकसान भरपाई म्हणून, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस अदा करावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर,४४,नाईकवाडपूरा,संगमनेर,जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्य,दुसरा मजला, जुने जकात घर, फोर्ट मुंबई- यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८०
निर्णय दिनांक १३-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संदीप रामदास पालवे,<br>मु.पो.मजले चिंचोली, ता.जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>श्री विरभद्र विद्यालय,<br>मजले चिंचोली,ता.जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>श्री विरभद्र विद्यालय,<br>मजले चिंचोली,ता.जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपील अर्जावर कोणतेही उत्तर न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. अपिलार्थीने या अर्जामध्ये एकूण रु.२०००/- इतक्या नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे श्री विरभद्र विद्यालय,मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर या विद्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विद्यालयासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "विद्यालयाने सहलीसाठी एस.टी.महामंडळाकडे भरलेल्या १० वर्षातील डिपॉझिट रकमेच्या झेरॉक्स प्रती, डिपॉझिटच्या रकमेच्या झेरॉक्स प्रती व डिपॉझीट परतावा झाला असल्यास विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, पाच वर्षातील ऑडीटरनी शेरेबुकात मारलेल्या शेरे बुकाच्या झेरॉक्स प्रती, कॅशबुकची झेरॉक्स प्रत,डेड स्टॉक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, तीन वर्षातील प्रवेश फीच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती व एकूण जमा झालेली रक्कम, क्रिडा विभागासाठी तीन वर्षात एकूण मंजूर झालेले अनुदान व त्यामधून खरेदी केलेल्या साहित्याच्या पावतीच्या झेरॉक्स प्रती, जाने.०८ ते एप्रिल,०८ पर्यंतच्या हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रती," अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे मार्गदर्शन व परवानगी अपेक्षिली व त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले आहे. तथापि अधिनियमातील विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि. ०२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.२१.०३.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि.०४.०४.२००९ रोजी ठीक ०३.१० वा. श्री. गोरड का.अ.यांचेमार्फत सूचना देऊनही ते अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीचा अनुक्रमे मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीने ज्या विद्यालयाकडे माहितीसाठीची मागणी केली होती, त्या विद्यालयास शासनाकडून भरीव अर्थसहाय्य मिळत असल्यामुळे ते एक सार्वजनिक प्राधिकरण आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. ३,५ व ६ वगळता उर्वरित माहिती, माहिती अधिकारातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ शी संबंधित माहिती कोणत्या कालावधीतील हवी आहे, याचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीस मोघम असे स्वरुप प्राप्त होत आहे व त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस आता, सशुल्क माहिती देण्याची मुदत टळून गेली असल्याने, विनामूल्य द्यावी लागेल. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली देय होणारी संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली असली तरी, हा प्रतिसाद अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक अशा स्वरुपाचा नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे

दिलेला प्रतिसाद माहिती देण्याच्या दृष्टीने पूर्णतया सकारात्मक अशा स्वरुपाचा असल्याचे दिसून येत नाही. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शिक्षणाधिकारी यांचा खुलासा त्यांच्या विद्यालयास प्राप्त झाल्यानंतर माहिती देण्याचे आश्वासित केले होते. तथापि तदनंतर या संपूर्ण घटनाक्रमात कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती देण्याचा सकारात्मक प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी न केल्याचे येथे आढळून येत असल्याने ते विशेषत्त्वाने नमूद करण्यात येत आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी याप्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने, ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा, सदर मुदतीत जर त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त झाला नाही तर, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित व त्यांना देय होणारी माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदीप रामदास पालवे,मु.पो.मजले चिंचोली, ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी श्री विरभद्र विद्यालय,मजले चिंचोली,ता.जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री विरभद्र विद्यालय,मजले चिंचोली, ता. जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (आर.पी.ए.डी.द्वारे)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८१
निर्णय दिनांक १३-०४-२००९

१ सौ. मिना सुनिल नेमाने, : अपिलार्थी
टिळक रोड,पडोळे कॉलनी,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अहमदनगर.

त्रयस्थ पक्ष : श्री. नारायण हरी आगरकर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ११.०८.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्ष श्री. नारायण हरी आगरकर (वायरमन) यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या उपदानाविषयी सन २००० ते २००८ या कालावधीतील माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्ष "श्री.नारायण हरी आगरकर यांना मिळालेली प्रॉव्हिडंड फंडाची रक्कम, एल.आय.सी. ची रक्कम, ग्रॅच्युईटी, पोस्ट खात्याची रक्कम,अनुकंपा तत्त्वावर झालेली नेमणूक"- या मुद्यांवर माहिती मागितली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी, राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. २१.०३.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दि.०४.०४.२००९ रोजी ठीक ०३.२० वा. दूरध्वनीद्वारे त्यांच्या कार्यालयातील श्री. बोडखे यांच्या मार्फत निरोप देऊनही आयोगासमोर ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही कार्यालयीन प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत फक्त त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची व प्रथम अपील अर्जाची प्रत जोडली आहे.या अर्जाबरोबर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या त्रयस्थ पक्षाच्या माहितीसंदर्भात इतर कोणतीही पूरक कागदपत्रे जोडली नाहीत. त्यामुळे मूळात त्रयस्थ पक्ष अस्तित्त्वात आहे किंवा कसे, या माहितीने अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याचा बोध होत नाही. तसेच आज सुनावणीस अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत, या सर्व बाबींचा विचार करता संबंधितांना हे अपील चालविण्यामध्ये फारसे स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. मिना सुनिल नेमाने,टिळक रोड,पडोळे कॉलनी,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८२
निर्णय दिनांक १३-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. सविता रामचंद्र राजापुरे,<br>शिक्षक कॉलनी,मु.पो.ता.कर्जत,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपआयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>पुणे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>पुणे. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०८.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द विचाराधीन अपील केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मुलगी कु.शुभांगी रा.राजापुरे हिने दिलेल्या फेब्रुवारी,२००८ मध्ये इयत्ता ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसंदर्भात तिने लिहिलेल्या भाषा, गणित व बुध्दिमत्ता या विषयाच्या उत्तर पत्रिकांच्या सत्यप्रतींची मागणी केली होती.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस उघड करण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर दि. ०५.०८.२००८ रोजी आपला निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती उपलब्ध न करण्याचा निर्णय कायम ठेवला.या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयाकडे राज्यातील संपूर्ण इयत्ता ४ थी व ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचे काम सोपविले आहे. त्याचबरोबर एन.टी.एस.,डी.एड.,व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा इत्यादी कामे देखील त्यांच्याकडे सोपविली जातात. त्यांच्या कार्यालयामार्फत एकूण २० प्रकारच्या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या लाखाच्या जवळपास असते. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांच्याकडील परीक्षा घेण्याच्या कार्यपध्दतीच्या अशाप्रकारच्या प्रचंड व्याप्तीमुळे ते या उत्तरपत्रिका, परीक्षेच्या निकालानंतर जास्तीत जास्त ९० दिवस इतक्याच कालावधीकरिता जतन करुन ठेवतात. त्यांनी

आयोगाच्या पुढे असेही निदर्शनास आणले की, अपिलार्थीची उत्तर पत्रिकांच्या प्रती त्यांना पुरविण्याची मागणी मान्य केली तर अशाप्रकारचे अनेक अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यांच्याकडे असलेल्या अपूऱ्या साधनसामग्रीमध्ये व पायाभूत सोयीअभावी त्यांना, त्यांच्याकडे मूलतः सोपविलेले मूळ काम करणे सर्वथा अशक्य होईल. त्याचबरोबर त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने देखील परीक्षेच्या उत्तरपत्रिका या गोपनीय असल्याने त्यांच्या छायाप्रती देण्यात येऊ नयेत, असा निर्णय घेतला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीस उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती न पुरविण्याबाबतचे धोरण पाहता, जन माहिती अधिकारी यांचा मूळ युक्तिवाद आयोग मान्य करत आहे. आयोगाने उत्तर पत्रिकांच्या संदर्भात वेळोवेळी उत्तरपत्रिकांच्या प्रती उघड न करण्याच्या निर्णयाचे वेगवेगळया निर्णयांमध्ये समर्थन केले आहे. मा. उच्च न्यायालयाने देखील अशाचप्रकारचे निर्णय वेळोवेळी घेतलेले आहेत, हे पाहता, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नाकारणे योग्य राहील, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १३-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सविता रामचंद्र राजापुरे,श्री स्वामी समर्थनगर (शिक्षक कॉलनी), मु. पो. ता. कर्जत, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८३
निर्णय दिनांक १३-०४-२००९

१ श्री. अशोक रंगनाथ सातपुते, : अपिलार्थी
रा.सावेडी,अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड
विद्यमान जन माहिती अधिकारी : सहा.कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विद्यमान जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०९.०९.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याने केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "दि. १८ मे, २००६ रोजी शंकर नागरी सहकारी बँक, लि.नांदेड शाखा नांदेड

यांच्या डी.डी.क्रमांक सी ए ०६ नं. २८९०१४ अन्वये तांत्रिक मंजूरीसाठी अदा केलेल्या पेमेंट जमा झाल्याबद्दलची दुहेरी पुस्तकाच्या मूळ प्रतीची सत्यप्रत " ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्याचे काम त्यांच्याकडे चालू असल्याचे अपिलार्थीस अवगत केले.यानंतर अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय दि. ११.०६.२००८ रोजी रु. ५०/- ची मनीऑर्डर प्राप्त झाली. तदनंतर दि.१६.०६.२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार दि.२३.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती विनाशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापि अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विशिष्ट पावती पुस्तकाची प्रत मागितली होती. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये त्या विभागातील कोणत्याही कार्यालयाकडे काही रकमेचा भरणा करावयाचा झाल्यास तो दुहेरी पावती पुस्तकाद्वारे नोंद केली जाण्याची पध्दत रुढ आहे. दुहेरी पावती पुस्तकाचा वापर

व्यक्तीने अथवा संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे फक्त रोखीने पैसे जमा केले असताना केला जातो, या पावतीची एक प्रत सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित कार्यालय स्वतःकडे ठेवते व एक प्रत पैसे-भरणा करणाऱ्या व्यक्तीकडे अथवा संस्थेकडे हस्तांतरित करते. या प्रकरणी अशाप्रकारची कार्यवाही केलेली नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन आयोगास अवगत झाले आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला डी.डी. हा त्यांना हदगाव नगरपरिषदेकडून प्राप्त झाला असून या रकमेचा भरणा त्यांनी चलनाद्वारे शासकीय कोषागारात केला आहे. तसेच अपिलार्थीस या डी.डी.ची नोंद त्यांच्याकडील ज्या रजिस्टरमध्ये करण्यात आली आहे त्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत देखील पुरविली आहे. त्याचबरोबर संबंधित डी.डी. ज्या चलनाद्वारे त्यांनी शासकीय कोषागारात भरला आहे त्या चलनाच्या रजिस्टरची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. मात्र या दोन्ही रजिस्टरमध्ये 'डी.डी.'असा उल्लेख न करता 'चेक' असा उल्लेख केला गेला असून एका रजिस्टरमध्ये '२८९०१४' असा क्रमांक नमूद केलेला आहे व एका रजिस्टरमध्ये हाच क्रमांक '२८९००४' असा दाखविला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस दिलेली आहे. मात्र कथित डी.डी.ची नोंद करताना तो चेक असल्याचे व त्याच्या क्रमांकामध्ये संबंधित लिपीकाच्या हाताने फरक झाल्याचे आयोगास आढळून आले आहे. आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला कथित डी.डी., ज्या चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरला आहे, त्या चलनाची झेरॉक्स प्रत हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्यांच्याकडील कॅशबुकमध्ये या डिमांड ड्राफ्टसंदर्भातील नोंदीचा उल्लेख असलेल्या पृष्ठाची प्रत देखील त्यांना याबरोबर द्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केवळ दोन पृष्ठांची माहिती देऊन त्यांच्याकडून माहितीपोटी मनीऑर्डरद्वारे रु.५०/- इतके शुल्क स्वीकारले आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून स्वीकारलेले उर्वरित जादाचे शुल्क रु.४६/- याच कालावधीत त्यांना परत करावे लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व याचबरोबर त्यांच्याकडून स्वीकारलेले उर्वरित शुल्क रु.४६/- त्यांना याच कालावधीत परत करावे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक रंगनाथ सातपुते,रा. संजीवनी वैष्णवी कॉलनी, श्रीराम चौक,पाईपलाईन रोड,सावेडी,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८४
निर्णय दिनांक १३-०४-२००९

१ श्री. अभिजीत सी. पुप्पाल, : अपिलार्थी
रा.सावेडी, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह आयुक्त,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सं),
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०९.०९.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले.

तथापि प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा त्यांनी यासंदर्भात काहीही कळविले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. गौतम विजय बोरा, यांनी अपिलार्थीच्या बंधू व भगिनीविषयी केलेल्या तक्रारीसंदर्भात झालेल्या सुनावणीच्या रोजनाम्याच्या प्रती व २८ जानेवारी, २८ एप्रिल, व २५ जून, २००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेच्या हजेरीपत्रकाच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. ०१.०१.२००७ ते २५.०६.२००८ असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले, मात्र त्यांच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या दि. २५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी दुसऱ्या संदर्भाद्वारे दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दुसऱ्या एका संदर्भाद्वारे पुरविली असल्याचे सांगितले. तथापि हा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही, कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेली कागदपत्रे ही विचाराधीन अपिलाशी संबंधित

मूळ अर्जाशी पूर्णतया विसंगत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदींचा अवलंब करुन अपिलार्थीस देणे त्यांना सहज शक्य होते. मात्र अपिलार्थीने अशाप्रकारचे अनेक अर्ज केल्याने व या अर्जांचा जन माहिती अधिकारी हे एकत्रितपणे विचार करीत असल्याने त्यांच्या युक्तिवादामध्ये व पुराव्यामध्ये आयोगास विसंगती आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देय होत असल्याने व ही माहिती सशुल्क देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती इतकी मर्यादित होती की, जर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २६.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीचा प्रश्न त्यांच्या पातळीवरच सोडविला गेला असता, मात्र उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन व त्याद्वारे अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव या प्रकरणी स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार वर्तनाची सचिव (आदिवासी विकास) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.याचबरोबर अपिलार्थीस देय असलेली माहिती देखील अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी न देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १३-०४-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिजीत सी. पुप्पाल,रा.बंगला नं.७, विवेकानंद हाऊसिंग सोसायटी, पाईपलाईन रोड, सावेडी, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (आदिवासी विभाग),मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३९
निर्णय दिनांक १३-०४-२००९

१ श्री. छगन गोविंदराव ढोणे, : अपिलार्थी
सिडको, नाशिक,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व
मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर,
पुणे.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग,पुणे.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०४.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.०८.२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.०३.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित कालावधीनंतर संपूर्ण अयोग्य, दिशाभूल करणारी व चुकीची माहिती प्राप्त झाली, अशी खात्री होऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी

आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जासोबत पाठविलेल्या मुद्रांक तिकीटाच्या छायाप्रतीबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या मूळ अर्जातील ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ४ वगळता, उर्वरित तीन मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात, त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.०२.२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही खुलासा केला. परंतु या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०६.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. ०८.०२.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्रत्यक्षात दि. २२.०२.२००७ रोजी प्राप्त झाला व या अर्जाच्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास कथित दि. २०.०३.२००७ रोजीचे पत्र दाखविले.त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, त्यांनी हीच माहिती अपिलार्थीस परत दि. ०२.०४.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने

देखील पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाची संबंधित पावती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज केला व त्या अर्जासोबत एका कोर्ट-फीच्या स्टॅम्पची छायाप्रत लावून त्यावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय व मते अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये,"मुद्रांक विक्रेत्याकडे मुद्रांक तिकीटावर गोलशिक्का अर्धवटपणे मारलेल्या/उमटवलेल्या स्वरुपात उपलब्ध असतात काय? अशा स्वरुपातील मुद्रांक तिकीट कोणी कामकाजासाठी सादर करु शकतात काय? वापरात आणू शकतात काय? याबाबत स्वयंस्पष्ट मत, सदरच्या तिकिटाचा यापूर्वीच वापर होऊन गेलेला असण्याची शक्यता आपणास वाटते काय? कृपया अभिप्राय कळवावा"अशी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे, शंका उपस्थित करुन त्यावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षिणे व अर्जदाराच्या शंकांना उत्तर देणे किंवा अर्जदाराच्या म्हणण्यावर जन माहिती अधिकारी यांनी आपले अभिप्राय देणे, अशाप्रकारची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे मूळात ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. २०.०३.२००७ व नंतर दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद

देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०३.२००७ रोजी पाठविलेल्या कथित माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी हे आयोगाकडे योग्य तो पुरावा सादर करु शकले नाहीत. त्यांनी फक्त दि. ०२.०४.२००७ रोजी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे, हे पाहता आयोगातर्फे असे अनुमान काढण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०४.२००७ रोजी माहिती पाठवून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दि. ०९.०४.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना तो एक महिना इतक्या विलंबाने देऊन, अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, याप्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित कालावधीनंतर निर्णय देऊन आपल्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबतची नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी योग्य प्रकारे दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली आहे व उर्वरित ४ मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस मूळात, अधिनियमातील तरतुदी पहाता, देय होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १३-०४-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. छगन गोविंदराव ढोणे,एन-४२/ए/बी/१/७/६ सिडको, नाशिक,जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,पुणे विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,नवीन प्रशासकीय इमारत,तळमजला,कौन्सिल हॉलसमोर,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१४

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. दिपेश भाऊराव परदेशी, अपिलार्थी

२७२/२७३, हुडको कॉलनी, दत्तमंदिराजवळ, येवला, तालुका

येवला, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (इ व द ) उपविभाग, येवला,

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जिल्हा परिषद (इ व द), नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. संजय विठ्ठल कुमावत, मार्फत सार्वजनिक बांधकाम उपविभाग येवला, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे सर्व हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक १०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या अपील अर्जाचा निकाल जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसात न दिल्याने, तसेच येवला उपविभागाकडून त्यांना जाणुनबुजून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. संजय विठ्ठलराव कुमावत वरिष्ठ सहायक (इ व द) पंचायत समिती, येवला यांच्या मे २००७ पासून ते दिनांक ३०-०७-२००८ पर्यंतच्या हजेरीपटाच्या रजिस्टरच्या नकला, त्यांच्या रहिवासी पत्ता प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत, त्रयस्थ पक्ष शासकीय नियमानुसार आपल्या गावी राहत आहेत काय, असल्याचा त्याचा पूर्ण पत्ता व नसल्यास का राहत नाही याची कारणे, शासकीय आदेशाचे उल्लंघन केले म्हणून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षावर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील व त्रयस्थ पक्षाला मे २००७ सालापासून ते अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत अदा केलेल्या प्रवासभत्त्याच्या बिलाच्या प्रती ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०८-२००८ व दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवर कोणत्याही अधिका-याची सही अथवा शिक्का नाही. त्यांना त्रयस्थ पक्षाच्या संदर्भाने प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राची प्रत ही संबंधित घरमालकाने दिलेले प्रमाणपत्र आहे. तसेच त्रयस्थ पक्षास मे २००७ ते दिनांक ३०-०७-२००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये अदा केलेल्या प्रवासभत्त्याच्या बिलांच्या प्रती मागितल्या असता त्यांना ही माहिती अपूर्ण स्वरुपात प्राप्त झाली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०५-०८-२००८ व दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्रयस्थ

पक्षाच्या प्रवासभत्त्याची बीले ही गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे असल्याने ही माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस दिनांक ०६-०८-२००८ रोजी पुरविण्यात आली आहेत.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी त्यांचे साडू असून त्यांच्या सास-याने अपिलार्थीवर मालमत्ते प्रकरणी न्यायालयीन दावा दाखल केला असता या प्रकरणामध्ये अपिलार्थीस काही दिवस तुरुंगात राहावे लागले व त्याचा वचपा काढण्यासाठी अपिलार्थी हे त्रयस्थ पक्षाच्या संबंधी वारंवार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन माहिती मागवित असतात. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या वर्तणुकीमुळे त्यांचे स्वास्थ्य बिघडले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक दोन मधील काही भाग वगळता उर्वरित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०८-२००८ व दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या पत्रांव्दारे काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचा असा आक्षेप आहे की, त्यांना त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील मुद्दा क्रमांक २ च्या संबंधाने मिळालेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा शिक्का व आवक क्रमांक नाही, त्यामुळे त्यांना ही माहिती बनावट असल्याचे वाटत आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती देय होत असते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या घरमालकास त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन त्रयस्थ पक्षाच्या पत्त्यासंदर्भात एक प्रमाणपत्र तयार केले असून या प्रमाणपत्रावर त्रयस्थ पक्षाच्या घरमालकाची सही घेऊन हे प्रमाणपत्र त्यांनी अपिलार्थीस, त्रयस्थ पक्षाचा पत्ता म्हणून दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यावर त्यांच्याकडे ती माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देणे या ठिकाणी अभिप्रेत आहे. नवीन माहिती त्रयस्थाकडून घेऊन, ती तयार करुन अपिलार्थीस माहिती देण्याची ही त्यांची कृती चुकीची आहे. त्यांच्या कार्यालयीन अभिलेख्यावर त्रयस्थ पक्षाचा निवासी पत्ता जसा उपलब्ध आहे किंवा होता त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणी द्यावयास हवा होता.

मात्र त्यांनी तशी कृती केली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक दोनच्या संदर्भात त्रयस्थ पक्षाचा अपिलार्थीने अर्ज केलेल्या दिवशी, त्यांच्याकडे उपलब्ध असलेला निवासी पत्ता ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस सदर आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाबद्दल, पोस्टींगच्या ठिकाणी राहत आहेत काय, राहत नसल्यास त्याची कारणे, शासकीय आदेशाचे उल्लंघन केले याबद्दल विभागातर्फे करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील, अशी माहिती मागितली आहे. त्रयस्थ पक्ष मुख्यालयी राहत असल्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. मात्र उर्वरित माहितीसंदर्भात येथे असे नमूद करण्यात येते की, वर म्हटल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेलीच माहिती अर्जदारास देय होत असते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अथवा स्पष्टीकरण विचारणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही असे दिसून येईल. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

प्रसंगावशात् जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २५-०८-२००८ रोजी सुनावणी ठेवली असता या सुनावणीस अपिलार्थी हजर न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. मात्र या संदर्भातील आदेश जन अपिलीय अधिकारी यांना आयोगास दाखविता आला नाही. याबाबत जन अपिलीय अधिकारी यांना अशी सूचना करण्यात येते की, अपिलार्थीच्या गैरहजेरीत देखील ते निर्णय देऊ शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिपेश भाऊराव परदेशी, २७२/२७३, हुडको कॉलनी, दत्तमंदिराजवळ, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (इ व द ) उपविभाग, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (इ व द), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१५

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. दिनकरराव आनंदा देवरे, अपिलार्थी
मु. पो. वाजगांव, तालुका देवळा,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कळवण,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे वाजगांव तालुका देवळा येथील गट नंबर ५३६ च्या दिनांक २२-०२-२००६ या दिवशी झालेल्या मोजणीचा नकाशा मागितला असता जन माहिती अधिकारी यांनी योग्य माहिती न देता चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "दिनांक

२२-०२-२००६ या दिवशी झालेली गट नंबर ५३६ ची मोजणी " या विषयावर सदर मोजणीचा आराखडा मिळणेबाबत " ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, दिनांक २२-०२-२००६ रोजी ते म्हणतात त्याप्रमाणे, गट नंबर ५३६ ची मोजणी झाली नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या मते गट नंबर ५३६ ची मोजणी दिनांक २९ व ३०-०४-१९९७ रोजी कोर्ट कमिशन यांच्या आदेशान्वये झाली होती व त्यावेळी तयार करण्यात आलेल्या नकाशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस देऊ केल्या होत्या, तथापि अपिलार्थीने या नकाशाच्या प्रती पोटी लागणारे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे नाकारले व ही माहिती प्राप्त करुन घेतली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची वस्तुस्थिती कळविली असता जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २२-०२-२००६ रोजी गट नंबर ५३६ ची कोणतीही मोजणी झाली नसल्याने ही माहिती अपिलार्थीस त्यांना पुरविता आली नाही. दिनांक २२-०२-२००६ रोजी १९९७ च्या मोजणीप्रमाणे सर्व संबंधितांना भूमि अभिलेख कार्यालयामार्फत ताबा देण्यात आलेला आहे. या गटाची पूर्वी न्यायालयीन कामकाजाच्या संदर्भात मोजणी झाली असून या मोजणीच्या नकाशाच्या प्रती अपिलार्थीस वेळोवेळी पुरविल्या असून विचाराधीन अपिलासंदर्भात अपिलार्थीस या नकाशाच्या प्रती देऊ केल्या असता त्या घेण्याचे त्यांनी नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे ती मूळात अस्तित्वात नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस गट

नंबर ५३६ च्या संदर्भातील सशुल्क माहिती देऊ केली. मात्र अपिलार्थीने या शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिनकरराव आनंदा देवरे, मु. पो. वाजगांव, तालुका देवळा, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कळवण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक जिल्हा भूमि अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१६

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. दिपक रामचंद्र शेळके, अपिलार्थी

प्लॉट नं. ८ श्रध्दा संकुल नं. १ जुना गंगापूर नाका,

गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी , प्रतिवादी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व अपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००३ ते २००८ या कालावधीतील आरोग्य विद्यापीठातील कर्मचा-यांच्या मागण्यासंदर्भात व नियुक्ती इत्यादीसंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिपक रामचंद्र शेळके, प्लॉट नं. ८ श्रध्दा संकुल नं. १ जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी , महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१७

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, अपिलार्थी
रेश - पर्व, आनंदनगर, सोयगांव, तालुका मालेगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, गो. य. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक
विद्यालय, जळगांव (नि) तालुका मालेगांव,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. एस. एन. शिंदे मार्फत मुख्याध्यापक, गो. य. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगांव (नि) मालेगांव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्याचे नाकारल्याने त्यांनी दिनांक २०-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना तोंडी सूचित केले व त्याप्रमाणे त्यांच्या अभिलेख्यात नोंद घेतली. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी असे कोणतेही लेखी आदेश त्यांच्या अपील अर्जासंदर्भात पारित न केल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात सन २००३ ते ३१-१२-२००७ या कालावधीतील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन तोंडी आदेश दिले. मात्र लेखी स्वरुपात आदेश पारित केले नाहीत व परिणामी त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी नाकारले त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगापुढे युक्तिवाद केला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर येत्या तीन आठवड्यात सुनावणी घेण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश पारित करावेत. सदर निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश पारित करावेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, रेश - पर्व, आनंदनगर, सोयगांव, तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गो. य. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगांव (नि) तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ श्री. एस. एन. शिंदे मार्फत मुख्याध्यापक, गो. य. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जळगांव (नि) तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१८

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. भोर गणेश महादु, अपिलार्थी
मु. पो. घोटी बु. तालुका इगतपुरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, घोटी,
तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),
पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून दिनांक १५-०४-२००९ रोजी लिहिलेले त्यांचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असून माहितीबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याने त्यांचा विचाराधीन अपील अर्ज निकाली काढावा.

खुद्द अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीची यावर कोणतीही तक्रार नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१.	अपील क्रमांक २१८/२००८, दिनांक ११-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

नाशिक	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१५-०४-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. भोर गणेश महादु, मु. पो. घोटी बु. तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपालिका, घोटी, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी ग्रामपंचायत, पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१९

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. योगेश मधुकर घोडे, अपिलार्थी

घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी,

पंचवटी, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उद्यान निरीक्षक, नाशिक महानगरपालिका,

नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उद्यान अधीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना दिनांक ०२-०५-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमाखाली जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती आजपावेतो मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या कालावधीमध्ये उदय गार्डन, नाशिक यांना देण्यात आलेल्या विविध कामाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे व ती माहिती संकलीत झाल्यावर अपिलार्थीस कळविण्यात येईल अशा आशयाचे पत्र अपिलार्थीस लिहिले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय दिला असून या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीने नाशिक महानगरपालिकाच्या कार्यक्षेत्रातील उदय गार्डन संदर्भात काही माहिती मागितली होती. नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण सहा उद्यान निरीक्षकांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने व उदय गार्डन ही सुध्दा नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये असल्याने त्यांना ही माहिती संकलीत करुन अपिलार्थीस द्यावी लागत होती त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः तसे कळविले, तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे याचा बोध न झाल्याने ते अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उदय गार्डन, नाशिक यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या कामाचे नांव, कामाचे स्वरुप, या कामासंबंधाने बनविण्यात आलेल्या प्रत्येक अभिलेख्याचे अंदाजपत्रक बनविण्यापासून ते विविध सभांची मंजुरी, विविध अधिका-यांनी दिलेले अभिप्राय, अंदाजपत्रक मंजुरीसाठी दिलेले आदेश, यासंदर्भातील इ

ोरॉक्स प्रती आणि उदय गार्डन यांना शासकीय कामे करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिलेल्या परवानगीची प्रत तसेच अपिलार्थीने संदर्भित केलेल्या कामाचे स्वरुप, नाव, कामाची रक्कम अशा प्रकारची माहिती मागितली होती.

उपलब्ध कागदपत्रावरुन पुढे असे दिसून येते की, अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती संकलीत झाल्यावर देण्याचे आश्वासीत केले व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना ३० दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी आदेशित केलेले आहे. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये त्यांनी मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे हा त्यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती स्पष्ट स्वरुपात मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अशा प्रकारे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने साहजिकच ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग असलेल्या इतर प्राधिकरणाकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीच्या अर्जाच्या सहा प्रती करुन सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांना देऊन त्यांना अपिलार्थीस परस्पर माहिती देण्यासाठी सूचित करणे व या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीनुसार आवश्यक होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस तसे न कळवता सर्व संबंधितांकडून माहिती संकलीत करुन घेण्याचे जन माहिती अधिकारी यांनी ठरविले. मात्र नंतर त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश मधुकर घोडे, घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उद्यान निरीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उद्यान अधीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२०

निर्णय दिनांक १५-०४-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. योगेश मधुकर घोडे,<br>घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी,<br>पंचवटी, नाशिक | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उपलेखापाल, नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजपावेतो प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उदय गार्डन नाशिक यांना उद्यान विभाग, मनपा, नाशिक यांच्यामार्फत सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये कोणकोणत्या कामाची देयके अदा करण्यात आली त्या सर्व देयकाच्या झेरॉक्स प्रती व प्रत्येक वर्षी देयक अदा केल्याचा दिनांक, रक्कम, कामाचे नांव व कामाचे ठिकाण याची चॉर्ट स्वरुपात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे त्यांनी उद्यान अधीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उद्यान विभागाशी संबंधित असल्याने ती त्यांच्या स्तरावरुन अपिलार्थीस देण्याचे व त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची एक प्रत लेखा विभागास देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता उद्यान अधीक्षक यांना त्यांच्या स्तरावर सुनावणी घेण्याचे त्यांच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. एवढे सर्व होऊनही अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळात उद्यान विभागाशी संबंधित माहिती मागितली असल्याने आणि त्यांनी मागणी केलेली माहिती उद्यान विभागाशी संबंधित असल्याने माहिती देण्यासाठी त्यांनी अपिलार्थीचा अर्ज उद्यान विभागाकडे वेळेत पाठवून दिला होता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही उदय गार्डन नाशिक यांना नाशिक महानगरपालिकेने सन २००५ ते २००८ या कालावधीमध्ये अदा केलेल्या बिलांच्या प्रतीमध्ये उपलब्ध असणे स्वाभाविक आहे. महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीनुसार प्रत्येक ठेकेदाराचे बील हे महानगरपालिकेतील लेखा विभाग अदा करत असते. प्रत्येक विभागाच्या बीलाच्या प्रती या लेखा विभागाकडे उपलब्ध असतात. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मगितलेली माहिती देणे हे लेखा

विभागास अशक्य वाटावे अशी कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. लेखा विभागाने या प्रकरणी उद्यान विभागाशी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय पत्रव्यवहार करुन फक्त वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले व स्वतःची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. लेखा विभागातील संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक ज्यांना जन माहिती अधिकारी असे समजावे अशी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे, या तरतुदीनुसार या सर्व जणांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अशा प्रकारच्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता द्यावी लागेल. तसेच माहिती सशुल्क देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने आता ही माहिती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, (लेखा शाखा, नाशिक महानगरपालिका, नाशिक) यांनी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (लेखा विभाग) व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश मधुकर घोडे, घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२१

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, अपिलार्थी

Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड,

तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मनमाड,

तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती दिली नाही. फक्त दोन पानांची माहिती देऊन त्यांच्याकडून ४० रुपये इतके शुल्क वसूल केले आहे. ती माहिती त्यांना ३० दिवसानंतर मिळाली आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०

प्रमाणे शास्ती लावावी व त्यांच्याकडून आकारलेले जादा शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत मिळावे.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००३ ते २००७ या कालावधीतील शासकीय निवासस्थानासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **उपविभागाच्या अंतर्गत निवासस्थानांची संख्या, सन २००० मध्ये कोणत्या कर्मचा-यांना निवासस्थाने देण्यात आली, त्यांनी सदर निवासस्थाने कधी सोडली, त्यांची बदली केव्हा झाली, कर्मचा-यांनी निवासस्थाने सोडल्याचे दाखले, घर ताबा पावतीची साक्षांकीत प्रत** - या मुद्दांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०४-०४-२००८ रोजी केला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०४-२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना उर्वरित शुल्क परत करण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व शुल्क परत न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०४-०४-२००८ रोजी एकूण १३ पृष्ठांची माहिती देऊ केली असता अपिलार्थीने त्यावेळी फक्त दोन पृष्ठांची माहिती घेतली व उर्वरित माहिती त्यांच्या कार्यालयाकडून प्राप्त न करुन घेता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपील अर्ज केला.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बनसोडे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस दोन पृष्ठांची माहिती देण्याचे कबूल केले असल्याने अपिलार्थीस उर्वरित माहिती विनामूल्य देण्याचे त्यांनी आदेशित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस प्रथमतः माहिती देतांना एकूण १३ पृष्ठांची माहिती देऊ केली असण्याची व अपिलार्थीने त्यावेळी फक्त दोन पानांची माहिती घेतली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्याचबरोबर हेही तितकेच खरे आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण १३ पृष्ठांची माहिती देऊ केली होती हे कोणत्याही ठोस पुराव्यासह ते आयोगास आज सुनावणीमध्ये सिध्द करुन देऊ शकत नाहीत. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीमध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त दोन पानांची माहिती दिल्याचे कबूल केले होते. यावर जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस एकूण १३ पृष्ठांची माहिती देऊ केली होती, तथापि अपिलार्थीने फक्त दोन पानांची माहिती घेतली हा युक्तिवाद, आयोग अमान्य करीत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस उर्वरित ११ पानांची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसात व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी तसेच या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे भरुन घेतलेले शुल्क, रुपये ४० वजा दोन पानांचे रुपये चार असे, रुपये ३६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच या कालावधीत परत करावे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती आता आवश्यक असल्यास त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सदर माहिती त्यांनी याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध न करुन देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीच्या स्वीकारलेल्या शुल्कातील शुल्क रुपये ३६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२२

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, अपिलार्थी
Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मनमाड,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. बी. शेवाळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न देता टाळाटाळ केली व अपिलार्थीस पत्र पाठवून दिशाभूल करण्याचा

प्रयत्न केला असल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्याची शिफारस करावी व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. डी. बी. शेवाळे (गव्हर्न्मेंट कॉन्ट्रॅक्टर, मनमाड) यांच्या कामासंदर्भात सन २००३ ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **श्री. डी. बी. शेवाळे (गव्हर्न्मेंट कॉन्ट्रॅक्टर, मनमाड) यांना ठेका देतांना दिलेल्या आदेशाची प्रत, कामाचे नांव, कामापोटी किती लाखांची रक्कम अदा करण्यात आली त्याच्या प्रती, श्री. डी. बी. शेवाळे यांच्याबरोबर किती ठेकेदारांनी आपले अर्ज दाखल केले होते** - इत्यादी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देता त्रयस्थ पक्षाकडे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात त्यांचे अभिप्राय त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये मागविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती न देण्याच्या समर्थनार्थ आयोगाकडे कोणताही खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष, श्री. डी. बी. शेवाळे (गव्हर्न्मेंट कॉन्ट्रॅक्टर, मनमाड) यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे अशा

प्रकारची माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत असल्याचे या प्रकरणी संभवत आहे असे आयोगास आढळून येत नाही. मूळात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदारांना देण्यात येणा-या प्रत्येक कामामध्ये पारदर्शकता असणे हे पारदर्शक कारभाराच्या दृष्टीने आवश्यक आहे आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नियमावलीचे अवलोकन करता ही नियमावली अशा प्रकारच्या पारदर्शकतेला पूरक अशीच आहे. त्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिल्याचे अथवा देण्याची तयारी दर्शविल्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस सार्वजनिक स्वरुपाची माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची संधी देण्यासाठी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ााल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष अंतीम करण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, अपिलार्थी
Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला,
तालुका येवला, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. बी. शेवाळे, मार्फत उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३००० इतके भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले होते.

मात्र या फीचा तपशील त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस दिला नाही. अपिलार्थीस पत्र पाठवून व त्यांची दिशाभूल करुन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे दंड आकारण्याची शिफारस माहिती आयुक्तांकडे करावी अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये विनंती केली आहे व या अर्जाच्या अखेरीस त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. डी. बी. शेवाळे (गव्हर्न्मेंट कॉन्ट्रॅक्टर, मनमाड) यांच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. मात्र या पत्रामध्ये त्यांनी या शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविला नाही. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ सशुल्क माहिती देण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित करुनही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अधिनियमातील

कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस या शुल्काचा तपशील कळविला नाही. सदर तपशील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांना दिनांक २४-०४-२००८ रोजी कळविला होता. अपिलार्थीने मूळ अर्ज दिनांक १६-०२-२००८ रोजी केला असून अपिलार्थीस भराव्या लागणा-या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०४-२००८ रोजी कळविला आहे. म्हणजेच सदर तपशील जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस कळविल्याचे येथे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी याप्रमाणे अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याने त्यांना आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केला व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली, असे म्हटले आहे. मात्र प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची कोणत्याही पत्राव्दारे दिशाभूल केली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या माहितीवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वसाधारणपणे कळविलेले शुल्क हे योग्य आहे. फक्त हे शुल्क अधिनियमातील कलम ७ (१) मधील शुल्क कळविण्याची मुदत व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस कळविले आहे, एवढी एक तांत्रिक चूक त्यांच्या हातून घडली आहे. या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी टाळले नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती अमान्य करण्यात येत आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवेंद्र पांडुरंग अडसूळे, Room No. MAP ६१४ AD, रेल्वे क्वॉर्टर, बारा बंगला, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. गिरधारीलाल रोचलदास ओचाणी, अपिलार्थी
गांधी चौक, नांदगांव, तालुका नांदगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : इमारत पर्यवेक्षक, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. युनूस शेख

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परिपूर्ण स्वरुपात तात्काळ माहिती देण्याचे आदेशित करावे, अपिलार्थीस परिपूर्ण माहिती मिळेपर्यंत जन माहिती अधिकारी यांना

दंड व्हावा व अपिलार्थीस अपिलाचा खर्च, मानसिक व शारीरिक त्रासाबद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडून नुकसानभरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना वेळोवेळी दिलेल्या पत्रासंदर्भात केलेल्या कारवाई विषयक एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या माहितीमध्ये अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व चार व्दारे अद्यापपावेतो परवानगी का देण्यात आली नाही, कारवाई का झाली नाही अशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला व अपिलार्थीस असे कळविले की, "आपण उपरोक्त अर्जान्वये कार्यवाहीबाबत विचारणा केली असून माहितीच्या अधिकाराअंतर्गत कार्यवाही अपेक्षित नाही. यामध्ये अभिलेख्यात उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे." जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०८-२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या काळातील माहिती त्यांच्याकडे मागितली आहे त्यावेळी ते नगरपरिषद नांदगाव येथे नोकरीस देखील लागलेले नव्हते. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक

३०-०५-२००८ रोजीच्या प्रथम पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद चुकीचा असल्याचे आढळून येत आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी " अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमांतर्गत कार्यवाही अपेक्षित नाही " असे विधान केले आहे. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत एखाद्या पत्रावर अथवा विनंती अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांना माहिती देत असतांना संबंधित अर्जदाराने केलेल्या अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांनी या विषयावर केलेल्या संपूर्ण पत्रव्यवहारांची माहिती अर्जदारास देणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्रातील, " माहिती अधिकार अधिनियमातील कार्यवाही अपेक्षित नाही, " असे म्हणणे चुकीचे आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व चार व्दारे कारवाई झाली नसल्यास का झाली नाही, सदरची परवानगी आजपर्यंत देण्यात आली किंवा कसे, आजपावेतो परवानगी का देण्यात आली नाही, अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व चारशी संबंधीत अंशतः माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मूळ अर्जात अपिलार्थीने निर्देशित केलेल्या अर्जासंदर्भात त्यांच्या कार्यालयातर्फे त्या विषयावर केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाचया आत विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी निःसंशयपणे टाळले असल्याचे सिध्द न झाल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांना या प्रकरणी नेमका कोणता त्रास झ ाला व त्यांना नेमक्या कोणत्या कारणाकरिता व किती नुकसानभरपाई प्राप्त होणे अपेक्षित आहे याचा कोणताही उल्लेख, अथवा यासंदर्भात सबळ पुरावा दाखल न केल्याने त्यांची नुकसानभरपाईची मागणी आयोगाकडून फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गिरधारीलाल रोचलदास ओचाणी, गांधी चौक, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५

निर्णय दिनांक १५-०४-२००९

१ श्री. गिरधारीलाल रोचलदास ओचाणी, अपिलार्थी
गांधी चौक, नांदगांव, तालुका नांदगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : इमारत निरीक्षक, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्रीमती चंद्रभागाबाई भागा माळी,
: श्री. देवराम तुकाराम परदेशी,
: श्रीमती उज्जवला देवराम परदेशी,

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुपुरस्सर टाळाटाळ केली व माहिती देण्यासाठी अडचणी निर्माण करुन माहिती गहाळ केली व माहिती अधिकार कायद्याचा भंग केला असल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे चंद्रभागाबाई भागा माळी, देवराम तुकाराम परदेशी व उज्ज्वला देवराम परदेशी यांच्या मालकीच्या सर्व इमारतींचा टाऊन प्लॅनिंगप्रमाणे नकाशा व बांधकाम परवानगीची नक्कल, लावलेला टॅक्स व नॅशनल हायवेच्या सेंटरपासून किती अंतरावर बांधकाम केले पाहिजे, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक २९-०४-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक २९-०४-२००८ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक महिन्याच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस सशुल्क व वेळेत पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या बांधकाम परवानगीची प्रत, सदर बांधकामाचा नकाशा, कर आकारणी संबधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली

होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या या मिळकतीवर कर आकारणी संदर्भात संपूर्ण माहिती दिली. मात्र या संपूर्ण इमारतीच्या बांधकामाचे नकाशे व बांधकाम परवानगीची प्रत ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या मते ही सर्व बांधकामे १९८५ पूर्वीची असून सदर बांधकामाच्या नकाशाच्या प्रती आता त्यांना उपलब्ध होत नाहीत. सदर कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी किती दिवसांचा आहे याची त्यांच्याकडे विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अशा स्वरुपाची कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी कायम स्वरुपाचा असतो. यावरुन असे दिसून येते की, नगर परिषदेमध्ये अभिलेखे योग्य त्या पध्दतीने जतन करुन ठेवले जात नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे ते अभिलेखे जतन करण्याचा कालावधी कायमस्वरुपी असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विशेष प्रयत्न करुन उपलब्ध करुन द्यावी. जर ती माहिती गहाळ झाली असेल तर ती माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर फौजदारी स्वरुपाची अथवा शिस्तभंगविषयक कारवाई मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव यांनी या कालावधीनंतर दोन महिन्याच्या नंतर करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्याचे आयोगाचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबधितांवर कारवाई करावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गिरधारीलाल रोचलदास ओचाणी, गांधी चौक, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत निरीक्षक, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. गुंजाळ निलेश अमृत, अपिलार्थी
मु. पो. पिंपळनारे, तालुका दिंडोरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, पंडितराव धर्माजी पाटील विद्यालय, पिंपळनारे,
तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक २४-११-२००८ रोजी नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या संस्थेत श्री. पाटील अ. अ. हे कर्मचारी शिपाई या पदावर दिनांक १३-१२-१९७८ पासून सलग ३० वर्षे कार्यरत असून जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-याला दोन महिन्याचा पगार न देता त्यांचे सेवापुस्तक गहाळ केले व त्यांचे अपरिमीत नुकसान केले. यासंदर्भात त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज पाठविला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र स्वीकृत न करता परत पाठविले. त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

सुनावणी झाली असता त्यांच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस मिळाली नाही व ही सुनावणी त्यांना मान्य नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-१०-२००८ च्या पत्राव्दारे, जे पत्र त्याना दिनांक ११-१०-२००८ ला प्राप्त झाले, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. पाटील अे. अे. यांची वैयक्तीक, सरंडर रजा आणि सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रती बाबत एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड टपालाने पाठविला असता सदर टपाल जन माहिती अधिकारी हे स्वीकृत करत नसल्याच्या पोस्टमनच्या दिनांक २६-०८-२००८ रोजीच्या अभिप्रायासह अपिलार्थीस परत प्राप्त झाले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २९-०९-२००८ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००८ पूर्वी माहिती देण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकास सूचित केले. तदनंतर दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिनांक ११-१०-२००८ रोजी माहिती प्राप्त झाली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज स्वीकारला नसल्याचे त्यांच्याकडील सुनावणीमध्ये सिध्द झाले होते. यावेळी जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना दिनांक २६-०९-२००८ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांनी आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार हा खोडसाळपणाचा किंवा अतिहुशारीचा प्रकार आहे व अपिलार्थीने

खोटा व दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केला असल्याने त्यांच्यावर काही तरी दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर टपालाने पाठविलेला अर्ज स्वीकारण्यास प्रथमतः नकार दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता यामध्ये सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीच्या नोटीसीमुळे ते चक्रावून गेले आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापक या नात्याने कोणतीही माहिती तोंडी किंवा लेखी स्वरुपात मागितली नाही. तोंडी अथवा लेखी माहिती त्यांनी मागितली असती तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती हसतमुखाने दिली असती. कारण त्यांचे वडील श्री. अमृत आनंदा पाटील हे त्यांच्या संस्थेत शिपाई या पदावर आजही कार्यरत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे स्पष्ट केलेली त्यांची भूमिका व अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज न स्वीकारण्याची त्यांची कृती या दोनही बाबी परस्परविरोधी आहेत. अपिलाथीस पाठविलेल्या त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्रातील माहितीचे अवलोकन केले असता या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येत आहे. सदर संस्थेतील शिपाई श्री. पाटील ए. ए., जे अपिलार्थीचे वडील आहेत त्यांचे सेवा पुस्तक संस्थेकडे उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीस कोणतीही माहिती देऊ शकत नाहीत. कर्मचा-यांची सेवापुस्तिका व्यवस्थित नोंद करुन ते जतन करणे ही जबाबदारी मुख्यत्वे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची आहे, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३, ४ व ७ वगळता उर्वरित सर्व माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असल्याने आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ७ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागणार आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेली माहिती पूर्णतः दिशाभूल करणारी आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,

त्यांनी उपरोक्त प्रकरणी वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ७ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच संबधित संस्थाचालक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या शाळेतील कर्मचारी श्री. पाटील ए. ए. यांची सेवापुस्तिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या संस्थेतील ज्या कर्मचा-याची होती त्या कर्मचा-यावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, संबंधित कर्मचा-याची सेवापुस्तिका गहाळ केल्याबद्दल फौजदारी कारवाई करावी. तसेच संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना येथे असेही आदेशित करण्यात येते की, जर श्री. पाटील ए. ए. यांची सेवापुस्तिका जर खरोखरच त्यांच्या संस्थेच्या कार्यालयातून गहाळ झाली असेल तर संबंधित संस्थेने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नोंदीवरुन ती नव्याने तयार करावी, जेणेकरुन संबंधित कर्मचा-याला त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्तीविषयक अनुज्ञेय लाभ प्राप्त होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. संबंधित संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक वरील आदेशाचे पालन याच कालावधीमध्ये करतील असे शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी पहावे, अन्यथा या संस्थेची मान्यता काढून घेण्याइतपत संस्थेवर कारवाई करण्याचा त्यांनी शाळा संहितेनुसार विचार करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज न स्वीकारुन अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल संबधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घकाळ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ७ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून दीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नाशिक यांनी वरील निर्णयात सुचविल्याप्रमाणे विहित मुदतीत कारवाई करावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुंजाळ निलेश अमृत, मु. पो. पिंपळनारे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पंडितराव धर्माजी पाटील विद्यालय, पिंपळणारे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संस्थाचालक मार्फत मुख्याध्यापक, पंडितराव धर्माजी पाटील विद्यालय, पिंपळनारे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. राधाकिसन पुंजा सोनवणे, अपिलार्थी

मु. पो. विंचूर, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप संचालक, भूमि अभिलेख, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ०३-११-२००८ रोजी नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे त्यामध्ये म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज उपसंचालक, भूमि अभिलेख नाशिक यांच्याकडे केला होता. तथापि या प्रकरणी मागणी केलेली

माहिती अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने उपसंचालक कार्यालयाने अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दिनांक १०-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीस संबधितांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०६-०८-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयानुसार तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००८ रोजी कथित माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर नाहीत.

अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आयोगासमोर त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे विशेषतः अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली असून त्यापैकी मुद्दा क्रमांक दोन अंशतः व तीन अंशतः वगळता उर्वरित कोणत्याही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मुद्दा क्रमांक दोन व तीन मधील "कारणे" हा अंशतः भाग वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत आहे. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती अत्यंत मर्यादित स्वरुपाची असूनही या प्रकरणी अधीक्षक भूमि अभिलेख व त्यांच्या कार्यक्षेत्रातील काम करणा-या अधिका-यांनी केलेला पत्रव्यवहार पाहता या कार्यालयातील सर्व जबाबदार अधिका-यांनी आपली अपिलार्थीस माहिती देण्याची जबाबदारी टाळली असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००८ रोजी

माहिती पुरविल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता या कथित माहितीमध्ये तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी " अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे असल्याची " माहिती अपिलार्थीस दिली आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतांना अधीक्षक भूमि अभिलेख यांनी अपिलार्थीस कशा प्रकारे माहिती देता येईल हे पाहणे आवश्यक होते. अपिलार्थीस ही माहिती देणे फारसे अवघड काम होते असे आयोगास वाटत नाही. तरीही अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपली जबाबदारी हेतुत: टाळून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभावाबद्दल जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना या कार्यालयातील सर्व संबधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे सर्व कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, अशा सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक दोन अंशत: व तीन अंशत: संदर्भात संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख यांना, या प्रकरणाशी संबंधीत सर्व जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राधाकिसन पुंजा सोनवणे, मु. पो. विंचूर, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. राकेश मनोहर साळी, अपिलार्थी
मु. पो. निफाड, जैन स्थानकाच्या मागे, तालुका निफाड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निफाड,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (ग्रापं), पंचायत समिती, निफाड, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १६-०४-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रात त्यांनी आज रोजी त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील क्रमांक २२८/२००८ हे रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीची विनंती, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता त्यांना प्राप्त झाली असल्याने मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२८/२००८, दिनांक ०५-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राकेश मनोहर साळी, मु. पो. निफाड, जैन स्थानकाच्या मागे, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रापं), पंचायत समिती, निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२९

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. पंडितराव माधवराव गायकवाड, — अपिलार्थी

२३०, साने गुरुजी नगर, नांदगांव, तालुका नांदगांव,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगर परिषद, नांदगांव,

तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी

तथा उप आयुक्त (साप्रवि),

विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे व त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी सदरील अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सोळा मुद्दयाव्दारे सन १९९३ ते २००८ या कालावधीशी संबंधीत काही

माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या वैयक्तीक बाबींशी निगडीत असून ती अपिलार्थीस कोर्टाच्या कामकाजासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उप आयुक्त (साप्रवि), नाशिक यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी संबधित उप आयुक्त (साप्रवि), नाशिक हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यावेळी जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेलेले मुख्याधिकारी, नांदगांव नगर परिषद, नांदगांव यांच्याकडे अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविले. सदर पत्र मुख्याधिकारी, नांदगांव नगर परिषद, नांदगांव यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक ११-११-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही असे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली दिनांक ११-११-२००८ रोजीची कथित माहिती पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एकूण सोळा मुद्दयावर माहिती दिली नसून ब-याच मुद्दयाव्दारे नगर परिषदकडे टिपण्या आढळून येत नाहीत, गोषवारे नांदगाव नगरपरिषदेकडे आढळून येत नाहीत, अशा अर्थाची उडवाउडवीची माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत आहे. या मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक १२ व्दारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. खरोटे यांच्याबाबत मागितलेल्या माहितीसंदर्भात, ही माहिती त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात असल्याने अपिलार्थीस देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे असे दिसून येते. येथे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने या मुद्दयावर लेखा परीक्षण विभागाने काढलेल्या शंका आणि याबाबत केलेल्या कारवाईच्या ख-या टिपणीच्या झ ेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने व त्यात वैयक्तीक अशी कोणत्याही स्वरुपाची माहिती नसल्याने तसेच ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील

कलम ८ अथवा ९ मधील कोणत्याही तरतुदींचा भंग होण्याचे संभवत नसल्याने ही माहिती त्यांनी अपिलार्थीस उघड करावी. अपिलार्थीस यापूर्वी देण्यात आलेल्या माहितीमध्ये ती माहिती ' आढळत नाही ' अशा अर्थाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्याचा पुनःश्च कसोशीने शोध घेऊन ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. कसोशीने शोध घेऊनही त्यांना जर ही माहिती उपलब्ध झाली नाही तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एक तर हे अभिलेखे जतन करावयाचा कालावधी पूर्ण झाल्याने ती नष्ट केल्याचा पुरावा द्यावा अथवा हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर / अधिका-यावर होती त्यांच्यावर फौजदारी आणि / किंवा त्यांच्यावर विभागीय चौकशी करण्याबाबत विचार करावा, असेही त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनाशी निगडीत असून अपिलार्थीचे वय ७४ वर्षाचे आहे, त्यांची हालाखीची परिस्थिती पाहता या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे आवश्यक राहील असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक ११-११-२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर दिल्याचे दिसून येत आहे. म्हणजे या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून नांदगाव नगरपरिषदेतील जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे सर्व कर्मचारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नांदगाव नगर परिषदेतील या प्रकरणाशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, उपरोक्त प्रकरणाशी संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंडितराव माधवराव गायकवाड, २३०, साने गुरुजी नगर, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नांदगांव नगर परिषद, नांदगांव, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (साप्रवि), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३०

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. धनाजी शिवाजी जाधव, अपिलार्थी

मु. समनेरे, पो. वाघेरे, तालुका इगतपुरी,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी संचालक, नाशिक सहकारी साखर कारखाना लि.

पळसे, तालुका जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०९-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे व त्यांना दिलेल्या माहितीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून जादा आकारण्यात आलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्वली गटाअंतर्गत मौजे समनेरे येथील शेतक-यांनी केलेल्या ऊस लागवडीच्या व ऊस तोडणीच्या

संदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२००८ ते १५-०३-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती रजिस्टर पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही. मात्र अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०० इतके असल्याचे प्रथमतः कल्पना आल्यानंतर त्यांनी दिनांक ०२-०५-२००८ रोजी सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पाठवून दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००८ ते १५-०३-२००८ या कालावधीतील समनेरे गावातील ऊस तोडणी कार्यक्रमाची प्रत १५ दिवसाच्या आत देण्याचे आदेशित केले. त्यानुसार दिनांक ३०-०६-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे समनेरे गावातील ऊस तोडणी कार्यक्रमाची दिनांक ०२-०३-२००८ ते १५-०३-२००८ या कालावधीतील माहिती रजिस्टर पोस्टाने पाठवून दिली. या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी एकूण दोन मुद्दे उपस्थित केले असून त्यातील पहिल्या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र ही माहिती त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी का वाटते हे स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी राज्य माहिती आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली कथित माहिती उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना दाखविली असता त्यांनी ही माहिती अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयाप्रमाणे दिली असल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली हा मुद्दा फेटाळण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती व पोस्टेज व टपाल खर्च गृहीत धरता त्यांना या प्रकरणी एकूण ३४ रुपये खर्च आल्याचे नमूद केले आहे व अपिलार्थीकडून त्यांना १०० रुपयाची मनीऑर्डर प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीशी सर्वसाधारण पत्रव्यवहार करतांना त्यांना आलेल्या सर्व पोस्टाचा खर्च त्यांनी यामध्ये लावला असल्याचे दिसून येते. परंतु माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देतांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या लागणा-या शुल्काचा संपूर्ण तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे अभिप्रेत आहे, अशा प्रकारचा कोणताही तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्रामध्ये दिला नसल्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक १८-०३-२००८ रोजीचे पत्र अवैध सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे मूळ पत्रच अशा प्रकारे अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य माहिती देय होत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहिती देण्यासाठी मनीऑर्डरव्दारे स्वीकारलेले शुल्क रुपये १०० इतके त्यांना परत करावे लागेल. अशा प्रकारे अपिलार्थीच्या अर्जातील, त्यांच्याकडून माहितीपोटी जादा शुल्क आकारले गेले हा मुद्दा आयोग मान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये १०० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धनाजी शिवाजी जाधव, मु. समनेरे, पो. वाघेरे, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, नाशिक सहकारी साखर कारखाना लि. पळसे, तालुका जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक (साखर), अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. शेख आरीफ युसूफ, अपिलार्थी

प्लॉट नं. ५ म्युन. कामगार हौसिंग सोसायटी,

मनमाड, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा आस्थापना सुपरवायझर, मनमाड नगर परिषद,

मनमाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, मनमाड नगर परिषद, कार्यालय,

मनमाड, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष १ श्री. अर्जून कोंडाजी जेजुरे

२ श्री. दगडू साखरचंद गुजराथी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, माहिती देण्याचे टाळले, माहितीचा कोणताही भाग दिला नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील चालविले नाही, त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

संपूर्ण माहिती त्यांना त्वरित देण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर २५००० रुपये इतकी शास्ती लावण्याची कारवाई करण्याचे आदेशित करण्याची या अर्जामध्ये त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. अर्जून जेजुरे, आस्थापना सुपरवायझर या त्रयस्थ पक्षाविषयी सन १९८१ पासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंत एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये दुसरे त्रयस्थ पक्ष श्री. दगडू साखरचंद गुजराथी यांच्याविषयी एका मुद्दयाव्दारे माहिती मागितल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २७ वर्षे इतकी जुनी असल्याने व अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी मोठ्या कालावधीची आवश्यकता असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध झाल्यास नियमानुसार देय असलेली माहिती देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०६-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारवाई चालू आहे असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्यात यावे आणि त्यांना माहिती देण्याकरिता विलंब लावल्याबाबत सर्व संबंधितांवर योग्य ते आदेश देण्यात यावेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे नगर परिषद मनमाड चे कर्मचारी असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याच ताब्यात असून केवळ त्रयस्थ पक्षास त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांनी ही माहिती नगर परिषदेकडून मागितली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील त्रयस्थ पक्ष श्री. जेजुरे हे स्वतः जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थीच्या विरुध्द नगरसेवकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सुर्वण जयंती शहरी रोजगार योजनेचा कार्यभार त्यांच्या- कडून काढून त्यांची इतरत्र बदली केल्याने नाराज होऊन

सूडभावनेने ते जन माहिती अधिकारी यांच्या विरोधात तक्रारी, माहिती अधिकाराखालील अर्ज, अपील अर्ज करत असतात. आतापर्यंत त्यांनी माहिती अधिकाराच्या तरतुदीनुसार १५ ते २० अर्ज व अपिले केली असून ते शासनाचे मनुष्यबळ व आर्थिक नुकसान करीत असतात व अपिलार्थी यांचा जन माहिती अधिकारी यांना जीवनातून उठविण्याचा उद्देश आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अशीही मागणी केली आहे की, अपिलार्थी आयोगाकडे अपील अर्ज करुन स्वतःच्या स्वार्थाकरिता माहिती अधिकाराचा वापर केल्याने अपिलार्थीवर २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या अर्जास जरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी तो पुरेसा सकारात्मक नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासंदर्भात, अपिलार्थीचे वैयक्तीक जीवन अथवा त्यांचे वर्तन, त्यांनी मागणी केलेली माहिती देतांना, विचारात घेण्याची कोणतीही तरतूद नसल्याने यावर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी एकमेकांवर केलेल्या आरोपावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती या मुदतीत उपलब्ध झाली नाही तर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, ते अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी नगर परिषदेच्या ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर फौजदारी अथवा इतर प्रशासकीय कारवाई करावी व तसे अपिलार्थीस कळवावे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली कारवाई ही चुकीची असून अपील अर्जावर निर्णय देतांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ते नोंदवून त्यावर आपला ठोस निर्णय देणे अपेक्षित आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थी यांना सुनावणीस हजर राहण्यासाठी पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीने सुनावणीसाठी केव्हा हजर राहावयाचे याचा उल्लेख या पत्रामध्ये केला नाही. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पाठविलेले सुनावणीचे पत्र मूळात त्यांना प्राप्त झाले नाही. ते त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीखाली जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतल्याचे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, इतःपर त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपिलावर अधिनियमातील कलम १९ (६) नुसार विहित केलेल्या तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ते नोंदवून त्यावर आपला स्पष्ट निर्णय द्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख आरीफ युसूफ, प्लॉट नं. ५ म्युन. कामगार हौसिंग सोसायटी, मनमाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा आस्थापना सुपरवायझर, मनमाड नगरपालिका कार्यालय, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपालिका कार्यालय, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३२

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. योगेश मधुकर घोडे, अपिलार्थी
घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी,
पंचवटी, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उद्यान निरीक्षक, नाशिक महानगरपालिका,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उद्यान अधीक्षक, नाशिक महानगरपालिका,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यालयातील माहिती वर्षनिहाय मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये - **मनपाच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने खरेदी केलेल्या वृक्षरोपांची संख्या, खरेदीची रक्कम, खरेदी टेंडर पध्दतीने व कोटेशन पध्दतीने किती वेळा करण्यात आली त्याची संख्या, वृक्षरोपे पुरविणा-या ठेकेदारांची नांवे व यासंदर्भात बनविण्यात आलेल्या सर्व फाईलींची झेरॉक्स प्रत** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती न देता ती विस्तृत स्वरुपाची असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस विशिष्ट स्वरुपाची माहिती मागविल्यास ती देण्याची तयारी दर्शविली. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-१०-२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेली माहिती अपूर्ण असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ४ शी संबंधित देय माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील किती वेळा किती फाईली बनविण्यात आल्या ही माहिती अपिलार्थीस, ती अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक १, २ व ४

अंशतः ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ अंशतः व ३ वगळता उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. यामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००८ अशा तीन वर्षातील माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २००६-०७ व २००७-०८ अशा दोन वर्षाशी संबंधित माहिती दिली आहे म्हणजेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांना असेही आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील सन २००५-२००६ शी संबंधित संपूर्ण देय माहिती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्दयावरील संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक ३ व ४ अंशतः वगळता उर्वरित) त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश मधुकर घोडे, घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उद्यान निरीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उद्यान अधीक्षक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३३

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. योगेश मधुकर घोडे, अपिलार्थी

घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी,

पंचवटी, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका,

नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : उपलेखापाल, नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झ ाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील उद्यान विभागामार्फत सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये वृक्षरोपे

खरेदीपोटी कोणत्या ठेकेदारास किती वेळा किती देयके अदा करण्यात आली त्या सर्व बिलांच्या झेरॉक्स प्रती, देयके अदा केल्याचा दिनांक, रक्कम, कामाचे नांव, कॉन्ट्रॅक्टरचे नांव व खातेप्रमुख बांधकाम, विद्युत, भुयार गटारयोजना, पाणीपुरवठा, आरोग्य, उद्यान यांना प्रत्येक कामाच्या वेळी प्रत्येकी किती रुपयापर्यंतची कामे कोटेशन पध्दतीने मंजूर करण्यात येतात यासंदर्भातील आदेशाची प्रत याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज उद्यान अधीक्षक यांच्याकडे पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उद्यान अधीक्षक यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०९-२००८ रोजी निर्णय देऊन या निर्णयाव्दारे अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०९-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०९-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे माहिती दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०९-२००८ रोजी दिलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणः सुसंगत असल्याचे दिसून येते. मात्र या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या संबंधीत कंत्राटदाराच्या बिलाच्या झेरॉक्स प्रतीचा यामध्ये समावेश नसल्याने, ती अपूर्ण असल्याचे सिध्द होत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली " संबंधित कंत्राटदाराच्या बिलाच्या सर्व झेरॉक्स प्रती " ही माहिती त्यांनी अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, महानगरपालिकेच्या उद्यान व लेखा विभाग यांच्यामध्ये महानगरपालिकेच्या कार्यक्षम कारभारासाठी आवश्यक असणारा किमान समन्वय अस्तित्वात नाही. लेखा विभाग हा त्यांच्याकडील असलेली माहिती देखील अर्जदारास न देता प्रत्येक अर्जदाराचा माहितीसाठीचा

अर्ज संबंधित विभागाकडे पाठवून त्या विभागाने अर्जदारास माहिती देण्याची अपेक्षा करतो. लेखा विभागाची अशा प्रकारची कृती सर्वथा गैर असून येथून पुढे हा विभाग माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांना सकारात्मक प्रतिसाद देईल असे आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०९-२००८ रोजी टपालाने माहिती पाठविली असतांना देखील अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी व्दितीय अपील अर्ज करतांना त्यांना कोणतीही माहिती संबधितांनी दिली नसल्याचे संपूर्ण असत्य विधान केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करतांना असत्य माहिती देण्याचे यापुढे त्यांनी टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संबंधित कंत्राटदाराच्या बिलाच्या सर्व झेरॉक्स प्रती ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश मधुकर घोडे, घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका,

नाशिक  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३४

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. लक्ष्मण शंकर कापसे, अपिलार्थी

रा. कापसे वस्ती, जुना शिवरे रस्ता, निफाड,

तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही व यासंदर्भात त्यांनी केलेल्या कथित अपील अर्जावर कोणताही निर्णय, त्यांनी दिनांक ११-०३-२००८ रोजी स्मरणपत्र पाठवून देखील प्राप्त झालेला नाही अथवा यासंदर्भात त्यांना काहीही खुलासा संबंधितांकडून प्राप्त झाला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाची आयोगाने छाननी केली असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या मूळ व्दितीय अपील अर्जावर त्यांची सही केलेली नाही तसेच हा अर्ज कोणत्या दिनांकास केला आहे त्याचाही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर मूळात त्यांची सही नसल्याने व यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील अवैध ठरत असल्याने खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण शंकर कापसे, रा. कापसे वस्ती, जुना शिवरे रस्ता, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २३५/०८ व २३६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३५ व २३६

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. शेख मो. बशीर इस्माईल, अपिलार्थी
रा. १५०९, लक्ष्मीबाई डेरे कॉलनी, पिंपळगांव बसवंत,
तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

अपील क्रमांक २३५/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, जळगांव

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, जळगांव

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय वाहतूक अधीक्षक, राज्य परिवहन, जळगांव

अपील क्रमांक २३६/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, धुळे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय वाहतूक अधिकारी, राज्य परिवहन, धुळे

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २३५/२००८ व २३६/२००८ शी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, जळगांव व धुळे या दोन स्वतंत्र जन माहिती अधिका-यांकडे एकच माहिती एकाच वेळी मागितली असल्याने व यासंदर्भातील प्रथम व व्दितीय अपिले एकाच वेळी अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केली असल्याने अपिलार्थीच्या दोनही अपिलांची सुनावणी आज रोजी एकत्रित घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, जळगांव व धुळे यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकच माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, जळगांव यांनी दिनांक १७-०५-२००८ रोजी व जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, धुळे यांनी दिनांक ०३-०६-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार वरील प्रकरणांशी संबंधित दोनही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी जळगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे सूचित केले व जन अपिलीय अधिकारी, धुळे यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांच्याकडील दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही खुलासा केला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला व राज्य परिवहन महामंडळाच्या जळगांव व धुळे आगारातील चालक व

वाहन यांच्या वर्तनासंदर्भात आणि एकूणच मार्ग परिवहन महामंडळ धुळे व जळगांव यांच्या कारभाराबाबत काही आक्षेप व्यक्त केले.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

या दोनही अर्जासंदर्भातील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील नऊ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक दोन अंशतः व मुद्दा क्रमांक आठ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उर्वरित मुद्दयांव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबत खुलासा, कारणे व स्पष्टीकरण अपेक्षित केल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कोणत्याही कृतीबद्दल कारणे व खुलासे मागणे अशा प्रकारच्या माहितीचा "माहिती" या शब्दाच्या व्याख्येमध्ये समावेश नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास त्यांनी देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन मध्ये चालक व वाहक यांनी प्रवाशाला महामार्गावर उतरवून दिले तर त्यांच्यावर काय कारवाई होऊ शकते व तसेच चालक व वाहक यांनी एखाद्या प्रवाशाला महामार्गावर उतरुन देणे हे त्यांच्या हातून घडणारे गैरवर्तन आहे किंवा कसे याबाबतची माहिती अपिलार्थीस देय होते. या अर्जातील मुद्दा क्रमांक आठ व्दारे धुळे व जळगांव विभागाच्या सर्व आगाराच्या पिंपळगांव बसवंतवरुन नाशिककडे व नाशिकपुढे जाणा-या व येणा-या गाड्यांची संख्या दोनही जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. या दोनही मुद्दयावरील माहिती, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

सबब दोनही जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित वर स्पष्ट केलेली अंशतः माहिती व मुद्दा क्रमांक

आठशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् आज रोजी सुनावणीच्या वेळेला अपिलार्थीने राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्यामध्ये वाहक व चालक यांच्या वर्तनाबाबत अनेक गंभीर तक्रारी आयोगाकडे केल्या असून वाहक व चालक यांनी प्रवाशांशी कशा प्रकारे वागावे याची काही मार्गदर्शक तत्वे राज्य मार्ग महामंडळाने निश्चित केल्यास व त्याची कठोर अंमलबजावणी केल्यास अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या तक्रारीसारख्या तक्रारी पुढे येण्यास वाव राहणार नाही. यास्तव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी यासंदर्भात त्यांच्या स्तरावर वाहक व चालक यांच्या प्रवाशांबरोबरच्या वर्तणूकीसंदर्भात एक परिपत्रक जारी करुन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होईल अशी व्यवस्था परिवहन महामंडळा-च्या प्रत्येक विभागीय कार्यालयामध्ये निर्माण केली जाईल असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली विचाराधीन दोनही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २३५/०८ व २३६/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. दोनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन अंशतः व मुद्दा क्रमांक आठ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख मो. बशीर इस्माईल, रा. १५०९, लक्ष्मीबाई डेरे कॉलनी, पिंपळगांव बसवंत, तालुका

निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधीक्षक, राज्य परिवहन, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी, राज्य परिवहन, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ व्यवस्थापकीय संचालक, एस. टी. मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३७

निर्णय दिनांक १६-०४-२००९

१ श्री. शेख आरीफ युसूफ, अपिलार्थी

प्लॉट नं. ५ म्युन. कामगार हौसिंग सोसायटी,

मनमाड, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अस्थापना सुपरवायझर, मनमाड नगरपालिका कार्यालय,

मनमाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपालिका कार्यालय,

मनमाड, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष श्री. अर्जून कोंडाजी जेजुरे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्ष, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, माहिती देण्याचे टाळले, माहितीचा कोणताही भाग दिला नाही, त्यामुळे

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेश व्हावेत व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळले असल्याने त्यांच्यावर २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमत: अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०६-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील आस्थापना सुपरवायझर श्री. अर्जून जेजुरे यांचे सर्व्हिसबुक त्यांना तपासण्यासाठी दाखविण्यात यावे व मागणीनुसार त्यातील साक्षांकीत छायांकीत प्रती देण्यात याव्यात, अशा प्रकारची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ४ व ८ मधील तरतुदीनुसार त्यांचा अर्ज अनुज्ञेय नाही, सबब अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी साध्या कागदावर विहित प्रपत्राचा वापर न करता प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद या पदाचा दिनांक १४-१०-२००८ पासून पदभार स्वीकारला असून अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्यासमोर आले नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ज्या दिवशी सुनावणी ठेवली होती त्या दिवशी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचा अपघात झाल्याने सदर सुनावणी होऊ शकली नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थी यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटत असल्याने जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, ते राज्य

माहिती आयोगाकडे, जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख आरीफ युसूफ, प्लॉट नं. ५ म्युन. कामगार हौसिंग सोसायटी, मनमाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, मनमाड नगरपालिका कार्यालय, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, मनमाड नगरपालिका कार्यालय, मनमाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३८

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. भास्कर बबन सोनवणे, अपिलार्थी

बेलगांव कु-हे, तालुका इगतपुरी,

जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा

योजना, पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालकल्याण),

जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २१-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व औरंगाबाद खंडपीठाकडे दिनांक ११-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही, अपिलीय अधिका-याने एक महिना उशिरा निकालपत्र दिले त्यामुळे विषयांकीत प्रकरणी त्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत व अन्य त्रासाबाबत त्यांना नुकसान-भरपाई मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबधित बालविकास व कुपोषण स्थितीसंदर्भात काही माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती व तसेच त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती. त्यामुळे अपिलार्थीने ही माहिती शक्य असल्यास विहित मुदतीत मिळावी अशी विनंती जन माहिती अधिकारी यांना केली होती. मात्र अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत संपून गेल्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पारित करुन अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि तदनंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झ ााल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी आयोगाच्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीने दिनांक २१-०२-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०२-२००८ रोजी माहिती देण्यात आली असून या माहितीबाबत अपिलार्थीची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या लेखी पत्राने कळविले आहे. या पत्राची सत्यप्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलाथीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली विस्तृत प्रमाणातील माहिती त्यांना वृत्तमालिकेसाठी आवश्यक होती व ती माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने आता त्यांची काहीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८-०२-२००८ रोजी लेखी दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती मोठ्या प्रमाणावर व विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसून येते.

वरील सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या आयोगाकडील व्दितीय अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही त्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भास्कर बबन सोनवणे, बेलगांव कु-हे, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३९

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. शंकरराव भिमाजी आव्हाड, अपिलार्थी
मु. पो. दापूर, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, विचाराधीन प्रकरणी त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक ११-१२-२००७, २९-१२-२००७, १७-०१-२००८ व २१-०२-२००८ रोजी अपर विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांच्याकडे झाली. यापैकी दिनांक २१-०२-२००८ रोजीची सुनावणी सोडून उर्वरित सर्व सुनावण्यांना ते हजर होते. मात्र अंतीम सुनावणीमध्ये त्यांच्या अपिलावर काय निर्णय झाला हे त्यांना आजतागायत समजले नाही. अपिलार्थीने हा निकाल प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने जन अपिलीय

अधिकारी यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधला असता संबंधितांनी इतर कार्यालयीन कामकाजात व्यस्त आहोत, नंतर सांगू अशी अपिलार्थीस उत्तरे देऊन त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी हेतुपुरस्सर टाळाटाळ केली. अपिलार्थीने दिनांक ०४-०४-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांना, निकाल प्राप्त झाला नाही, जो निकाल झाला असेल तो कळवावा असे लेखी कळवूनही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आजपावेतो कोणतेही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी सुनावणीस हजर राहून लेखी युक्तिवाद सादर करुनही निकाल न कळविल्यामुळे संबधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करावी व त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त व्हावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी झाल्याचे आयोगासमोर मान्य केले, तथापि शेवटच्या सुनावणीनंतर त्यांना निवडणुकीच्या कामासाठी निरीक्षक म्हणून बाहेरगावी जावे लागले असल्यामुळे व संबंधित कर्मचा-याची बदली झाली असल्यामुळे अपिलार्थीच्या अपिलावर मुदतीत निर्णय देणे शक्य झाले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले व त्याचबरोबर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अंतीम निर्णय एक महिन्याच्या आत पारित करण्याचे आयोगासमोर कबूल केले. जन अपिलीय अधिकारी यांची विनंती आयोग मान्य करीत असून जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-०११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, ते राज्य माहिती आयोगाकडे, जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १९-०११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

| | | |
|---|---|---|
| नाशिक | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | १७-०४-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. शंकरराव भिमाजी आव्हाड, मु. पो. दापूर, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४०

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. संजय पोपट लहांगे, अपिलार्थी

मु. पो. संजयनगर, आर. पी. विद्यालयासमोर, पंचवटी, नाशिक - ०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, (इ व द), विभाग क्रमांक-१,

जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, (इ व द), विभाग क्रमांक-१,

जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, कार्यकारी अभियंता, (इ व द), विभाग क्रमांक-१, जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण स्थितीत माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपेक्षिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद नाशिकच्या आवारातील उपहारगृह व झुणका भाकर केंद्राबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" सन १९९६ पासून आजपावेतो जिल्हा परिषदेने झुणका भाकर व उपहारगृहाशी केलेल्या करारनाम्याची प्रत व वसूल झालेल्या भाडे, लाईट बिल, पाणी बिल भरणा केलेल्या चलनाच्या प्रती भाडे लाईट बिल वसुल केले नसल्यास संबंधित कालावधीपासुन कार्यरत अधिकारी, उपअभियंता, शाखा अभियंता यांची कालावधीसह " .

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे सर्व संबंधित कर्मचा-यांची नांवे, पदनामे व कार्यकाळ देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हस्तांतरीत केली. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील इतर मुद्द्यावर कोणतीही माहिती दिली नाही. अशा त-हेने अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणासंदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करुन असे सांगितले की, अपिलार्थीने ज्या उपहारगृहाची व झुणका भाकर केंद्राची माहिती त्यांच्याकडे मागितली आहे ते झुणका भाकर केंद्र, उपहारगृह हे अनधिकृत असून या उपहारगृहाशी जिल्हा परिषदेने कोणत्याही प्रकारचा काररनामा केलेला नाही. जिल्हा परिषदेच्या पाण्याच्या व विजेच्या कनेक्शनमधूनच या उपहारगृहाला अनधिकृतरित्या कनेक्शन दिले गेले आहे. यासंदर्भात त्यांच्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य कळविण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद नाशिक यांच्या कार्यालयातील एका अनधिकृत बांधकामासंदर्भात काही माहिती मागितली आहे. परंतु ही माहिती जन माहिती यांच्याकडे मूळात अस्तित्वात नाही, कारण अपिलार्थीने ज्या झुणका भाकर केंद्र व उपहारगृहाची माहिती मागितली आहे, तेच मूळात अनधिकृतरित्या जिल्हापरिषदेच्या आवारात चालू आहे. एवढेच नव्हे तर या उपहारगृहासाठी लागणा-या पाण्याचे व विजेचे कनेक्शन जिल्हा परिषदेच्या सामाईक विद्युत पुरवठ्यामधून व पाण्याच्या कनेक्शनमधून दिले आहे. सदर बांधकाम १९९६ पासून अस्तित्वात असून या अनधिकृत बांधकामाचा अनधिकृत वापर गेल्या १३ वर्षे जिल्हा परिषदेच्या आवारात सातत्याने होत आहे. वास्तविक पाहता, ही वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता, मात्र त्यांनी नेमकी हीच बाब वगळून उर्वरित माहिती अपिलार्थीस, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस दिली. या सर्व प्रकारावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतुपुरःस्सर माहिती दडविल्याचे व अपूर्ण माहिती देऊन संपूर्ण माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. आपल्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, आज रोजी सुनावणीच्या वेळी कबूल केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती दिनांक २०-०४-२००९ रोजी अगर तत्पूर्वी व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे या अनधिकृत बांधकामाचे व त्याच्या वापराबाबतचे गांभीर्य मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी लक्षात घेऊन यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्याचा त्यांनी गांभीर्याने विचार करावा, असे आयोगातर्फे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती, अपिलार्थीस दिनांक २०-०४-२००९ रोजी अगर तत्पूर्वी व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय पोपट लहांगे, मु. पो. संजयनगर, आर. पी. विद्यालयासमोर, पंचवटी, नाशिक - ०३.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, कार्यकारी अभियंता, (इ व द), विभाग क्रमांक-१, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (इ व द), विभाग क्रमांक-१,
जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४१

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, अपिलार्थी

रेश - पर्व, आनंदनगर, नव वसाहत, सोयगांव,

तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी या प्रकरणी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे गो. प. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दोन अकरावीचे व दोन बारावीचे असे चार वर्ग असून या वर्गास मान्यताप्राप्त शिक्षकांची सन १९९४-९५ ते २००७-०८ पर्यंतची स्टाफसूचीच्या मान्यतेच्या छायांकीत प्रतीची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित

महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना सुचविले. परंतु सदर महाविद्यालय कोणतीही माहिती देत नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांच्या अपील अर्जावर शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयातील माहिती अधिका-याव्दारे त्यांना परत आवश्यक असलेली माहिती संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले गेले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी वरीलप्रमाणे वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आणली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात संबंधित शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित विद्यालयाकडून घेण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय दिला गेला नसल्याचे देखील आयोगासमोर कबूल केले.

यासंदर्भातील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील गो. प. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जळगांव (नि) यांच्या सन १९९४-९५ ते २००७-०८ पर्यंतच्या स्टाफ सूचीची माहिती मागितली होती. शिक्षण उपसंचालकामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या स्टाफ सूचीस मान्यता देण्यात येते. असे असतांना देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती संस्थेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. त्यांनी ही कृती केवळ संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत या कल्पनेवर केल्याचे दिसून येत आहे. ज्याअर्थी प्रत्येक महाविद्यालयाच्या स्टाफ सूचीची मान्यता शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून दिली जाते त्याअर्थी स्टाफ सूची शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे. त्यामुळे या प्रकरणी शिक्षण उपसंचालक कार्यालयात माहिती उपलब्ध असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यास टाळाटाळ केल्याचे येथे दिसून येत आहे. अपिलार्थीने याच प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन कोणताही निर्णय तर दिला नाहीच, परंतु अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी " सदर प्रकरणी मा.

राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे अपील केल्याने त्यांच्या स्तरावरुन कारवाई होणे अपेक्षित आहे, तरी याबाबत अनावश्यक पत्रव्यवहार टाळावा " असे उध्दटपणाचे पत्र अपिलार्थीस पाठविले. वास्तविक पाहता दिनांक १६-११-२००७ रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले नसतांना देखील खोटी कारणे दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी हेतुपुरस्सर अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. थोडक्यात या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित आपली वैधानिक जबाबदारी पार पाडण्याचे हेतुपुरःस्सर टाळल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर शिक्षण उपसंचालक कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. मात्र अशा प्रकारची कोणतीही कृती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केलेली नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणताही सकारात्मक प्रयत्न या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर केला नाही हे देखील येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे त्यामुळे व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयात उपलब्ध असणे हे मूलतः अभिप्रेत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच या प्रकरणी सचिव (शालेय शिक्षण) यांना संबधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे देखील येथे सूचित करण्यात येत आहे, आणि उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन सिध्द केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, रेश - पर्व, आनंदनगर, नव वसाहत, सोयगांव, तालुका मालेगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४२

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. संदिप बबन लोंढे, अपिलार्थी
संजय गांधी नगर, श्रीराम कॉलनी जवळ,
विंचूर रोड, येवला, तालुका येवला,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण,
कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, कृषि उपसंचालक (खते), पुणे व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, अपिलाच्या सुनावणीसाठी ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे गेले असता अपिलीय अधिका-याने त्यांना माहिती तर दिलीच नाही, परंतु अपिलार्थीवर कोर्टात केसेस दाखल करुन चकरा मारायला लावतो अशी दमदाटीची भाषा

करुन त्यांची मानसिक छळवणूक केली तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक दोन व चार व्दारे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबधित दिनांक ०१-०७-९८ ते ३०-०४-९९, १६-०४-२००० ते ०५-०५-२००२ व ०३-०६-२००६ ते ३०-०९-२००७ या कालावधीतील श्री. मोहन वाघ, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी या पदावर कार्यरत असतांना केलेल्या तपासणीच्या व सुनावणीच्या प्रतीसंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज संचालक निविष्ठा, पुणे यांना दिनांक ०८-१०-२००७ रोजी प्राप्त झाला व सदर अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-१०-२००७ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन मुद्दा क्रमांक १ संदर्भात काही माहिती दिली व अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात कर्मचारी कमी असल्यामुळे मुद्दा क्रमांक २ व ४ च्या संदर्भातील माहिती दिनांक ३१-०१-२००८ पर्यंत देण्यात येईल असे कळविले व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन बाबत आवश्यक ते शुल्क रुपये वीस इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचा निर्णय पारित केला. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली आवश्यक ती माहिती त्यांना दिनांक ३०-११-२००७, ०२-०१-२००८ व २९-०१-२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या एकूण चार मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक तीन व चार मधील काही माहिती अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित असलेली व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारलेली आहेत, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल कारणे विचारणे किंवा कृतीबद्दल स्पष्टीकरण विचारणे हे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक तीन मधील विक्रेत्याची सुनावणी घेण्याचे अधिकार आहेत काय, मुद्दा क्रमांक चार मधील सुनावणीची कारणे या बाबींवरील माहिती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती आणि जन अपिलीय अधिकारी यांचा यासंदर्भातील निर्णय पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी दिलेल्या माहितीमध्ये विसंगती आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक चार बाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आढळ होत नाही असे कळविले आहे व ' माहिती आढळत नाही ' हीच माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली असे त्यांनी आयोगाकडे प्रतिपादन केले. त्याचबरोबर आयोगाकडे दाखल केलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, खत परवाना व बी-बियाणे परवान्याच्या तपासणी टिपण्या जतन करुन ठेवण्याबाबत कोणतेही लिखीत आदेश नाहीत असे अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस समक्ष पटवून दिले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची ही कृती आयोगास मान्य नाही. प्रत्येक शासकीय पत्रव्यवहाराचा, अभिलेख्याचा ते जतन करुन ठेवण्याचा कालावधी शासनाच्या प्रत्येक विभागाने परिपत्रकाव्दारे निश्चित केलेला असतो. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचा कोणताही लिखीत आदेश नाही, असे विसंगत उत्तर अपिलार्थीस देऊन अपिलार्थीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. याचबरोबर अपिलार्थीच्या अर्जातील जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या मते आढळ होत नाही त्या माहितीचा पुनश्च त्यांच्या कार्यालयात शोध घेऊन ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीत त्यांना ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर अशा प्रकारची कागदपत्रे / अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील

ज्या कर्मचारी / अधिका-यावर होती त्यांच्यावर त्यांनी फौजदारी अथवा प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०८-१०-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-१०-२००७ रोजी प्राप्त होऊन त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक ३०-११-२००७ रोजी म्हणजेच ११ दिवस विलंबाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जास विलंबाने प्रतिसाद देऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, आयुक्त (कृषि) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संदिप बबन लोंढे, संजय गांधी नगर, श्रीराम कॉलनी जवळ, विंचूर रोड, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४३

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. चंद्रशेखर विनायक घाणेकर, अपिलार्थी

बळवंत चेंबर्स, माणके कम्पाउंड, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सिटी सर्वे कार्यालय, मनमाड, तालुका नांदगांव,

जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदगांव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी दाखल झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०४-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने या अपिलासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही व त्यामुळे आता ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे विचाराधीन अपील क्रमांक २४३/२००८, दिनांक ३०-०७-२००८ खारीज करण्यात येऊन खालील- प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील क्रमांक २४३/२००८, दिनांक ३०-०७-२००८ खारीज करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रशेखर विनायक घाणेकर, बळवंत चेंबर्स, माणके कम्पाउंड, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. धनंजय शंकर करके, अपिलार्थी

मु. पो. आडगांव,

तालुका जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप प्राचार्य,

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, नाशिक - २

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नाही, आणि त्यांना सुनावणीसाठी बोलाविले नाही. अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये आय. टी. आय. मध्ये शिकविण्यात येत असलेल्या इलेक्ट्रीशियन व रेफ्रीजरेशन या दोन व्यवसायासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २७-०५-२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचयाकडून दिनांक २८-०५-२००८ रोजी माहिती पुरविण्यात आली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपील अर्ज करतेवेळी प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी प्राचार्याकडे प्रथम अपील केले होते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २८-०५-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे. या प्रकरणी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हे अपिलीय अधिकारी असल्याने अपिलार्थीचा अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००८ रोजी पाठविला होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती, त्या सहा मुद्दयांपैकी इलेक्ट्रीशियन व रेफ्रीजरेशन या दोन ट्रेडचा एकूण कालावधी आणि या ट्रेडकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता वगळता उर्वरित चार मुद्दयाव्दारे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात कारवाई करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती देण्याची कृती सर्वसाधारणपणे बरोबर आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस फक्त दोन पृष्ठातच मिळू शकत असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस इलेक्ट्रीशियन व रेफ्रीजरेशन या दोनही विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमाची पुस्तिका पाठविली आहे. त्यांची ही कृती चुकीची आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त दोन पृष्ठांची माहिती जी त्यांना देय होत आहे, त्याकरिता प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे या माहितीचे शुल्क रुपये चार आकारुन आता उर्वरित शुल्क रुपये १८ इतके जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रुपये १८ हे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक १९-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला असतांना त्यांनी यासंदर्भात अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीत कोणतीही कार्यवाही केली नाही. ही त्यांची कृती सर्वथा चुकीची आहे. इतःपर त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत कार्यवाही करुन अशा प्रकारच्या चुका करण्याचे टाळावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जादाचे शुल्क रुपये १८ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. करके धनंजय शंकर, मु. पो. आडगांव, तालुका जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, नाशिक - २ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४५

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. रावसाहेब अ. ढमढेरे, अपिलार्थी

८७८/१/६०, राजीवनगर,

नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा शल्य चिकित्सक,

नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये, सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सरकारी नियमांशी असंबंध्द माहिती दिल्याने केले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य शासनाने ज्या रोगांसाठी शासकीय कर्मचा-यांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी परवानगी दिली आहे

त्या रुग्णाकरिता वैद्यकीय उपचारासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना रुबी हॉल क्लिनिक पुणे येथून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रावर संबंधित डॉक्टरने दिलेल्या अभिप्रायाबाबत खुलासा मागितला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली, परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस काही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आयोगास अशी अवगत केली की, अपिलार्थीच्या पत्नी यांनी पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक येथे Thyroiditis या आजारावर ट्रिटमेंट घेतली, तथापि सदर आजार इमरजन्सी या प्रवर्गात मोडत नसल्याने अपिलार्थीच्या पत्नीचे वैद्यकीय बील त्यांनी पास केले नाही. त्यामुळे अपिलार्थीने विषयाधीन प्रकरणी रुबी हॉल क्लिनिकच्या प्रमाणपत्रावर अधिकची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगा-समोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती न मागविता एका खाजगी रुग्णालयातील त्रयस्थ डॉक्टरने दिलेल्या प्रमाणपत्रावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागविले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच देय होऊ शकते. या अधिनियमाचा वापर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाने दिलेल्या अभिप्रायावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय, स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे, हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याप्तीबाहेरचे आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती

ही मूळात अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रावसाहेब अ. ढमढेरे, ८७८/६०, राजीवनगर, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक २४६/०८, २४७/०८, २४८/०८ व २४९/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२४६, २४७, २४८ व २४९

निर्णय दिनांक १७-०४-२००९

१ श्री. दिलीप दामू निकम, अपिलार्थी

बेसमेंट, बळवंत प्लाझा, हॉटेल पंचवटी समोर,

वकीलवाडी, नाशिक - ०१

**विरुध्द**

अपील क्रमांक २४६/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, के. बी. एच. कृषि विद्यालय, खालप, तालुका देवळा, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, के. बी. एच. कृषि विद्यालय, खालप, तालुका देवळा, जिल्हा नाशिक

अपील क्रमांक २४७/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय व उच्च माध्य. विद्यालय, डांग सौंदाणे, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, देवळा एज्युकेशन सोसायटी, देवळा, तालुका देवळा, जिल्हा नाशिक

अपील क्रमांक २४८/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, कै. सौ. आर. एम. अलई विद्यालय, नायपूर,

तालुका बागलाण, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, उन्नती एज्युकेशन सोसायटी, नाशिक

अपील क्रमांक २४९/२००८

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय, पिंपळगांव (वखारी), तालुका देवळा, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अध्यक्ष / सचिव, जनता विद्यालय, पिंपळगांव (वखारी), तालुका देवळा, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १७-०४-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपील क्रमांक २४६/२००८ मधील जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपील क्रमांक २४७/२००८ मधील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपील क्रमांक २४८/२००८ मधील जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. अपील क्रमांक २४९/२००८ मधील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. या चारही प्रकरणातील अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार दिनांक ११-०३-२००८ रोजी दाखल केलेली तीन व्दितीय अपिले (क्रमांक २४६/०८, २४७/०८ व २४८/०८) व दिनांक ०५-०३-२००८ रोजी दाखल केलेले एक अपील (क्रमांक २४९/०८) आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी / सचिवांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन व्दितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत. तसेच या अपील अर्जांमध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

उपरोक्त चारही प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००७ या एकाच दिवशी चार वेगवेगळ्या विद्यालयाकडे एकच माहिती मागितली आहे आणि अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रत्येक संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे एकासारखीच प्रथम अपिले केली असल्याने या चारही स्वतंत्र अपील अर्जाची आज रोजी एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००७ रोजी के. बी. एच. कृषि विद्यालय, खालप, तालुका देवळा, जिल्हा नाशिक, जनता विद्यालय व उच्च माध्य. विद्यालय, डांग सौंदाणे, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक, कै. सौ. आर. एम. अलई विद्यालय, नायपूर, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक व जनता विद्यालय, पिंपळगांव (वखारी), तालुका देवळा, जिल्हा नाशिक या वेगवेगळ्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी, गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा व भामरागड येथे गेल्याचे दाखवून रजा प्रवास सवलत योजनेव्दारे पैसे हडपल्याबाबत एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **संबंधित शिक्षकांची / कर्मचा-यांची नांवे, पदे त्यांना मिळालेली रक्कम, प्रवासाचा कालावधी, त्यावेळचे मुख्याध्यापक, सदर कर्मचा-यांनी मुख्याध्यापकाकडे प्रवास केल्याचे सादर केलेल्या प्रवासाच्या पुराव्याच्या छायांकीत प्रती, वेतन विभागाकडे केलेल्या अर्जाची मूळ छायांकीत प्रत व सध्या कार्यरत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाचे नांव** - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संबंधित संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपिले केली. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर एकाही संस्थेच्या अध्यक्षांनी / सचिवांनी निर्णय दिलेला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर निर्णय होणे या टप्पावर आयोगास गरजेचे वाटते. शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील

अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या सदर निर्णयाने समाधान न झाल्यास अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली चारही व्दितीय अपिले (अपील क्रमांक २४६/०८, २४७/०८, २४८/०८ व २४९/०८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २४६/०८, २४७/०८, २४८/०८ व २४९/०८ ही निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत, झ ाालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०४-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिलीप दामू निकम, बेसमेंट, बळवंत प्लाझा, हॉटेल पंचवटी समोर, वकीलवाडी, नाशिक - ०१.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, के. बी. एच. कृषि विद्यालय, खालप, तालुका देवळा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, के. बी. एच. कृषि विद्यालय, खालप, तालुका देवळा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय व उच्च माध्य. विद्यालय, डांग

सौंदाणे, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, देवळा एज्युकेशन सोसायटी, देवळा, तालुका देवळा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. सौ. आर. एम. अलई विद्यालय, नायपूर, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, उन्नती एज्युकेशन सोसायटी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जनता विद्यालय, पिंपळगांव (वखारी), तालुका देवळा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, जनता विद्यालय, पिंपळगांव (वखारी), तालुका देवळा, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सुलभ संदर्भाकरिता अपिलार्थीच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे)

११ निर्णय नस्ती.